# हाकारा हाकारा हाकारा

## हाकारा हाकारा हाकारा

### हाकारा हाकारा हाकारा

वर्ष नववे अंक पहिला जानेवारी–मार्च १९८८

## आगामी अंकात
## हाकारा प्रसिद्ध करीत आहे–

- आदिवासी आणि क्रिडा – एका सर्वस्वी नव्या विषयाला प्रारंभ
- उपेक्षितांची प्रगल्भ कविता – उदयोन्मुख आदिवासी साहित्याला सुजाणतेची बैठक देणारा लेख
- आदिवासींचे पन्नास वर्षांपूर्वीचे कथासाहित्य
- आदिवासींचा 'काज' – ठाणे जिल्ह्यातील प्रथेचा तपशील
- ठाकर आणि वारली जातीची पारंपारिक गीते
- आदिवासी आणि नागरी संस्कृती – समन्वयाचा शोध
- कातकरी जमातीतील कार्यकर्त्यांचे अनुभव
- आश्रमशाळांची उपयुक्तता – एक वस्तुनिष्ठ आढावा
- मोलगी गोळीबाराचे सूत्रधार – संतापजनक दयेचे निवेदन
- आदिवासी विकासाचे नवे तंत्रज्ञान – एका पर्यायाचा परिचय

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

## अनुक्रमणिका


१. संपादकीय २
२. अनुसुचित जमातीच्या हितरक्षणार्थ घटनात्मक तरतूदी ४
३. अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे तपासणी ५
४. बनावट आदिवासी बोगस प्रमाणपत्रे १२
५. आदिवासींच्या सवलती लाटणाऱ्या टोळच्या १५
६. खरा महादेव कोळीं समाज कोणता ? १७
७. प्रत्येक आदिवासी व्यक्तीने घ्यावयाची दक्षता १९
८. महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग–शासन निर्णय २०
९. वृत्तपत्रातील आदिवासी विश्व २२
१०. धरणग्रस्तांचा क्रिडामहोत्सव २४
११. मौखिक संपदा २८
१२. आदिवासी साहित्यिक प्रशिक्षण शिबीर ३०
१३. घरनंबर आणि घरपट्टी नाही ३२
१४. दसरा – जव्हारच्या आदिवासींचा ३३
१५. दोन जीवांशी ३५
१६. राजी किरात ३६
१७. पुस्तक परिक्षण ३७
१८. वाहते पाणी ३८
१९. बातचित नर्मदेशी ४२



वर्ष नववे : अंक पहिला
जाने–मार्च १९८८
परिषद / हाकारा संयुक्त
आजीव २०० रुपये
वार्षिक २० रुपये
सुटा अंक किंमत : ५ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४/३, आनंद पार्क, औंध
पुणे ४११ ००७

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर
**सहसंपादक**
लता बापट
उल्हास राजश

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांच्यासाठी

**प्रिंट आर्ट एन्टरप्रायजेस**
**११२१, शिवाजीनगर**
**पुणे ४११ ०१६**
**येथे छापून प्रसिद्ध केले.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

# संपादकीय

भारतीय राज्यघटनेने वर्गीकृत जाती व जमातींसाठी, त्यांच्या विकासासाठी, विशेष तरतुदी केल्या. त्यामुळे आदिवासी आणि हरिजनांना राजकीय प्रक्रीयेत भाग घेता यायला लागला. तांत्रिक शिक्षणाचे दरवाजे त्यांच्याकरिता खुले झाले. त्याचा दुष्परिणामही झाला. तोतयेगिरी वाढली. हरिजन–दलित व आदिवासी यांच्यात फरक आहे. हरिजन–दलित म्हणजे पूर्वाश्रमीचे अस्पृश्य, वर्णव्यवस्थेत जरी अवर्ण मानण्यांत आले तरी वर्णव्यवस्थेतील जातिसंस्थेशी व ग्रामसंस्थेशी त्यांचा कायम जवळचा संबंध राहिला. प्रत्येक भारतीय खेड्यात हरिजन वस्ती असते. हरिजनांचे जरी सामाजिक–आर्थिक शोषण झाले तरी त्यांच्याशिवाय भारतीय ग्रामसंस्था असू शकत नाही, समजू शकत नाही. वर्गीकृत जातींसाठी राखून ठवलेले फायदे मिळविण्यासाठी वर्णव्यवस्थेतील जाती धारण करणारे लोक स्वतःस दलित–हरिजन म्हणवून घेण्यास धजावत नाही.

आदिवासींचा वर्णव्यवस्थेशी–जातिसंस्थेशी संबंधच आला नाही. त्यांची खेडी भारतीय ग्रामसंस्थेपासून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक व कला–साहित्याच्या अंगांनी वेगळीच राहिली. काही ठिकाणी त्यांचा हिंदू जातिनिष्ठ ग्रामसंस्थेशी संबंध आला व त्यामुळे आदिवासी व इतर हिंदू संस्कृतींचे आदान–प्रदान झाले. परंतु हरिजन–दलितांसारखी सतत हीन वागणूक आदिवासींना मिळाली नाही. त्यांचे स्वत्व गमावले नाही. आदिवासींना स्वतःचा भूगोल आहे, इतिहास आहे पुराणे आहेत, कलाविश्व आहे. राज्यघटनेने मिळणारे बरेचसे फायदे, शिक्षणविषयक व नोकरी-विषयक फायदे नागरी समाजात स्थान मिळविण्यास उपयोगी पडतात. बरेचसे सुशिक्षित आदिवासी एकदा आपल्या घरातून बाहेर पडल्यावर परत तिकडे वळून पाहात नाहींत. त्यांना भूतकाळ विसरून नागर समाजाशी एकरूप होण्याची इच्छा असते. या सर्व परिस्थितीमुळे बरेच जातिनिष्ठ, वर्णव्यवस्थेतील लोक स्वतःस आदिवासी म्हणवून घेण्यास उत्सुक असतात, ते स्वतःस दलित म्हणवून घेण्यास मात्र तयार नसतात. दलित समाज आज जास्त सुसंघटित व जागरुक आहे. त्यामुळे तशी तोतयेगिरी करणे अवघड आहे. आदिवासींमध्ये नेतृत्वाचा आजही अभाव आहे. राजकीय नेतृत्वाचे आदिवासी प्रदेशातच निवासस्थान व वर्दळ असते. संघटितपणे त्यांना भ्रष्ट नोकरशाहीशी, राज्य-पातळीवरील श्रीमंत राज्यकर्त्यांशी मुकाबला करता येत नाही. परिणामस्वरूप घटनेचे फायदे उपटण्याकरिता भ्रष्ट नोकरशाहीच्या मदतीने कोणालाही आदिवासी म्हणवून घेता येते.

आदिवासी संस्कृति, त्यांचा इतिहास, त्यांची अस्मिता याबाबत न्यायसंस्थेत कमालीचे अज्ञान आहे. त्यामुळे तोतये आदिवासी आपली संस्कृति विसरले असतील

असा संशयाचा फायदा मिळून न्यायसंस्थेद्वारे तोतयेगिरीस अप्रत्यक्ष प्रोत्साहन मिळते. संस्कृति, भाषा, इतिहास, आणि भूगोल यांचे पूर्णपणे विस्मरण झाले असल्यास व दुसऱ्या गटाची संस्कृती पूर्णपणे आत्मसात केलेल्या व्यक्तीस किंवा गटास आदिवासी का म्हणावे हा प्रश्नच आहे. याचा विचार आदिवासी युवकांनी करावयाचा आहे.

संस्कृतीची वैशिष्ठ्ये काय ? संस्कृतीत वरवर परिवर्तन होणारी अंगे कोणती ? धर्म, रूढी, परंपरा, पुराणे, तीर्थस्थाने यांत सहजासहजी फरक होत नाही. त्याची ओढ समाजात राहाते. या सर्व बाबींचा शास्त्रशुद्ध अभ्यास मानवशास्त्रात करण्यात येतो. परंतु मानवशास्त्रज्ञही अगातिक होऊन आदिवासी अध्ययनापासून दुरावले जात आहेत. त्यांनाही प्रतिष्ठा व पैसा मिळवून देणारे बिगर-आदिवासी अध्ययन क्षेत्रे हवी आहेत. आदिवासी युवक संघटना तोतयेगिरीचा मुकाबला करण्यासाठी बांधिल आहेत. त्यांनी शास्त्रीय पातळीवर लढा देण्यास सुसज्ज होण्यासाठी मानवशास्त्राचे तात्त्विक ज्ञान आत्मसात करावे. तसेच, मानवशास्त्राची अभ्यासपद्धती आत्मसात करावी. हाकारा-मार्फत मानवशास्त्रावर लेख लिहिण्याचा मानस बऱ्याचदा जाहीर झाला. त्याप्रमाणे काही लेख प्रकाशितही झाले. परंतु लेखांची मालिका अजून सुरू होऊ शकली नाही. तरी कार्यकर्त्यांनी त्याबाबत सूचना केल्यास योग्य पावले उचलता येतील. कार्य करताना, कोणत्या तात्त्विक ज्ञानाची गरज कार्यकर्त्यांना भासते हे त्यांनी नमूद करावे. हाकारा-बाबतच्या कार्यकर्त्यांच्या अपेक्षा जाणून घेण्याची आमची नेहमीच इच्छा असते. ती जरूर कळवावी.

विदर्भातील हलबाकोष्टींविषयक तज्ज्ञ-समितीचा अहवाल महाराष्ट्र शासनाने मान्य केलेला आहे. सर्वोच्च न्यायालयात त्याची प्रतही शासनातर्फे देण्यात आलेली आहे. या अहवालात मानवशास्त्राचे निकष लावून कोणाला आदिवासी म्हणावयचे याबाबत चर्चा आहे. त्याचे अध्ययन आदिवासी युवकांनी करावे. हाकारा या प्रतिक्रियांचे स्वागत करेल.

# अनुसूचित जमातीच्या हितरक्षणार्थ घटनात्मक तरतूदी

* अनुच्छेद १५ (४) मधील किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांपैकी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गांच्या उन्नतीकरिता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

* अनुच्छेद १९ (५) नुसार भारतीय नागरिकाला भारताच्या कोणत्याही भागात मुक्त संचार करण्याचा, आणि स्थायिक होण्याचा आणि मालमत्ता संपादन करण्याचा, निर्धारण करण्याचा व विल्हेवाट लावण्याचा मूलभूत हक्क असला तरी कोणत्याही अनुसूचित जमातीच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी या हक्कांवर वाजवी निर्बंध घालणारे योग्य ते कायदे करण्याचा अधिकार राज्याला देण्यात आला आहे.

* अनुच्छेद २३ (१) नुसार माणसांच्या अपव्यापार आणि वेठबिगारास प्रतिबंध करण्यास आला आहे. या उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

* अनुच्छेद २५ सद्सद्विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य, धर्मपालनाचे व धर्मप्रचाराचे मुक्त स्वातंत्र्य.

* अनुच्छेद २९ (१) नुसार भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्यांच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती जतन करण्याचा अधिकार असेल.

* अनुच्छेद २९ (२) नुसार राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेस कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

* अनुच्छेद ४६ नुसार राज्य दुर्बलतर जनवर्ग आणि विशेषत: अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यामधून त्यांचे संरक्षण करील.

* अनुच्छेद १६४ (१) नुसार बिहार, मध्यप्रदेश व ओरिसा या राज्यामध्ये एका मंत्र्यांकडे अनुसूचित जमातींच्या कल्याणकार्याचा प्रकार असेल व त्याशिवाय त्याच्याकडे अनुसूचित जमातीचे व मागासवर्गाचे कल्याणकार्य किंवा अन्य कोणतेही काम यांचा प्रकार असेल.

* अनुच्छेद २४४ (१)–अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जमाती यांचे प्रशासन व नियंत्रण याविषयी तरतूद.

* अनुच्छेद २७५ (१)–एखाद्या राज्यातील अनुसूचित जमातींच्या कल्याण वृद्धीसाठी किंवा त्या राज्यातील अनुसूचित क्षेत्रांची प्रशासन पातळी त्या राज्याच्या उर्वरित क्षेत्रांच्या प्रशासन पातळीइतकी उंचावण्यासाठी ते राज्य भारत सरकारच्या मान्यतेने हाती घेईल अशा विकास योजनांचा खर्च भागविणे राज्याला शक्य व्हावे यासाठी आवश्यक आर्थिक तरतूदी.

* अनुच्छेद ३३०–लोकसभेत अनुसूचित जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवणे.
* अनुच्छेद ३३४–राखीव जागा व विशेष प्रतिनिधित्व चाळीस वर्षानंतर समाप्त होणे.
* अनुच्छेद ३३५–सेवा व पदे यावर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे हक्क.
* अनुच्छेद ३३८ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता एक विशेष अधिकारी असेल व तो राष्ट्रपतीने नियुक्त करावयाचा असेल.
* अनुच्छेद ३३९–अनुसूचित क्षेत्रांचे प्रशासन व अनुसूचित जमातीसंबंधीचे कल्याणकार्य यावर संघराज्याचे नियंत्रण.
* अनुच्छेद ३४२ नुसार संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जमाती मानल्या जातील. त्या जमाती किंवा जमाती-समाज अथवा जमाती किंवा जमाती-समाज यांचे भाग किंवा त्यातील गट विनिर्दिष्ट करणे.
* अनुच्छेद ३७१ (क) नागालॅण्ड राज्याबाबत विशेष तरतुदी.

# अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे तपासणी

शं. वि. देशमुख

अनुसूचित जमातीचे अर्थात आदिवासी असल्याबद्दलचा अनेक लोक दावा करतात व तशी जाती-जमातीची प्रमाणपत्रे मिळवितात. केंद्र व राज्य शासनाकडे जागेची खोटी प्रमाणपत्रे घेत असल्याच्या अनेक तक्रारी आल्या आहेत आणि येत आहेत. त्यामुळे खऱ्या आदिवासीना सवलतीपासून वंचित रहावे लागले. महाराष्ट्रात लोकसेवा आयोगामार्फत मिळणाऱ्या नोकऱ्या, वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात अनुसूचित जमातीच्या नावावर मिळणारे प्रवेश, शासनाच्या विविध खात्यात राखीव जागांवर मिळणाऱ्या नोकऱ्या व बढत्या यासाठी जातीची खोटी प्रमाणपत्रे मिळविली जात असल्याच्याही अनेक तक्रारी आहेत. या गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी व अशी प्रमाणपत्रे तपासण्यासाठी शासनाने "अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीची" स्थापना केली आहे.

अनुसूचित जमातीच्या नावावर जातीची खोटी प्रमाणपत्रे कशी मिळविली जातात. जातीच्या प्रमाणपत्राची अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून तपासणी कोणत्या प्रकारे होते, त्याबद्दलची प्रशासकीय कार्यप्रणाली कशी आहे, इत्यादिबाबत संक्षिप्त माहिती सर्वांना व्हावी, हा या लेखाचा उद्देश आहे.

भारतीय घटनेच्या अनुच्छेद क्र. ३४२ प्रमाणे अनुसूचित जमातीची यादी मा. राष्ट्रपती यांचे आदेशानुसार प्रस्तुत केली जाते. भारतीय घटना अंमलात आल्यानंतर अशा प्रकारची अनुसूचित जमातीची यादी सर्वप्रथम १९५० मध्ये प्रस्तुत करण्यात आली. घटनेच्या अनुच्छेद ३४२ अन्वये संसदेला कायद्याद्वारे कोणतीही जनजाती किंवा जनजाती समाज अथवा कोणतीही जनजाती किंवा जनजाती यांचा भाग किंवा त्यातील गट घटनेच्या अनुच्छेद ३४२ खंड (१) अन्वये राष्ट्रपतींनी काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जनजमातीच्या सूचीत समाविष्ट करता येईल किंवा तीमधून वगळता येईल, पण उक्त तरतुदीनुसार काढलेल्या अधिसूचनेत नंतरच्या कोणत्याही अधिसूचद्वारे पूर्वोक्तानुसार असेल त्याहून अन्यथा फरक केला जाणार नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळात अनुसूचित जाती/जमाती अथवा विमुक्त जाती व मागासवर्गीय अशा गट निर्देशक संज्ञा नव्हत्या. तरीसुद्धा मागासवर्गीयांकरिता विशेष सवलती दिलेल्या होत्या की, जेणेकरून मागासवर्गीय समाज हा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक बाबतीत इतर समाजाबरोबर येऊ शकेल. अशाप्रकारच्या सवलतींना प्रथम वैधानिक स्वरुप १९३५ च्या कायद्यान्वये दिले गेले होते. त्यावेळी मागासवर्गीयांचे पुढीलप्रमाणे तीन गटात वर्गीकरण करण्यात आलेले होते.

अ) "दलित वर्ग" ( Depressed Class ) यात पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य वर्गाचा समावेश होता

ब) "प्राचीन व वन्य जमाती" हे लोक फार मोठ्या प्रमाणावर जंगलात वास्तव्य करून आहेत.

क) "इतर मागासवर्गीय" यांच्यामध्ये भटक्या व इतर मागासवर्गीय जमातींचा समावेश होता. या जाती जमातीविषयी विशेष काळजी घेणे आवश्यक होते.

त्यानंतर १९४२ मध्ये वरील वर्गीकरण बदलून परिशिष्ट "अ" व "ब" अनुक्रमे अंत:स्थितीत (Intermediate) आणि मागासलेला (Backward) असे वर्गीकरण करण्यात आले. भारतीय घटना अंमलात आल्यानंतर, अनुच्छेद ३४२ अन्वये जे परिशिष्ट प्रस्तुत करण्यात आले, त्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमातींना अनुसूचित जमाती अशा संज्ञा प्राप्त झाल्या.

अनुसूचित जमातीची यादी बनविताना केंद्र शासनाने काही निष्कर्ष ठरविले होते. या संबंधीचे पुढील चार निकष महत्त्वाचे ठरविलेले आहेत.

१) प्राचीन लक्षणे ( Primitive traits)

२) भिन्न संस्कृती (District culture)

३) भौगोलिक अलगता ( Geographial isolation)

४) संपर्काचा अभाव व सर्वसाधारण मागासलेपणा (Shyness in Contact and backwardness)

वरील निकष लक्षात घेऊन काही जमातींची यादी घटनेतील अनुच्छेद ३४२ ला अनुसरून प्रस्तुत करण्यात आली आहे. या तरतुदीनुसार ज्या जमाती यादीत समाविष्ट आहेत त्यांना अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) असे म्हटले जाते. या जमातीच्या उन्नतीसाठी विकासासाठी विशेष सोयीसवलती, शैक्षणिक आर्थिक व सामाजिक देण्यात आल्या आहेत.

**अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे व ती देताना घ्याव-याची दक्षता–**

अनुसूचित जमातीच्या विकासासाठी व कल्याणासाठी केंद्र व राज्यशासनाकडून, निरनिराळ्या योजना राब-विल्या जात आहेत. तसेच भारतीय संविधानातही त्यांना काही खास सवलती आणि हक्क दिले आहेत. या सर्व योजनांचा व सवलतींचा उद्देश अनुसूचित जमातीचा सर्वांगीण विकास व्हावा, हा आहे. ह्या जमाती शेकडो वर्षे विशिष्ट भौगोलिक, सामाजिक परिस्थितीत राहि-ल्याने त्या निकृष्ट प्रतीचे जीवन जगतात. त्यांचा जलद-गतीने विकास झाला पाहिजे याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. पण प्रश्न निर्माण होतो तो असा की ज्या सोयी सवलती घटनेने दिल्या आहेत. त्या खरोखर खऱ्या आदिवासींना मिळतात काय? की त्यांच्या नावावर दुसरेच नकली आदिवासी या सव-लतींचा लाभ मिळून खरा आदिवासी मात्र सोयीसव-लतीपासून वंचित रहातो.

अनुसूचित जमातीकरिता देण्यात आलेल्या विशेष सवलती ह्या नकली किंवा गैर आदिवासींकडून लुबा-डल्या जातात. अशाप्रकारच्या अनेक तक्रारी केंद्र व राज्य शासनाकडे वेळोवेळी करण्यात येतात. ह्या सोयी सवलती प्राप्त करुन घेण्याकरिता अनुसुचित जमातीच्या व्यक्तीला जी व्यक्ती अनुसूचित जमातीची असल्या-बद्दलचे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याकडून घ्यावे लागते. म्हणजे थोडक्यात अनुसूचित जमातीच्या सवलती उप-भोगण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची जरूरी असते. त्या शिवाय कोणतीही व्यक्ती सवलतीला पात्र ठरू शकत नाही. ही बाब लक्षात येऊन केंद्र व राज्य शासनाने या संबंधात वेळो-वेळी सतर्कतेच्या आणि धोक्याच्या सूचना संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत की, जेणेकरून जाती अथवा जमातीचे प्रमाणपत्र हे त्या जाती–जमातीच्या अनूसूचित जाती–जमातीचे प्रमाणपत्र देतेवेळी कोण-तीही दक्षता घ्यावयाची या सूचना तर दिल्या गेल्याच, त्या व्यतिरिक्त सक्षम अधिकाऱ्यांनी सतर्क राहावे व त्यांच्याकडून बिगर आदिवासींना आदीवासी असल्या-बद्दलची प्रमाणपत्रे मिळू नयेत या उद्देशाने, अशाही सूचना देण्यात आल्या आहेत की, अशाप्रकारे जातीची प्रमाणपत्रे दिली गेली तर संबंधित सक्षण अधिकाऱ्यांवर भारतीय दंडसंहितेनुसार कार्यवाही केली जाईल. या व्यतिरिक्त त्यांना लागू असलेल्या सेवानियमांतर्गत शिस्तभंगाची कार्यवाही सुद्धा केली जाईल. असे असून-सुद्धा नकली व गैरआदिवासींना अशी प्रमाणपत्रे मिळ-ण्याचे प्रमाण कमी न होता वाढलेले दिसते. साहजिकच, त्यामुळे केंद्र व राज्य शासनाकडे यासंबंधी येणाऱ्या तक्रारीची संख्या वाढत राहिली आहे.

**सुधारित पद्धत ठरविण्याकरिता श्रीनिवासन समि-तीची नियुक्ती–**

गैर आदिवासीनी आदिवासी असल्याबद्दलचे प्रमाण-पत्र मिळू नये, त्यासाठी जाती प्रमाणपत्र देण्याच्या पद्धतीत सुधारणा करणे आवश्यक होते व तसे केले तरच खऱ्या आदिवासीना संरक्षण मिळू शकेल, या उद्देशाने राज्य शासनाने, निर्णय दिनांक २५ जुलै १९८० अन्वये श्री के. बी. श्रीनिवासन, सचिव, (उर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली पाच सभासदांचा समावेश करून एका समितीची स्थापना केली. या समितीची निर्मिती होण्यापूर्वी संचालक, समाज कल्याण, यांचेकडून या-संबंधी सर्वेक्षण करण्यात आले व त्या सर्वेक्षणात असे निदर्शनास आले होते की, जमातीची अशी खोटी प्रमाणपत्रे मिळविण्याचे प्रमाण ६० प्रतिशत एवढे आहे. हे सर्वेक्षण, वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या जागांवर प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित होते.

शासनाने निर्माण केलेल्या श्रीनिवासन समितीचे मुख्य काम अनुसूचीत जमातीची प्रमाणपत्र देण्यासंबंधीत अस्तित्वात असलेल्या नियमाचा व प्रणालीचा सखोल अभ्यास करून त्यामध्ये कोणत्या सुधारणा करणे व सुधारित कोणती पद्धती व प्रणाली अंगीकारावी की जेणेकरून गैर आदिवासीना ते अनुसूचित जमातीचे असल्याबद्दलची प्रमाणपत्रे मिळणार नाहीत. या समि-तीने आपला अहवाल शासनास सादर केला व शासनाने त्या अहवालातील शिफारशी स्वीकारून त्या शासन

असलेल्या लोकांनाच मिळतील व इतरांना ते मिळणार नाही. अशा सूचना १९५३, १९७५ व १९७९. १९८०, १९८५ सालात विस्ताराने दिलेल्या आहेत. यामध्ये निर्णय दिनांक २९ सप्टेंबर १९८० अन्वये प्रस्तुत केल्या. या निर्णयामध्ये एक सूचना अशी होती की, वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या जागांवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना तात्पुरता प्रवेश द्यावा व त्यानंतर त्याच्या जमातीची प्रमाणपत्रे उपसंचालक, समाजकल्याण, यांनी तपासावीत. दिनांक २९ ऑक्टोबर १९८० चा हा शासन निर्णय क्रांतीकारक ठरला. या शासन निर्णयातील तरतूदीचा आज वापर करण्यात येत आहे.

**मागासवर्गीयांकरिता तपासणी समितीची निर्मिती–**

या कामात आणखी सुसूत्रता यावी व शक्यतो पळवाट राहू नये या उद्देशाने शासनाने निर्णय दिनांक २४ फेब्रुवारी १९८१ अन्वये एक जाती–जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती निर्माण केली. त्या समितीत १) संचालक, समाज कल्याण २) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे ३) उपसंचालक, समाज कल्याण, यांचा समावेश होता. ही समिती मागासवर्गीयात मोडणाऱ्या सर्व जाती–जमातीकरिता होती. या समितीचे कार्यक्षेत्र, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे मार्फत मागासवर्गीयांकरिता व वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यापुरते मर्यादित होते. या समितीने अंगीकारलेल्या पद्धतीनुसार या उमेदवाराना मुलाखतीसाठी बोलाविले जाई व त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्याच्या जाती–जमाती संबंधी निर्णय, सेवाविषयक प्रकरणात, त्यांच्या विभागाला व शैक्षणिक प्रकरणात संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविला जाई. हे असे करण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यावेळच्या तरतुदीनुसार संबंधित उमेदवास प्रथम तात्पुरती नेमणूक दिली जात असे. तसेच संबंधित विद्यार्थ्याला महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश दिला जात असे.

**उच्च अधिकारक्षम समितीची निर्मिती–**

उपरोक्त कार्यवाही करूनही जाती–जमातीच्या खोटया प्रमाणपत्राचे प्रमाण कमी झाले नाही व अपेक्षित तो परिणाम साधता आला नाही. यावर आणखी कोणता प्रभावी उपाय करता येईल या दृष्टीकोणातून मंत्री महोदय, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक १८ मार्च १९८३ अन्वये एक "समक्ष समिती" (High Power Caste Committee) निर्माण करण्यात आली. या समितीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

१) जाती-जमातीच्या प्रमाणपत्राच्या तपासणीकरिता प्रणाली ठरविणे की जेणेकरून संबंधित उमेदवार हा खरा आदिवासी आहे की नाही हे ठरविता येईल.

२) वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे एकत्रीकरण करून त्यांचे नियमांमध्ये रूपांतर करणे.

३) आदिवासीची संस्कृती, चालीरीती, देवदेवता, भाषा, प्रदेश इत्यादी बाबी लक्षात घेऊन त्यासंबंधित मार्गदर्शक सूचना तयार करणे की जेणेकरून आदिवासीच्या नावावर कोणकोणत्या गैर आदिवासी जाती घेतात हे ओळखता येईल, व त्यामुळे जाती व जनजातीमधील जाथी प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांना सहज ओळखता येते. येथे एक गोष्ट प्रकर्षाने नमूद करावी लागेल ती ही की, खोटी प्रमाणत्रे मिळविणाऱ्या लोकांचे सर्वात जास्त प्रमाण नामसादृश्य दुसऱ्या जातीमध्ये आहे. नामसादृश्याचा फायदा घेऊन त्या जातीचे अनुसूचित जमातीचे असल्याबद्दलचा दावा करतात व सक्षम अधिकाऱ्यांची दिशाभूल करून अगर अन्य मार्गांनी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्रे मिळवितात.

आदिम जाती समितीने ( High Power Caste Committee ) केलेल्या शिफारशीनुसार, अनुसूचित जमाती संबंधीची प्रकरणे तपासण्याकरिता शासन निर्णय २३ जानेवारी १९८५ अन्वये '' स्वतंत्र तपासणी समिती'' निर्माण करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय २४ एप्रिल १९८५ अन्वये जाती-जमाती प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम असलेल्या अधिकाऱ्याकरिता जाती जमातीच्या जाती वैशिष्टयाबाबत व साधर्म्याबाबत मार्गदर्शक सूचना प्रस्तृत करण्यात आल्या.

**फक्त अनुसूचित जमातीकरिता निर्माण करण्यात आलेली तपासणी समिती कार्य व पद्धती–**

या तपासणी समितीचे कार्य पुढीलप्रमाणे आहे.

१) जे विद्यार्थी शैक्षणिक संस्थामध्ये अनुसूचित

जमातीकरिता राखीव असलेल्या जागांवर प्रवेश घेऊ इच्छितात, अशांच्या जाती प्रमाणपत्राची तपासणी करणे.

२) महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा तत्सम निवड मंडळाकडून अनुसूचित जमातीकरिता नोकरीत राखीव असलेल्या जागांवर नेमणुकीबाबत दावा करणाऱ्या उमेदवाराचे जातीप्रमाणपत्र तपासणे.

३) संबंधित विभागाने अथवा कार्यालयाने नोकरीत असलेल्या सेवकाविषयी तक्रार केल्यास, अशांची जाती प्रमाणपत्र तपासणे.

४) जमातीसंबंधीचे दावे तपासण्यास शासनाने सांगितल्यास अशी प्रकरणे तपासणे.

तपासणी समितीच्या कार्यकक्षेत जरी वर दिल्याप्रमाणे प्रकरणे येत असली तरी आवश्यक तो अधिकारी व कर्मचारी वर्ग अद्याप उपलब्ध न झाल्यामुळे सध्या हे काम वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या जागांवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांपुरते व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या उमेदवारापुरते मर्यादित आहे. याशिवाय शासनाच्या विविध प्रशासकीय विभागाने पाठविलेल्या सेवाविषयक प्रकरणात समितीकडून जातीच्या दाव्याची व प्रमाणपत्राची तपासणी करण्यात येते.

शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी १९८५ अन्वये निर्माण करण्यात आलेल्या तपासणी समितीची कार्यप्रणाली सारांशरूपाने पुढीलप्रमाणे आहे.—

१) जे विद्यार्थी १२ वी सायन्समध्ये शिकतात व अनुसूचित जमातीचे असल्याबद्दलचा दावा करतात, अशा विद्यार्थ्यांना जर वैद्यकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल तर त्यांना तपासणी समितीकडे त्यांच्या जमातीचा दावा तपासण्याकरिता अर्ज करावा लागतो. असे अर्ज करण्याविषयी वर्तमानपत्रे/रेडिओ/टेलिव्हीजन व संबंधित शैक्षणिक संस्थांकडे परिपत्रके पाठवून सूचना दिल्या जातात.

२) सेवाविषयक प्रकरणामध्ये जे उमेदवार अनुसूचित जमातीचा असल्याबद्दलचा दावा करतात त्यांच्या मुलाखती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत संबंधित उमेदवाराच्या जमाती प्रमाणपत्राच्या आधारे घेतल्या जातात व ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांची नावे संबंधित विभागाकडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पाठविली जातात. त्यानंतर संबंधित विभागाकडून अशी प्रकरणे जमातींचा दावा तपासण्याकरिता तपासणी समितीकडे पाठविली जातात.

३) शैक्षणिक व सेवाविषयक प्रकरणे तपासणी समितीकडे प्राप्त झाल्यानंतर, तपासणी समितीकडून ती अलगअलग पंजीबद्ध केल्या जातात. व प्रत्येक प्रकरणाला पंजीक्रमांक दिला जातो. त्यानंतर प्रत्येक प्रकरणांत प्राप्त झालेल्या कागदपत्रांची तपासणी केली जाते. व या तपासणीनंतर संबंधितांना तपासणी समितीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांची त्वरित पूर्तता करण्याविषयी लिहिले जाते.

४) आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक उमेदवाराला वैयक्तिक मुलाखतीकरिता व त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता बोलाविले जाते. विद्यार्थ्यांचे बाबती अशा मुलाखती विभागीय पातळीवर घेतल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुणे येथे यावे लागत नाही. मुलाखतीच्या वेळी उमेदवाराचे आई-वडिल अथवा पालकांना आणण्याविषयी प्रामुख्याने सांगितले जाते.

५) मुलाखतीच्या वेळी संबंधित उमेदवाराला व त्याचे पालकाला त्यांच्या कुटुंबाबाबत, नातेसंबंधाबाबत माहिती विचारली जाते. त्यानंतर उमेदवाराचे म्हणणे तपासणी समिती ऐकते व लिहून घेते. ते पुन्हा उमेदवाराला व योग्य त्याचे पालकाला वाचून दाखविले जाते व त्यानंतर निवेदन उमेदवार व त्याचे पालक यांना ते मान्य झाल्यावर त्यांची त्यावर स्वाक्षरी घेतली जाते.

६) उमेदवाराने दिलेल्या माहितीच्या आधारे शालेय, कौटुंबिक व गृहचौकशी केली जाते. वेळप्रसंगी नातेवाईकांचीही चौकशी केली जाते. हे सर्व झाल्यानंतर प्रत्येक प्रकरणावर समिती पूर्ण विचार करून निर्णय घेते.

७) ज्या प्रकरणामध्ये निर्णय उमेदवाराविरुद्ध असेल अशा सर्व प्रकरणामध्ये "बोलके आदेश" (Speaking orders) दिले जातात. त्यात जमातीसंबंधीचा दावा नाकारसंबंधीच्या विस्तृत चर्चा केलेली असते. तसेच अशा प्रकारामध्ये तपासणी समितीने दिलेला निर्णय मान्य नसल्यास त्यासाठी जी अपिल करण्याची

तरतूद आहे ती संबंधित उमेदवाराच्या नजरेस आणून दिली जाते. ज्या प्रकरणामध्ये जमातीसंबंधीचा दावा तपासणी समितीने ग्राह्य ठरविला असेल अशा प्रकरणांमध्ये तपासणी समितीकडून उमेदवाराचे प्रमाण-पत्र ग्राह्य असल्याबद्दलचे निराळे प्रमाणपत्र (Validity certificate) दिले जाते.

**निर्णय दिल्यानंतर तपासणी समितीस करावे लागणारे कार्य—**

तपासणी समितीचे काम, जमातीचा दावा तपासून निर्णय दिला म्हणजे संपते असे नाही. ज्या प्रकरणामध्ये संबंधित उमेदवार त्याने दावा केलेल्या अनुसूचित जमातीचा नाही, असा निर्णय दिला असेल, त्यातील बहुतांशी उमेदवार अपिल प्राधिकाऱ्यांकडे अपिल दाबा दाखल करतो. अर्थात ही प्रकरणे तपासणी समितीच्या निर्णयाविरूद्ध असल्यामुळे, तपासणी समिती प्रतिवादी असते. त्यामुळे अशा प्रकरणामध्ये अपिलमेमोस उत्तरे देऊन आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे व अपील प्राधिकाऱ्यासमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून तपासणी समितीची बाजू मांडणे, ही सर्व कामे तपासणी समितीस करावी लागतात.

यानंतरची पायरी म्हणजे ज्या प्रकरणात अपील प्राधिकाऱ्याकडून उमेदवाराचे विरूद्ध निर्णय दिले जातात. अशी प्रकरणे पुढे उच्च न्यायालयात दाखल होतात. येथेही शासनाच्या वतीने पुढील सर्व कार्यवाही तपासणी समितीस करावी लागते. तद्वतच ज्या प्रकरणा-मध्ये अपिल प्राधिकाऱ्याकडून तपासणी समितीच्या निर्णया विरूद्ध निर्णय दिले जातात, अशा काही प्रकरणामध्ये तपासणी समितीकडून "पुनरनिरीक्षण—अपिल" शासनाकडे सादर केले जातात.

सर्वात शेवटची पायरी म्हणजे काही प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात जातात. अशीही काही प्रकरणे सध्या सुप्रिम कोर्टात दाखल करण्यात आलेली आहेत.

**खोटी जातीची अथवा जमातीची प्रमाणपत्रे—**

हे सर्व वाचल्यानंतर वाचकांचे मनात साहजिकच प्रश्न उपस्थित होईल की, खोटी जातीची अथवा जमातीची प्रमाणपत्रे कशी घेतली जातात? काही जाती अशा आहेत की, त्यांची नावे अनुसूचित जमाती किंवा आदिवासी जमातीसारखी आहेत, तर काही जमातीच्या उपजमातीची नावे व काही जातीची नावे सारखी आहेत.

शाळेत नाव टाकताना पालकांनी सांगितलेली जात ही खरोखरच त्या व्यक्तीची जन्माची जात आहे किंवा नाही हे तपासले जात नाही. त्यासंबंधीचा कोणताच पुरावा शाळा मागत नाही. पालक सांगेल व अर्जात लिहून देईल ती जात नोंदली जाते. परंतु तपासणी समितीच्या असे निदर्शनास आले की, शाळेच्या रेकॉर्ड-मध्ये मुलाची जात अलग व बापाची जात अलग अशी वस्तुस्थिती दिसते. बापाचे जुने रेकॉर्ड पाहिल्यावर व गावात आणि नातेवाईकाकडे चौकशी केल्यावर त्या व्यक्तीची खरी जात उघडकीला येते. केंद्र शासनाच्या अशा स्पष्ट सूचना आहेत की, एखाद्याच्या जातीचा दावा तपासताना त्याची जात ही त्याच्या आई-वडि-लांच्या जातीवरून ठरवावी, त्यामुळे बाप एका जातीचा तर मुलगा आदिवासी अशी आजची स्थिती आढळते. दुसरे असे की, शैक्षणिक संहितेखाली अशी तरतूद आहे की, जर एखाद्याची जात चुकीची लागली असेल तर त्याला ती जात दुरुस्त करता येते. तसेच जर एखा-द्याची जात नमूद केलेली नसेल तर त्याला जात नमूद करून घेता येते. या तरतुदीचा गैरफायदा घेऊन काही पालकांनी आपल्या जातीत अथवा आपल्या पाल्याच्या जातीत पूर्णतः बदल करून घेऊन त्यांना सोईची अस-लेल्या अनुसूचित जमातीची नोंद नमुद करून घेतली आहे. वास्तविक जातीच्या नोंदीत दुरुस्ती करणे याचा अर्थ स्वतःची मूळ जात बदलून नवी जात लावणे असा होत नाही. पण तसा अर्थ आज लावला जातो, हे दुर्दैव म्हटले पाहिजे.

**तपासणी समितीच्या कामात येणाऱ्या अडचणी—**

तपासणी समितीचे काम मोठे जिकरीचे व गुंता-गुंतीचे झालेले आहे. न्यायालयाने दिलेला निकाल, अपिल प्राधिकाऱ्यांनी दिलेले निकाल, वेगवेगळ्या संघटनाकडून सांघिकरित्या करण्यात येणारे प्रयत्न, वैयक्तिक पातळीवरून रेकॉर्डमध्ये केलेले फेरबदल अथवा नव्याने तयार केलेले रेकॉर्ड इ. बाबीमुळे तपा-सणी समितीचे काम अत्यंत क्लिष्ट व जोखमीचे झालेले आहे.

तपासणी समितीच्या कामात प्रामुख्याने पुढे दर्शक-वलेले अडथळे येतात, त्यामुळे तपासणी समितीला बहु-

तांशी प्रकरणे त्वरित निकालात काढणे शक्य होत नाही.

१) अत्यंत अपुरा अधिकारी व कर्मचारी वर्ग-तपासणी समितीचे काम जवळजवळ न्यायालयात चालणाऱ्या प्रकरणांसारखे असते. त्यामुळें निष्णात व पुरेसा अधिकारी व कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.

२) जी प्रकरणे न्यायप्रविष्ट होतात, त्या प्रकरणामध्ये तपासणी समिती म्हणजेच पर्यायाने शासनाची बाजू मांडण्यासाठी निष्णात वकील देणे अत्यंत आवश्यक असते.

३) अनवधानाने झालेला पत्रव्यवहार, नामसादृश्याचा फायदा घेऊन काही जातींनी शासनाकडे पत्रव्यवहार केला. जाती जमाती यामधील भेद लक्षात न आल्यामुळे आपल्या जातीचा समावेश अनुसूचित जमातीत करण्यात आला आहे, असे अनावधानाने कळविले गेले. वास्तविक एखाद्या जातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्याची बाब ही राज्य शासनाच्या कक्षेत येत नाही.

४) अनुसूचित जमातीची फार मोठ्या प्रमाणात प्रगती झाल्याचा निर्माण करण्यात येणारा आभास॰ वास्तविक ज्या प्रमाणात अशा प्रकारचा आभास निर्माण करण्यात येतो, तो वस्तुस्थितीशी पूर्णत विसंगत आहे. अनुसूचित जमातीची काही उन्नती ही निश्चित झाली. परंतु खोट्या लोकांनी निर्माण केलेल्या आभासापेक्षा फार कमी ही उन्नती आहे. आदिवासींपैकी जी कुटुंबे शिक्षित होऊन पुढे आली आहेत. अशी कुटुंबे सुद्धा आपल्या जमातीविषयीची माहिती देतात व जमातीच्या विशिष्ट काही चालीकरिता अद्यापही पाळतात कीं, ज्यामुळे ते त्या जमातीपैकीच आहेत याबद्दलची खात्री पटू शकते. याउलट मासलेवाईक उत्तरे दिली जातात. उदा. जर एखाद्याने गोंड या अनुसूचित जमातीचा आपल्याबद्दलचा दावा केला तर साहजिकच त्यास गोत्र, "देवपद्धती" म्हणजे काय असे विचारले जाते. याची उत्तरे अशी मिळतात की, आम्ही देव मानीत नाही. "देवपद्धती" आमच्यात नाही. गोंड जमातीची व्यक्ती कितीही शिकली तरी किती देव तुम्ही आहात ? असें विचारल्यावर पटकन सांगेल की, "मी, ३, ४, ५, ६, ७ यापैकी कोणत्या तरी एका "देवपद्धतीचा" आहे.

५) क्षेत्रबंधन उठविण्यासंबंधीचा १९७६ चा कायदा येण्यापूर्वी १९५६ ते १९७६ या कालावधीत अनेक जमातींना विशिष्ट क्षेत्रात अनुसूचित मानले होते. म्हणजेच त्यांच्यावर क्षेत्रबंधन होते. क्षेत्रबंधन याचा अर्थ असा की, विशिष्ट भागात राहाणाऱ्या विशिष्ट जमाती या अनुसूचित जमातीमध्ये गणल्या जात. केंद्र तसेच राज्य शासनाच्या असे निदर्शनास आले की, काही कुटुंबे अनुसूचित जमातीची असली तरी क्षेत्रबंधनाच्या बाहेर राहात असल्यामुळे त्यांना अनुसूचित जमातीचे फायदे मिळत नाहीत. न्यायाच्या दृष्टीने हे योग्य नव्हते व अशा लोकांना जरी ते क्षेत्रबंधनाच्या बाहेर राहत असले तरी त्यांना अनुसूचित जमातीचा फायदा मिळावा या एकमेव उद्देशाने केंद्र शासनाने १९७६ चा क्षेत्रबंधन उठविण्याचा कायदा केला. गैर आदिवासी जाती-जमातीपूर्वी कधीही अनुसूचित क्षेत्रात नव्हत्या, त्यांचा अधीही क्षेत्रबंधनात असलेल्या जमातींशी बेटी-व्यवहार नव्हता, असे लोक नामसादृश्याचा फायदा घेऊन आपण अनुसूचित जमातीचा असल्याबद्दलची बतावणी करतात. परंतु चौकशीचे वेळी अथवा मुलाखतीचे वेळी मूळ जमातीशी कोणत्याही प्रकारचा संबंध नडल्याचे दिसते व त्यांच्या जाती जमातीशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसल्याचे दिसते व त्यांच्या जाती जमातीचे मूळकूळ, कुळाचार, बोलीभाषा, चालीरिती इ. वेगळेच असल्याचे दिसून येतात.

६) असहकार-तपासणी समितीचे काम उमेदवाराकडून मिळणाऱ्या सहकार्यावर फार मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे बहुतांशी प्रकरणात तपासणी समितीकड आवश्यक असलेली कागदपत्रे पाठविली जात नाहीत. कारण अशी कागदपत्रे सादर करणे ती कागदपत्रे उमेदवाराने केलेला जमातीचा दावा सिद्ध करण्यासाठी पोषक नसल्यामुळे अडचणीचे असते. याउलट उमेदवाराला पोषक असलेली कागदपत्रे व विशेषतः अलीकडील काळातील कागदपत्रे की, ज्यात जाती फेरफार करून लावलेल्या असतात, अशीच कागदपत्रे दाखविली जातात. मुलाखतीच्या वेळी वडिलांचे शिक्षणाविषयी माहिती विचारली असता काही प्रकरणामध्ये वडील अशिक्षित आहेत असे सांगण्यात येते. त्यामुळे साहजिकच वडिलांच्या शालेय कागदपत्रांची चौकशी करणे दुरापास्त होते. केलेल्या तपासाअंती त्यांच्या शाळेच्या रेकॉर्डमध्ये त्यांच्या जातीची नोंद उमेदवाराने दावा केलेल्या जातीपेक्षा भिन्न असते.

७) ज्या जातींची व जमातीची नांवे सारखीच आहेत अशा जातीच्या बाबतीत कागदोपत्री पुरावे देणे शक्य होत नाही. अशा प्रकरणामध्ये जाती जमातीच्या चालीरीती, रूढी, परंपरा, देवदैवता, लग्नसंबंध, भाषा नातीगोती इत्यादी बाबी लक्षात घेऊन निर्णय घ्यावयास पाहिजेत. जाती जमातीच्या जीवन वैशिष्टयांचे बारकावे लक्षात घेतले पाहिजेत, जाती जमातीची पूर्वपीठीका लक्षात घेतली पाहिजे. परंतु सर्व स्तरांवरती आज असे घडत नाही. हे न होण्यास अन्यही कारणे असू शकतात. परिणाम मात्र एकच होतो की, जे गैरआदिवासी आहेत, नकली आहेत त्यांना आदिवासी म्हणून गणले जाते. पर्यायाने खऱ्या आदिवासींचे मात्र नुकसान होते.

वरील सर्व गोष्टीचा साकल्याने विचार केल्यास, तपासणीचे काम जास्त विस्तृत करून, त्याकरिता पुरेशी यंत्रणा त्वरित निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. असे केल्यास, आज जो आदिवासीच्या नांवावर खर्च होतो परंतु तो खऱ्या आदिवासीपर्यंत पोहचत नाही, तो थांबेल तसेच गैर किंवा नकली आदिवासीकडून खऱ्या आदिवासीचे होणारे शोषण व पिळवणूक मोठ्या प्रमाणात थांबविता येईल. प्रमाणपत्राची तपासणी आवश्यक आहे ही बाब सर्वोच्च व उच्च न्यायालयानी वेळोवेळी मान्य केली आहे व तशा मार्गदर्शक सूचनाही दिलेल्या आहेत.

# संकल्प-पत्र

आजादी के बाद से ही हमारे देश में विकास योजनाये बनती रही है। लेकिन इनका परिणाम आम देशवासियों के लिये लाभप्रद होने के बजाय लगातार अहितकर ही रहा है।

'सरदार सरोवर परियोजना' ऐसी ही एक और विकास की परियोजना बनायी गई है, जिससे लाखों लोगों के भविष्य और उनके जीवन पर ही प्रश्न चिन्ह लग गया है। नर्मदा घाटी की उपजाऊ जमीन, सदियों से ग्रामीण आदिवासियों के जीवन चलाने वाले और पर्यावरण के रक्षक जंगल बेशुमार रहवासी बस्तियों को डुबाने वाली तथा लाखों लोगों को अपनी जड़-जमीन से उखाड़ने वाली ऐसी राक्षसी परियोजना का हम भारत के नागरिक, विरोध करते है।

गणतन्त्र दिवस के पावन अवसर पर हम सब नागरिक संकल्प करते है कि "सरदार सरोवर" और ऐसी ही दूसरी विनाशकारी परियोजनाओं का विरोध करते रहेंगे। मानव जाति को विनाश की ओर धकेलने वाली ऐसी परियोजना को हम सब नामंजूर करते है, ताकि हमारी भावी पीढी, संस्कृति, समाज और पर्यावरण सुरक्षित बच सकें।

—नर्मदा घाटी नव निर्माण समिती
गुजरात

# बनावट आदिवासी! बोगस प्रमाणपत्रे!!

दादा तळपे

महाराष्ट्र शासनाने नुकतीच आमदार शिवाजीराव मोघे यांच्या अध्यक्षतेखाली नऊ आमदारांची समिती, जमातीच्या बनावट प्रमाणपत्रधारकांनी निर्माण केलेल्या प्रश्नांवर अभ्यास करण्यासाठी नेमली असून तिला आपला अहवाल तीन महिन्यांत सादर करावयाचा आहे.

या समितीपुढे १) जमातीची प्रमाणपत्रे देण्यासाठी व त्या अनुषंगाने येणाऱ्या बाबींसाठी एक स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता आहे काय? २) आदिवासींना ओळखपत्रे द्यावीत काय? ३) इ. स. १९७६ ते १९८१ च्या दरम्यान (क्षेत्रबंधन उठविल्यामुळे) फक्त ॲफिडेव्हिटवर दिलेली प्रमाणपत्रे रद्द करावीत काय? वगैरे प्रस्ताव अभ्यासासाठी आहेत. असे विश्वसनीय सूत्राकडून समजते. परंतु शासनावर ही वेळ का यावी? हा खरा सवाल आहे!

स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींच्या शोषणाचे, पिळवणूकीचे मार्ग भिन्न होते. त्यामुळे आदिवासींचे जीवन उद्ध्वस्त झाले. त्यातूनही कसाबसा तग धरून राहिलेल्या या समाजाला स्वातंत्र्योत्तर काळात इतर सामाजिक प्रवाहाबरोबर आणण्यासाठी भारतीय राज्य घटनेने काही खास सवलती व राखीव जागा निर्माण केल्या. घटनेच्या कलम ३४२ नुसार राष्ट्रपती आदिवासी जमातींची यादी जाहीर करतात. त्यांनाच अनुसूचित जमाती म्हणतात. सवलती व राखीव जागांचे फायदेही या यादीतील जमातींनाच मिळतात.

अलीकडच्या काळात शोषणाचे, पिळवणुकीचे मार्ग फक्त बदलत गेले परंतु ते थांबलेले नाही. धरणे, लष्कर, अभयारण्ये, इ. सारख्या मोठमोठ्या प्रकल्पांना जमिनी गेल्या त्या फक्त आदिवासींच्या पुनवर्सनाअभावी विस्थापीत होऊन देशोधडीला लागले ते फक्त आदिवासी. राष्ट्राच्या विकासासाठी त्याग करणाऱ्या या समाजाला ज्या सवलती घटनेने दिल्या त्याही इतरांच्या डोळयात खुपू लागल्या आणि एखाद्याच्या तोंडचा घास हिसकावा त्याप्रमाणे इतर पुढारलेल्या जातीतील लोकांनी जमातीचे खोटे दाखले मिळवून राखीव जागा व सवलती हडप केल्या.

## खोटे दाखले मिळण्याचे मार्ग

**नाम साधर्म्य**:– अनुसूचित जमातीतील काही नावे अशी आहेत की ज्यांची नावे इतर प्रस्थापित जातींच्या नावाशी मिळती-जुळती आहेत किंवा काही शब्दांमध्ये साम्य आहे. त्या आधारे बिगर आदिवासी आपला दावा सांगतात. उदा., हालबा-हलबी या जमातीच्या नावावर हलबा-कोष्टी व इतर कोष्टी जाती; २) महादेव कोळी (डोंगर कोळी) या जमातीच्या नावावर सोन कोळी, मच्छीमारी कोळी या जाती ३) ठाकूर-ठकार (कवमचा उपशाखा) या जमातीच्या नावावर रजपूत ठाकूर, जमीनदार, क्षत्रिय; वैश्य ठाकूर या जाती दावा सांगतात. काही जातीची नावे अशी आहेत की, त्यामध्ये एखादा शब्द समाविष्ट केला अथवा एकदोन शब्दांचा किंवा अक्षरांचा अथवा केवळ, काना, उकार, वेलांटी, मात्रा यांचा फेरफार केल्यास आदिवासी जमात तयार होते. उदा. मन्नेरवार, मुनुरकापू, तेलगु मुनूर जातीच्या लोकांनी जातीच्या नावासमोर फक्त 'लू' अक्षर जोडले की आदिवासी जमात तयार होते जसे मन्नेरवार-मन्नेरवारलू अशाच प्रकारे धनगर जाती धनगड म्हणून धोबी लोक धोबा जमात म्हणून फायदा घेतात. विशेष म्हणजे या जाती जमातीची संस्कृती, व्यवसाय, आचार-विचार सारे भिन्न आहे. यांच्यात रोटी-बेटी व्यवहार देखील होत नाहीत. महत्त्वाचे म्हणजे यातल्या बऱ्याचशा जाती इतर मागास वर्गातल्या यादीत आहेत. अशा प्रकारे आजमितीला ४५ अनुसूचित जमातीपैकी ३२ जमातींच्या नावावर मोठ्या प्रमाणात घुसखोरी चालू आहे. हे लोक नुसतीच घुसखोरी करून थांबत नाहीत तर चोरांच्या उलटया बोंबा या म्हणीप्रमाणे आम्हीच खरे आदिवासी असून आमच्यावरच अन्याय होतो आहे, असा कांगावा करत आहेत.

जमातीचे दाखले देण्याचे अधिकार असणाऱ्या समक्ष अधिकाऱ्यांना आदिवासी जमातीबद्दल सूक्ष्म अभ्यास नसतो आणि असला तरी बऱ्याच प्रमाणात गैरमार्गाचा अवलंब करून असे दाखले दिले जातात.

हे लोक बनावट दाखल्याचा उपयोग करून

न्यायधिशासारख्या पदावर विराजमान होऊन न्यायदान (?) करतात हे बनिये स्वतः तर फायदा घेतातच शिवाय आपल्या भावी पिढीचा देखील उद्धार करून घेतात.

आजमितीला ही मंडळी मूल जन्मल्याबरोबर त्याच्या नावाने जातीचा खोटा दाखला काढून घेतात व पुढील तरतूद करून ठेवतात.

कायद्याने खोटा दस्तऐवज उघडकीस आल्यास ते धारण करणारे, (देणारे व घेणारे) यांच्यावर फौजदारी खटला भरण्याची तरतूद आहे. परंतु आतापर्यंत कोणालाही शिक्षा झाल्याचे किंवा कारवाई केल्याचे उदाहरण मिळत नाही. त्यामुळे खोटे दाखले मिळवून या मंडळींनी विविध क्षेत्रांत अक्षरशः धुमाकूळ घातलाय.

## दाखला पडताळणी समिती

खोट्या दाखल्यांचा सुळसुळाट वाढलाय हे लक्षात आल्यावर शासनाने दाखला पडताळणी समिती इ. स. १९८१ साली प्रथमच समाज कल्याण खात्याच्या संचालकांच्या अध्यक्षतेखाली नेमली. अलीकडे आदिवासींसाठी स्वतंत्र दाखला पडताळणी समिती आहे. तिचे अध्यक्ष आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संचालक आहेत. ही समिती जमातीचा दावा सांगणाऱ्या उमेदवाराकडून त्यांच्या दाव्यास आधार म्हणून काही कागदोपत्री पुरावा सादर करावयास सांगतात. जन्म–मृत्यु रजिस्टरच्या उताऱ्याची प्रत, शाळा सोडल्याचा दाखला, शाळेत नाव दाखल केलेल्या रजिस्टरचा उतारा, वडिलांचे जमातीचे प्रमाणपत्र, जमातीच्या (शेतीच्या) खाते पुस्तकाचा उतारा व अन्य कागदोपत्री पुरावा की ज्या आधारे दावा सिद्ध होईल. पुरेसी संधी कागदपत्रे गोळा करून सादर करावयास दिल्यानंतर, उमेदवारास मुलाखतीला बोलावतात. त्यावेळेस त्यांच्याकडून फॉर्म भरून घेतला जातो. त्यात उमेदवाराचे, वडिलांचे नाव, मूळगाव, संपूर्ण पत्ता, व्यवसाय, संस्कृती, आचार–विचार, त्यांचा समाज व कुटुंब साजरे करीत असलेले सण, उत्सव, त्यांची कुलदैवते, लग्नविधी, अंत्यविधी या वेळचे रितीरिवाज, त्यांच्या समाजात पूर्वी होऊन गेलेले समाजसेवक, सध्याचे नेते, सध्या समाजात काम करीत असलेल्या संस्था, संघटना तसेच उमेदवाराचे नातेवाईक इ. संबधी माहिती असते. व त्यानंतर उमेदवाराची व त्यांच्या पालकांची मुलाखत घेऊन जमातीच्या दाखल्याची पडताळणी होते. दाखला सिद्ध झाल्यास तसे वैधतेचे प्रमाणपत्र दिले जाते. न झाल्यास दाखला अवैध ठरवला जातो. छाननी समितीच्या विरुद्ध अपिल करण्याची देखील तरतूद आहे.

## वाटा–पळवाटा–चोरवाटा

बिगर आदिवासींना दाखला पडताळणी समिती अडसर भासू लागली त्यामुळे ही समिती घटनाबाह्य आहे, असा कांगावा चालू केलाय. मात्र गंमत अशी की, पडताळणी समिती निरुपयोगी आहे हे सांगत नाहीत.

आपली चोरी लपविण्यासाठी नाही नाही ते उद्योग ही मंडळी सध्या करीत आहे. त्याचे काही मासलेवाईक उदाहरणे —

१) खऱ्या आदिवासी माणसाकडे जावून त्याच्या अज्ञानाचा व दारिद्र्याचा फायदा उठवून, पैशाचे प्रलोभन दाखवून त्याच्याकडून नातेवाईक असल्याचे लिहून घेणे, उदा. कुंडलिक रामा राबते. रा. सोनावळे तालुका जुन्नर यांस तसेच हरणमालचे काही पारधी (आदिवासी) यांनाही बनावट लोकांनी फसविल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत.

२) जातिजमातीचा दावा खोटा ठरल्यास सदर प्रमाणपत्र जप्त होते अशावेळी नवीन दाखला (पुन्हा खोटाच) मिळवून दुसरीकडे त्याचा उपयोग करावयाचा.

३) सध्यातरी दाखला पडताळणी समितीला पुरेसा निधी अभावी व कर्मचारीवृंदा अभावी फक्त वैद्यकीय अभियांत्रिकी, म. लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार व ज्याठिकाणी तक्रार येईल अशा ठिकाणच्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याचा अधिकार आहे. या संधीचा अचूक फायदा उठवून इतर क्षेत्रांत उडी मारावयाची जसे M. B.B.S. ऐवजी B.A.M.S. Engg. ऐवजी Polytechnic, व इतर व्यवसाय क्षेत्र, इ. केंद्र सरकारच्या व निमसरकारी खात्यात तर पडताळणी होतच नाही.

४) आदिवासी सेवाभावी संस्था अथवा संघटनांचे सभासद व्हावयाचे (सर्वसाधारण २० टक्के बिगर आदिवासींना संस्थेत/संघटनेत सामावून घेतले जाते.) व पैसे भरून पावती घेऊन तिचा उपयोग आदिवासी असल्याचा पुरावा म्हणून सादर करण्यासाठी करावयाचा.

## क्षेत्रबंधनाचा चुकीचा अर्थ

५) १९७६ पर्यंत आदिवासींना क्षेत्र बंधन होते. म्हणजेच ठराविक क्षेत्रातील या आदिवासींना ( यादीतील जमातींनाच) सवलतींचा फायदा व्हावयाचा परंतु हे क्षेत्रबंधन जुलै १९७७ रोजी उठविले. त्याचा उद्देश सरळ होता. ( यादीतीलच जमातीचे लोक ) ठराविक जाहीर केलेल्या क्षेत्रातील लोक नोकरी- व्यवसायासाठी बाहेर पडला तर त्यांनाही त्याचा फायदा व्हावा, परंतु त्याचा परिणाम असा झाला कीं बिगर आदिवासी नामसाधर्म्यांच्या आधारे आम्ही क्षेत्राबाहेरील आदिवासी आहोत असा खोटा दावा करू लागलेत. त्या जोरावर त्यांनी खऱ्या आदिवासींना पुन्हा मागे ढकलले.

६) **दबावतंत्र** – बिगर आदिवासी लोक आदिवासींपेक्षा जागृत आहेत. सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर ते आपले दाखले पवित्र करतात. शिवाय मोर्चे निदर्शने तसेच धमक्या देऊन ते शासनावर, अधिकाऱ्यांवर व आदिवासी कार्यकर्त्यांवर दबाव आणतात.

७) **राजकीय शक्तींचा आश्रय** – मुंबई, कोकण किनारपट्टीच्या प्रदेशात सोन कोळी, सूर्यवंशी कोळी मच्छिमार कोळी या इतर मागासवर्ग जातींची लोकसंख्या जास्त आहे. त्यामुळे शेकापसारखे पक्षही त्यांना आश्रय, पाठींबा देतात. एव्हढेच नाहीतर त्यांचे नेतृत्व पण संसद, विधिमंडळे अशा ठिकाणी करतात. अशाच प्रकारचा आश्रय हलबा कोष्टी, रजपूत ठाकूर इ. जातींना मिळतोय. केवळ मतपेटीवर लक्ष ठेऊन राजकीय पक्ष आपले डावपेच आखून घटनेला देखील मूठमाती द्यायला निघालेत.

अशा प्रकारे हे लोक खोटेपणा पचविण्यात स्वतः तर तरबेज आहेतच या उलट खरा आदिवासी अज्ञानी, अडाणी, दरिद्री आहे. संघटीत नाही परिणामी संथ आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील त्याच्या शोषणाचा हा एक असा नवीन प्रकार आहे. कहर म्हणजे १९९० ला सवलतींची मुदत संपणार आहे. ती जरी वाढवून दिली तरी काही जमाती या यादीतून वगळण्याचा विचार चालू असल्याचे ऐकतोय परंतु नेमकी त्याच जमातींमध्ये जास्त प्रमाणात घुसखोरी झालेली आहे, हेही येथे नमूद करावेसे वाटते.

खरे म्हणजे आदिवासींची आत्ताशी पहिली पिढी सवलतींचा लाभ घ्यावयास समर्थ झाली आहे. केंद्र शासनाने नुकतीच खडू–फळा मोहीम चालू करून आपली शैक्षणिक क्षेत्रातील दिवाळखोरी जाहीर केलेलीच आहे. तेव्हा या विषयावर जास्त लिहिण्याची गरज नाही.

थोडक्यात हा प्रश्न गंभीर बनत चाललाय. कार्यकर्त्यांपुढे हे एक मोठे आव्हान आहे !

# उजाड ' बनेश्वर ' भूमी

भारतातील अतिप्राचीन काळापासून प्रसिद्ध असणारी व्हर्जिन जंगले हे ओरिसाचे वैशिष्ट्य आहे. पण ओरिसा रिमोट सेन्सिंग एप्लीकेशन सेन्टरच्या पाहणीनुसार वनाच्छादित क्षेत्र आता फक्त १५ प्रतिशत उरले आहे.

बान्ध, धरणे, विद्युत योजना, खाणकाम व रस्ते यांच्या धडक–कार्यक्रमामुळे जंगल विनाशाला अधिकच वेग आला आहे. राज्याच्या ४७. ७ प्रतिशत वनक्षेत्रांपैकी सुमारे ८० टक्के प्रतिशत भूक्षेत्र सरकारने शेती–योग्य म्हणून घोषित केले व त्याचा फायदा उठवण्यासाठी सरकारी ठेकेदारांची जंगलाची बेसुमार लाकडतोड केली आहे. कालाहंडी, कोरापुट व बोलान्गीर या आदिवासी बहुसंख्यांक असणाऱ्या जिल्ह्यांना या वनविनाशाचा फटका बसल्याने सुमारे पाच हजार हेक्टरपेक्षा जास्त पट्टे उजाड झाले आहेत. चंदन, साल, शीशम साग वृक्षांकरिता प्रसिद्ध असणारे कालहंडी व लंजीगढ विभागात आता या वृक्षांचे अस्तित्वच संपत आले आहे.

ओरिसातली पावसाचे प्रमाण दरवर्षी क्रमाने कमी होत जात असतानाच पुरासारख्या भीषण आपत्तीत मात्र वाढ होत आहे. कारण जमिनीवरचे जंगलांचे नैसर्गिक संरक्षण नष्ट झाल्याने मोठ्या प्रमाणात जमिनीची धूप होऊन नदीच्या पात्रात चिखलांचे ढीग साचून पाणी वस्त्यात शिरते. (एक्सप्रेस न्यूज सर्व्हिस, भुवनेश्वर,)

# आदिवासींच्या सवलती लाटणाऱ्या टोळ्या

## नामसादृश्याचा गैरउपयोग करण्याचा प्रकार

क्रु. रा. साबळे

---

भारतीय घटनेच्या कलम ३४२ अन्वये आदिवासी जमातींची यादी राष्ट्रपतीकडून प्रसिद्ध केली जाते. या यादीत समाविष्ट केलेल्या जमाती अनुसूचित जमाती म्हणून गणल्या जाऊन त्यांना घटनेनुसार विशेष सवलती प्राप्त होतात. या जमाती इतर सुधारलेल्या जातीजमातीपासून वर्षोगणती अलग रहातात व त्यांचे वास्तव्य प्रामुख्याने वनविभागातील दऱ्याखोऱ्यांतून असल्यामुळे अद्यापही अनेक सुधारणा त्यांच्यामार्फत पोहोचू शकल्या नाहीत. आदिवासींची पिळवणूक कशी करण्यात आली, यासंबंधी नव्याने लिहिण्याचे कारण नाही. फार पूर्वी या पिळवणुकीचे वा छळवणुकीचे तंत्र अलग होते. आता हे तंत्र पूर्णतः बदललेले असून या नवीन तंत्रामुळे खऱ्या आदिवासींच्या अस्तित्वाला फार मोठा धोका निर्माण होत आहे. हा धोका वेळीच लक्षात न घेतल्यामुळे खऱ्या आदिवासींना आहे त्या परिस्थितीत रहावे लागेल व याच्या उलट त्यांच्या नावावर बिगरआदिवासी आज फायदा घेत आहेत व तसेच ते घेत रहातील.

### नामसादृश्याचा फायदा

काही काही जातींची नावे ही आदिवासी जमातीच्या नावाशी मिळतीजुळती असल्यामुळे त्या जातीचे लोक सरळ सरळ ते आदिवासी जमातीचे असल्याबद्दलचे प्रमाणपत्र मिळवितात. दाखले देणाऱ्या अधिकाऱ्यांना जातीजमातींचे हे बारकावे समजत नाहीत आणि काहींना समजले तरी चिरमिरी आणि वशिलेबाजीने असे दाखले सर्रास विनाचौकशी दिले जातात. चुकीचे दाखले दिले म्हणून सरकारने गेल्या ३५ वर्षात कोणालाही शिक्षा दिलेली नाही, त्यामुळे सरकारचे सारे नियम धाब्यावर बसविलेले दिसतात. नामसादृश्याचा फायदा घेणाऱ्या जातींची यादी फार मोठी आहे. जवळजवळ २२ जाती आदिवासींच्या सवलतीचा सर्रास फायदा घेत आहेत, त्या आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेल्या आहेत. शहरामध्ये त्यांची वस्ती शेकडो वर्षांपासून आहे. त्यात प्रामुख्याने रजपूत ठाकूर, भाट ठाकूर, ब्रह्म भाट ठाकूर, मुनूर, मुन्नुरवार, कोष्टी, धनगर, धोबी, कोळी, सूर्यवंशी कोळी, सोनकोळी, मुसलमान, शिंपी, कुणबी इत्यादी सुधारलेल्या जातींचा समावेश आहे. आदिवासींच्या ८० टक्के सवलती या जाती घेतात. दुबळा, गरीब आदिवासी मात्र आजही डोंगरदऱ्याखोऱ्यात सवलतीअभावी वंचित राहिला आहे

काही जाती अशा आहेत की, त्या जातीच्या नावात असलेले काही शब्द जमातींच्या नावात आहेत. उदा. महादेव कोळी, ढोरकोळी, टोकरे कोळी, मल्हार कोळी या आदिवासी अनुसुचित जमाती म्हणून गणल्या गेलेल्या आहेत. या जमातींच्या नावामध्ये कोळी हा शब्द असल्यामुळे जे आदिवासींच्या यादीत नाहीत ते पाणकोळी, सोनकोळी, मच्छीमार कोळी, बंदरे कोळी, तारेकोळी, सूर्यवंशी कोळी' आहिर कोळी या जातीचे लोक स्वतः आदिवासी असल्याबद्दलचा दावा करतात व अनुसूचित जमातींची प्रमाणपत्रे मिळवितात.

### बनावट दाखले

काही जातींची नावे अशी आहेत की, त्यात एकदोन शब्दांचा फेरफार केल्यास वा एखादा शब्द त्या जातीच्या नावात समाविष्ट केल्यास त्या जातीचे नाव जमातीच्या-नावासारखे होऊन, अशा जातीचे लोक त्या आदिवासी जमातीचे असल्याबद्दलची बतावणी करतात व त्याप्रमाणे प्रमाणपत्र मिळवितात. उदा. मन्नरवार, धनगर, कोष्टी, धोबी, छट्टी, कमार इ. मन्नेरवार, मुनुरकापू, तेलगू मुनूर नावाच्या जाती तेलगू भाषिक प्रदेशातून महा. राष्ट्रात आल्या आहेत. या जातीचे लोक आपल्या जातीच्या नावासमोर ' लू ' असा शब्द लावून आदिवासींचे सर्रास फायदे घेतात. या जातींनी त्यांची संघटना पुण्यात स्थापना केलेली आहे. मुंबई, सोलापूर, नांदेड, येथे शाखा काढल्या आहेत. हजारो लोक या संघटनेचे सदस्य आहेत. त्यांना ही संघटना आदिवासींचे दाखले मिळवून देते व गेली कित्येक वर्षे ही मंडळी आदिवासींच्या सवलतीवर गबर झाली आहेत. धोबी ही जात महाराष्ट्रात सर्वपरिचित आहे. या जातीचे काही लोक स्वतःच्या जातीच्या नावाची वेलांटी गाळून ते धोबा या अनुसूचित जमातीचे असल्याबद्दलची बतावणी करतात. धोबा ही वास्तविक गोंड या जमातीची उपजमात आहे.

## तपासणी समिती :-

नावातील सारखेपणा आल्यामुळे किंवा जातीच्या नावात काही फेरफार करून आदिवासी जमातीची प्रमाणपत्रे ज्यांनी मिळविली असतील त्यांची प्रमाणपत्रे तपासून घेण्याची गरज आहे. खोटी प्रमाणपत्रे बाद केली पाहिजेत, तरच खोट्या आदिवासींकडून खऱ्या आदिवासींच्या घटनात्मक सोयी सवलतीवर होणारे अतिक्रमण थांबेल. अशी खोटी प्रमाणपत्रे तपासण्यासाठी शासनाने तपासणी समितीची निर्मिती केली आहे व वेळोवेळी शासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शनपर सूचना दिलेल्या आहेत. वेळोवेळी प्रसृत करण्यात आलेल्या सूचना, तपासणी समिती, ॲपिलेट ॲथॉरिटी इत्यादींच्या कार्यकक्षा व अधिकार या गोष्टींना आवाहन देऊन महाराष्ट्र आदिवासी ठाकूर, समाजसेवा मंडळ चाळीसगांव या संघटनेने (ही संघटना जळगाव, धुळे जिल्ह्यांतील भाट ठाकूर जातीची असल्याचे समजते) अलग अलग दोन याचिका, याचिका क्र. २०८।७।१९८८ व याचिका क्र. १७।१९८६ उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केल्या होत्या. या याचिकांवर दिलेल्या निर्णयास उच्च न्यायालयाने तपासणी समितीचे अधिकार कार्यप्रणाली ॲपलेट ॲथॉरिटी व शासनाचे अधिकार हे मान्य करुन या सर्व बाबी वैध असल्याचे म्हटले आहे या निर्णयामध्ये ठाकूर नावाच्या जातीचे व ठाकूर या आदिवासी जमातीचे वेगवेगळे अस्तित्व मान्य केले आहे. ठाकूर सवर्ण जातीच्या तिच्या अनेक उपजातीचे अस्तित्वही मान्य करण्यात आले आहे. या दोन्हीही याचिकामध्ये महाराष्ट्र प्रदेश आदिवासी मंडळ, महाराष्ट्र राज्य धुळे या संस्थेच्या वतीने अर्ज (इंटरव्हेंशन ॲप्लिकेशन) दाखल केला होता. या याचिकांचा निर्णय शासनाच्या बाजूने लागला आहे. त्या निर्णयात ठाकूर जात अलग आहे, तर ठाकूर ठाकूर–क–ठाकूर, म–ठाकूर ही आदिवासी जमात वेगळी आहे असा महत्त्वपूर्ण निर्णय न्यायालयाने दिला आहे.

## ठाकूर आदिवासी :-

याचिका दाखल करणाऱ्या संस्थेचा दावा असा होता की, आदिवासींच्या यादीत क्रमांक ४४ वर दाखविलेली ठाकूर जात व जमात ही सर्वत्र एकच असून ज्यांच्या कागदपत्रांमध्ये ठाकूर हा शब्द सापडेल ते सर्व आदिवासी जमातीचे आहेत व तसेच ते समजले जावेत व त्यांना सवलती मिळाव्यात हे म्हणणे उच्च न्यायालयाने अमान्य केले. उलट, निर्णयात असे म्हटले आहे की, ठाकूर नावाची सवर्ण जात तिच्या निरनिराळ्या उपजातीसह अस्तित्वात असल्यामुळे जो कोणी ठाकूर आदिवासी जमातीचा असल्याबद्दलचा दावा करतो त्याचा दावा त्याने सादर केलेल्या कागदपत्रांवरून व इतर आनुषंगिक सामाजिक व सांस्कृतिक बाबीवरुन तपासून निर्णय घेणे आवश्यक आहे. या याचिकांच्या वेळी काही कागदपत्रे दाखल करण्यात आली होती. त्यात जळगावच्या ठाकूर संस्थेचे पदाधिकारी असलेल्या काही व्यक्तींनी १९६८ मध्ये त्यावेळचे समाजकल्याण मंत्री यांचेकडे सादर केलेल्या निवेदनात त्यांनी असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, आम्ही आदिवासी जमातीचे ठाकूर नसून आम्हाला अनुसूचित जातीचे आदिवासी समजावे, असा आमचा दावा नाही. याउलट, निवेदनात स्पष्टपणे असे म्हटले आहे की, आम्ही ठाकूर (भाट) जातीचे असून सातारा, मराठवाडा, विदर्भ इत्यादि ठिकाणी राहणारे ठाकूर अथवा ठाकर या जातीचे लोक व आम्ही एकच आहोत. त्यावेळी प्रकर्षाने या लोकांची शासनाकडे अशी मागणी होती की, त्यांच्या ठाकूर (भाट) या जातीचा समावेश इतर मागासलेल्या जातीमध्ये करावा. ७–८ वर्षात हे निवेदन देणारे लोक लगेच आदिवासी झाले व संस्थेच्या नावात आदिवासी हा शब्द लावून व संस्थेला पंजीबद्ध करून घेऊन खऱ्या आदिवासीसाठी उपलब्ध असलेल्या घटनात्मक सवलतीचा व राखीव जागांचा ते फायदा घेत आहेत. या जातीचे लोक आर्थिकदृष्ट्या सधन सुशिक्षित व नोकरीधंद्यात गुंतलेले आहेत. ९० टक्के सुशिक्षित असून त्यांच्यामध्ये अनेक डे. कलेक्टर, मामलेदार, बी. डी. ओ वकील, डॉक्टर, वनाधिकारी, प्राध्यापक, शासकीय वर्ग १ व २ चे अधिकारी या पदावर काम करतात. गरीब आदिवासींचे नसीब की, शासनाने ही याचिका जिंकली, नाहीतर आदिवासींवर हे मोठे संकटच आले असते.

## चौकशी हवी :-

ठाकूर जातीचेच लोक काय, पण आज अनेक जाती आदिवासींच्या सवलती लुटण्यासाठी टपल्या आहेत. यासाठी वृत्तपत्रांनी, समाजातील पुरोगामी शक्तींनी पुढाकार घेऊन शोषणाचा हा नवा ब्रह्मराक्षस रोखला पाहिजे. आज जे लोक असा निरनिराळ्या संस्था स्थापन करून सामुदायिकरीत्या व संख्याबळाच्या आधारे खऱ्या आदिवासींवर अन्याय करीत आहेत व त्यांना घटनात्मक सवलतीपासून वंचित करत आहेत, अशी सर्व संस्थांची चौकशी करण्यात यावी. अन्यथा खऱ्या आदिवासींचा भविष्यकाळ हा अत्यंत कठीण व अंधकारमय होईल.

# खरा महादेव कोळी समाज कोणता ?

डी. आर. घोडे

## महादेव कोळी व्याख्या व व्याप्ती–

महादेव कोळी ह्या आदिवासी समाजाच्या संदर्भात ज्या काही विद्वान मंडळींनी आतापर्यंत या समाजावर ग्रंथ-लेखन केले आहे, त्यात डॉ. गोविंद गारे यांचे "सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी" या ग्रंथाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्याशिवाय काही लेखकांनीही महादेव कोळी समाजाच्या संदर्भात लिखाण केलेले आहे; त्यात बऱ्याच त्रुटी आढळून येतात. या ज्या त्रुटी आढळून येतात, त्यात प्रामुख्याने महादेव कोळी समाज, त्याची रचना, त्यांची सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरा व चालिरीती या संदर्भात आढळून येतात.

आतापर्यंत समाजशास्त्रज्ञांनी महादेव कोळी या शब्दाकडे व त्याच्या व्याख्याकडे एकांगी दृष्टीकोणातून पाहिले आहे आणि तो दृष्टिकोण म्हणजे सामाजिक व ऐतिहासिक होय. या दृष्टीने पाहिल्यास काही लेखकांच्या मते, महादेव कोळी म्हणजे 'महादेवाचे डोंगर' या ठिकाणी ज्या कोळी जमातीचे वास्तव्य केले होते व नंतर तिचे स्थलांतर झाले ती जमात; परंतु वरील मूल्यमापन पूर्णतः चुकीचे दिसून येते. कारण असे जर स्थलांतर मानले तर सह्याद्रीच्याच घाटमाथ्यावर जो महादेव कोळी आहे तो तेथे कसा आला ? स्थलांतर म्हणजे एकदम उड्डाण होऊ शकत नाही. तसेच ज्या ठिकाणाहून स्थलांतर झाले त्या ठिकाणी त्याचे पुरावे उपलब्ध हवेत, तसे पुरावे कोठेही नाहीत. त्यामुळे वरील व्याख्या तशी नुसती काल्पनिक वाटते.

## कोळी प्रकारात अनेक जाती

दुसरी जी व्याख्या आहे ती म्हणजे 'कुळ' शब्दावरून कोळी हा शब्द आला; परंतु याबाबत कुळ हा शब्द जर धरला तर बाकीची 'कुळे' नव्हती काय ? मग इतर समाजापासून हे कुळ म्हणजे कोळी वेगळे कसे आहेत ? हे समाजशास्त्रीय दृष्ट्या बिलकूल मान्य होण्यासारखे नाही. तसेच कोळी या प्रकारात अनेक प्रकारचे, अनेक जातीचे लोक आहेत. उदा., मच्छीमार कोळी, सोनकोळी, तारेकोळी. असे विविध प्रकारचे कोळी या प्रकारात बसणाऱ्या जाती आहेत. या सर्वांना एका पंगतीत बसवता येणार नाही. कारण त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार बिलकुल होत नाहीत. याहीपेक्षा त्यांची सांस्कृतिक परंपराही वेगळी आहे; शिवाय 'ट्राइब' किंवा जमात या प्रकारात ते बिलकूल बसू शकत नाहीत, त्यामुळे 'महादेव कोळी' ही एकच अशी जमात आहे की, ती आदिवासी जमातीची जी काही वैशिष्टये आहेत त्या वैशिष्टयांच्या सर्व खुणा घऊन जगणारी जमात आहेत.

यानंतर काही लेखकांचे म्हणणे असे आहे की, 'महादेव कोळी जमात म्हणजे महादेवाला-शंकराला मानणारी जमात.' परंतु हे मतही पूर्णांशाने ग्राह्य होण्यासारखे नाही; कारण दुसऱ्याही काही जमाती अशा आहेत की, ज्या जमाती शंकराची उपासना करतात. कारण प्रत्येक गावात शिवाची-शंकराची मंदिरे आहेत. त्यामुळे वरील म्हणण्यालासुद्धा फारसा आधार राहात नाही.

वरील व्याख्या व इतर काही व्याख्यांचा विचार केला असता, महादेव कोळी समाजाची अशी एकही व्याख्या नाही की ज्याद्वारे महादेव कोळी या आदिवासी समाजाची उत्पत्ती समजू शकेल.

## वेदपूर्वकाळापासून अस्तित्व–

काही ग्रंथकाराना वाल्मीकी हा 'कोळी' समाजाचा होता हे मान्य केले आहे. त्याचप्रमाणे व्यासांचे व पांडवांचे नाते कोळी या शब्दाशी निगडित आहे. कर्णाचे पालनपोषण एका कोळ्यानेच केलेले आहे. मच्छिंद्रनाथांचेही पालन कोळ्यानेच केलेले आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील की, रामायण आणि महाभारत या ग्रंथांच्या पूर्वकाळात म्हणजे इ. स. पूर्व ७००० वर्षांपूर्वी कोळी हा समाज अस्तित्वात होता. मग असा हा समाज वेदपूर्व काळात, एवढेच नव्हे तर सिंधु संस्कृतीपासून अतिप्राचीन काळापासून, अस्तित्वात आहे. याशिवाय ज्याप्रमाणे इतर आदिवासी जमाती या क्षत्रिय जमाती आहेत, त्यांची स्वतंत्र राज्ये होती, त्याप्रमाणे हा "महादेव कोळी" समाज क्षत्रिय समाज

आहे. आजपर्यंत त्यांची संस्थाने होती, त्यांच्या देशमुख, पाटील व इतर सर्व प्रकारचे सरदारी व राजघराण्यातील रीतिरिवाज आहेत. खास वैशिष्टयांनी असा हा महादेव कोळी समाज विखुरलेला आहे.

**शैव सांप्रदायातील लोक–**

आता या समाजाच्या मूळ परंपरेकडे येत असताना आपणास असे आढळून येते की, हा समाज ज्या दोन शब्दांपासून बनलेला आहे, तो शब्द विशिष्ट असे तत्त्वज्ञान सांगणारा शब्द आहे. आणि हे तत्त्वज्ञान सिंधू संस्कृतीमध्ये जी शिवाची पशुपती या रूपात उपासना केली जात होती त्या व जी 'शक्ती' च्या स्वरूपात जगन्मातेची उपासना केली जात होती त्यापासून हा शब्द निर्माण झालेला आहे. शैव संप्रदाय हा असा सिंधू संस्कृतीपासून चालत आलेला आहे आणि शैव तत्त्वज्ञान त्यामुळेच काश्मिरी शैव तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जाते. हा संप्रदाय संपूर्ण भारतभर पसरलेला आढळून येतो आणि त्याचे कारण सिंधु संस्कृती ही भारतीय संस्कृती होते.

हा शैव संप्रदाय जसजसा पुढे विकसित होत गेला तसे त्यात प्रामुख्याने दोन भेद पडत गेले आणि ते म्हणजे फक्त शिवाची उपासना करणारे, काही फक्त शक्ती उपासना करणारे यात एका नव्या पथाचा उगम झाला आणि या पंथाचे मूळ संस्थापक मूळात जे शिवशंकर तेच होत आणि हेच आदिनाथ. आदिनाथ शिवशंकरांनी ही विद्या पार्वतीला सांगितली आणि ती विद्या आदिनाथांनी मच्छिंद्रनाथांना दिली. मच्छिंद्रनाथ हे माशाच्या पोटातून जन्माला आले. या घटनेला विशिष्ट असा संदर्भ आहे. मीन व कोळी या शब्दाचा विशिष्ट असा संदर्भ आहे.

**कोळी शब्द कसा रूढ झाला ?**

नवनाथ पोथीमध्ये सुद्धा मच्छिंद्रनाथाचा सांभाळ एका कोळयाने (धिवराने) केला असा आहे. ते काहीही असले तरी आदिनाथांनी जो सप्रदाय सुरु केला त्याचे आद्य प्रवर्तक होते मच्छिंद्रनाथ, त्यांचे शिष्य गोरक्षनाथ, गहिनीनाथ व इतर नाथ परंपरा. या नाथ परंपरेने आपले विशिष्ट असे तत्वज्ञान प्रसारित केले. नाथांच्या तत्वज्ञानाचा आणि महादेव कोळी समाजाचा फार जवळचा संबंध आहे नाथ संप्रदायाने शिव आणि शक्ती दोन्हीची उपासना एकत्र केली आणि त्यामुळे त्यांच्या तत्वज्ञानात कुल + अकुल शिव आणि शक्तीला मानले जाते. कुल–अकुल म्हणजेच शिवशक्तीला जे मानतात त्यांना कौलमतवादी जसे म्हणतात. आता हा जो कौलमतवादी त्याला कोळी म्हणण्याचा प्रघात पडला आणि कौलीचा कोळी हा शब्द रूढ झाला आता ह्या शब्दाला जो महादेव शब्द आला तो अकुल या शब्दाचा जो अर्थ शिव त्या शिवाऐवजी वापरला जाऊ लागला आणि असा हा शिवशक्तीला मानणारा, जो समाज तो तो 'महादेव कोळी' होय.

**महादेव कोळी समाजाचो ठिकाणे–**

आता या महादेव कोळी समाजाची वैशिष्टये आणि नाथ संप्रदायाची वैशिष्टये तपासून पहावी लागतील. महादेव कोळी हा समाज सध्या भौगोलिकदृष्टया ज्या ठिकाणी वसलेला आहे. त्या ठिकाणी नाथपंथाचा प्रचार मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येते. आजही 'कुंभमेळा' हा त्र्यंबकेश्वर, ब्रह्मनाथ, भीमाशंकर या परिसरात, व या ठीकाणी नाथांच्या ज्या गाद्या आहेत, पीठ आहेत त्या ठिकाणी उत्तरेकडून दक्षिणेकडे येताना दिसून येतो. ही नाथ संप्रदायाची परंपरा नाशिक, नगर पुणे आणि ठाणे ह्या ठिकाणी आढळून येते.

**गोसावी संप्रदायाशी निगडित–**

महादेव कोळी जमातीची इतर अनेक वैशिष्टये आहेत. नाथ संप्रदाय हा 'योगी' संप्रदाय आहे. योगाची परंपरा आजही ह्या संप्रदायात आहे. तसेच महादेव कोळी समाजाचा प्रत्येक माणूस हा पूर्वी जानवे घालीत होता. तसेच नाथ संप्रदाय हा गोसावी संप्रदायाशी निगडित आहे. आजही महादेव कोळी जमातीचे लोक गोसावी जमातीच्या लोकांना गुरू करून घेतात. प्रत्येकाची गुरुपरंपरा आहे पिंडी ते ब्रह्मांडी हे नाथांचे अद्वैत असे तत्वज्ञान आहे. याचाच पुरस्कार ज्ञानदेवांनी केवल्याद्वैत तत्वज्ञानात केलेला आहे, कारण ज्ञानदेव हे नाथ संप्रदायी आहेत.

**खरा महादेव समाज कोणता ?**

इतर कोळी लोकांनी खोटया सवलती मिळविण्यासाठी कितीही टाहो फोडला, की महादेव कोळी म्हणजे आम्हीच आहोत, तर ते त्यांना या प्रकारे सिद्ध करता येणार नाही. याशिवाय ते कुठल्याही आदिवासी जमातीची जो सांस्कृतिक व सामाजिक वैशिष्टये आहेत त्यात बसू शकणार नाहीत. त्यामुळे फक्त सह्याद्री पर्वताच्या आश्रयाने राहून ज्याने खडतर तपश्चर्या केली आहे, परंतु आता आर्थिकदृष्टया भौगोलीक कारणामुळे व इतर समाजाच्या अतिक्रमणामुळे, पिळवणुकीमुळे मागे राहिला आहे. त्याच समाजाचा शासनाला विचार करावा लागेल.

# प्रत्येक आदिवासी व्यक्तीने घ्यावयाची दक्षता

१. आपण कोण आहोत हे नीट समजून घ्यावे.

२. अनुसूचित जमाती किती व कोणत्या हे लक्षात घ्यावे.

३. नावात थोडाफार सारखेपणा असणाऱ्या जाती आपल्या जमातीच्या नावावर खोटे दाखले मिळवून फायदा घेत नाहीत ना, हे पहावे.

४. एखादी व्यक्ती ही अनुसूचित जमातीची नाही, परंतु ती त्या जमातीच्या सवलतीचा फायदा घेत आहे, अशी शंका आल्यास त्याबाबत नाव, गाव, कामाचे ठिकाण, जात इ. माहिती जबाबदार संघटनेस द्यावी.

५. शाळा, कॉलेजमध्ये शिकत असणाऱ्या खोट्या आदिवासींचा शोध घ्यावा व माहिती जबाबदार संघटनेस कळवावी.

६. खात्री पटल्याशिवाय व कारण समजल्याशिवाय कोणासही नातेवाईक वा भाऊबंद असल्याचे लिहून देऊ नये.

७. स्वतःचा शाळा सोडल्याचा व जातीचा दाखला दुसऱ्यास देऊ नये.

८. आपल्यावर होणारा अन्याय/अत्याचाराची माहिती जबाबदार संघटनेस द्यावी.

९. खोट्या आदिवासींच्या प्रलोभनाला बळी पडू नये.

१०. संघटित होण्याची आवश्यकता इतरांना पटवून द्यावी.

११. आदिवासींसाठी असणाऱ्या सोयी-सवलतींचा अभ्यास, प्रचार व प्रसार करावा.

# महाराष्ट्र शासन
# आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक – सीबीसी १०८२/३८६८६/
(१४१) का. १०
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२.
दिनांक २ डिसेंबर १९८७.

वाचा–१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक सी. बी. सी. १०८२–३२६८८ (१४१) का. ११, दिनांक २७ जून १९८४

२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. सी बी सी–१०८२–३२६८६ (१४१) का. ११, दिनांक ११ जाने. १९८५.

३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. सी. बी. सी.–१०८२–३२६८६ (१४१) का. ११, दिनांक २८ मार्च १९८५.

४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. सी. बी. सी.–१०८२–३२६८२ (१४१) का. ११, दिनांक ८ जुलै १९८५.

---

**शासन निर्णय**

विदर्भातील हलबा, हलबी हलबा-कोष्टी/कोष्टी जमातीबाबत काळजीपूर्वक सखोल अभ्यास करण्यासाठी व त्याबाबतचा अहवाल सादर करण्यासाठी शासनाने शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्रमांक–सी बीसी–१०८२/३२६८६/(१४१)/का. ११. दिनांक २७ जून. १९८४ अन्वये डॉ फरेरा यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ समिती नेमली होती.

सदर तज्ज्ञ समितीसमोर विचारार्थ ठेवलेले विषय खालीप्रमाणे होते :–

अ) आदिवासी हलबा, तथाकथित हलबा–कोष्टी व कोष्टी हे एक आणि अभिन्न आहेत की वेगवेगळ्या जमाती/जाती आहेत. आणि हलबा–कोष्टी आणि कोष्टीमध्ये आदिवासींची वैशिष्टचे आहेत काय ?

आ) मुख्यत्वे विदर्भ विभागात राहणारे हलबा कोष्टी, ज्यांच्यातील मोठी संख्या विणकामाद्वारे चरितार्थ मिळवते, खरे हलबा किंवा आदिवासी हलबांची उपशाखा (Off Shoot) आहेत काय ?

इ) सध्याच्या महाराष्ट्र राज्याच्या भूप्रदेशांत दिनांक ६-९-१९५० रोजी (ज्या तारखेला अनुसूचित, जमातीची यादी जाहीर करणारा पहिला राष्ट्रपतींचा आदेश प्रसिद्ध करण्यात आला.)

१) हलबा (आदिवासी) २) हलबा-कोष्टी ३) कोष्टी यांची लोकसंख्या किती होती ? तिची जिल्हावार आणि तालुकावर विभागणी कशी होती, आणि जिल्हा मुख्यालये व तालुका मुख्यालये येथे कशी होती ?

ई) उपरोक्त तिन्ही समाजात वापरण्यात येणारी आडनावे कोणती ?

उ) हलबा (आदिवासी) मूळ ठिकाण/क्षेत्रातून नागपूर भंडारा वगैरे शहरांत स्थलांतरित झाले आहेत काय ? असल्यास प्रस्तुत तपशीलाचा अभ्यास करून नोंद करावी.

ऊ) उपरोक्त तिन्ही समाजात कोणती विनिर्दिष्ट वैशिष्टये आहेत कीं ज्याच्याकडे त्याचा एकमेकांतील भेद दाखविण्यासाठी निर्देश करता येईल.

३. तज्ज्ञ समितीने त्यांच्यासमोर ठेवलेले विचारार्थ विषय (Terms of Reference) लक्षात घेऊन या प्रश्नाबाबत त्यांनी दिनांक ७ ऑगस्ट, १९८५ रोजी आपला अहवाल शासनास सादर केला. या तज्ज्ञ समितीने त्यांच्या अहवालात असे निष्कर्ष काढले आहेत की, हलबा–कोष्टी ही कोष्टी या जातीची उपजात आहे. तिचा वंशपरंपरागत धंदा विणकाम आहे. आणि हलबा कोष्टी व आदिवासी हलबा यामध्ये कोणतेही सामाजिक, मानववंशीय, भाषा शास्त्रीय, धार्मिक आणि इतर आप्तभाव नाहीत. विचारार्थ विषयाच्या (Terms of Reference) अनुषंगाने समितीने काढलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :—

अ) एका बाजूला आदिवासी हलबा/हलबी आणि दुसऱ्या बाजूला हलबा–कोष्टी आणि कोष्टी हिंदु-समाजातील विणकरांची जात आहे. हलबा–कोष्टी ही कोष्टी या जातीच्या अनेक उपजातींपैकी एक उपजत आहे. हलबा–कोष्टीमध्ये आदिवासींची वैशिष्टचे मुळीच आढळून येत नाहीत. कोष्टी ही हिंदू समाजातील एक जात आहे.

आ) मुख्यत्वे विदर्भ विभागात राहणारे हलबा–कोष्टी, ज्यांच्यातील मोठी संख्या विणकामाद्वारें चरितार्थ मिळविते, हे आदिवासी हलबा नाहोत, तसेच ते आदि-वासी हलबा जमातीच्या उपशाखेचे ( Off Shoot ) नाहीत.

इ) १) दिनांक ६ सप्टेंबर, १९५० रोजी सध्याच्या महाराष्ट्र राज्याच्या प्रदेशात आदिवासी हलबांची संख्या किती होती याची माहिती उपलब्ध नाही. परंतु अंदाजे ही लोकसंख्या ३२०८८ इतकी होती.

२) दिनांक ६ सप्टेंबर १९५० रोजी विदर्भ भागात हलबा–कोष्टी धरून कोष्टींची लोकसंख्या किती होती याची माहिती उपलब्ध नाही. परंतु अदाजे ती साधारणपणे ३७०४७ इतकी होती.

ई) आदिवासी हलबा, हलबा–कोष्टी व कोष्टी या समाजात वापरण्यात येणाऱ्या आडनावांच्या त्यांच्या संघटनांनी दिलेल्या याद्या अहवालात अंतर्भूत करण्यात आल्या. परंतु त्या निर्णायक नाहीत असे समितीने नमूद केले आहे.

उ) आदिवासी हलबा त्यांच्या मूळ ठिकाणापासून प्रदेशापासून नागपूर, भंडारा वगैरे शहरांकडे स्थलां-तरीत झालेले नाहीत.

ऊ) आदिवासी हलबा, हलबा–कोष्टी व कोष्टी यांची अहवालात विनिदिष्ट वैशिष्टचे पृ. १६५ ते १६८ येथे दिली आहेत.

४. परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या समितीच्या अहवालातील निष्कर्ष शासन सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेले स्पेशल लिव्ह पिटिशन (नागरी) क्रमांक १६३७२/१९८५ वरील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाधीन राहून स्वीकृत करीत आहे.

५. तज्ज्ञ समितीने आपल्या अहवालातील प्रकरण–७ मध्ये हलबा/हलबी, हलबा–कोष्टी व कोष्टी यांच्या आडनावांची सविस्तर यादी अंतर्भूत केलेली आहे. हलबा–हलबी, हलबा–कोष्टी व कोष्टी यांची आडनावे ह्या जाति–जमातीच्या स्थानी सादर केलेल्या विविध निवेदनातून घेतलेली आहेत. अहवालात समितीने असे नमूद केले आहे की, यादीतील ही आडनावे निर्णायक नाहीत. यास्तव शासन असे आदेश देत आहे की, ही जातिजमातीची आडनांवे एखादी व्यक्ती हलबा–हलबी या अनुसूचित जमातीची आहे हे ठरविताना ग्राह्य धरली जावू नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ललिफक झुआला )

शासनाचे सचिव

---

## Form IV

१. प्रकाशन स्थळ : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४ आनंद पार्क, औंध,
पुणे ४११ ००७.

२. प्रकाशनाचा नियतकालावधी : त्रैमासिक

३. मुद्रकाचे नाव; पत्ता व राष्ट्रीयत्व : **रा. के. मुटाटकर**
सचिव महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे–७
भारतीय

४. प्रकाशकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व : **रा. के. मुटाटकर**
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे–७
भारतीय

५. संपादकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व : **रा. के. मुटाटकर**
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद पुणे–७
भारतीय

६. नियतकालिकाची मालकी : ज्यांच्याकडे आहे त्या संस्थेचे नांव : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद पुणे–७

श्री. रामचंद्र केशव मुटाटकर, याद्वारे, प्रकट करतो की वर दिलेली माहिती खरी आहे.

**रा. के. मुटाटकर**

# वृत्तपत्रातून आदिवासी विश्व :

## डहाणूतील आदिवासी पैसे भरूनही ८ वर्ष अंधारात !

डहाणू, दि. २५ (लो. वा.) : महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाच्या बोईसर येथील कार्यालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या लहरी कारभारामुळे डहाणू तालुक्यातील अनेक खेड्यांतील आदिवासी पैसे भरूनही अंधारात राहिले आहेत.

मौजे पळे दांडीपाडा येथील वीस शेतकऱ्यांनी त्यांच्या राहत्या घरांना वीज कनेक्शन मिळावे म्हणून सन १९८१ साली पेमेंट ऑर्डर भरूनही त्यांना वीज कनेक्शन अद्यापपर्यंत दिलेले नाही. पळे लिंगापाडा विद्युतीकरण उद्‌घाटन समारंभप्रसंगी दि. २७ जानेवारी १९८६ रोजी श्री मिर्झा यांनी त्याच वर्षी मार्च महिन्यात वीज कनेक्शन देण्याचे आश्वासन या भागाचे आमदार श्री शंकरराव नम, जिल्हा परिषद सदस्य श्री एम. एम. राऊत, सभापती श्री धर्माभाऊ ऱ्हाड व पत्रकार यांचे उपस्थितीत अधिकाऱ्यांनी दिले होते. गेली तीन वर्षे वीज कनेक्शन देण्याबाबत चालढकलपणा करीत असल्याने आमदार श्री नम यांनी याबाबत अधिकाऱ्यांना विचारले असताना त्यांनी आमदार नम याना लेखी कळविले आहे की, त्वरित वीज कनेक्शन देण्यात येत आहे. परंतु तेही आश्वासन पोकळच दिसते.

मौजे पळे गावठण पाडा येथे गेली बारा वर्षे तेथील आदिवासींच्या घरांना वीज मिळावी म्हणून खांब उभे आहेत. या सर्व आदिवासी घरांना शासनाच्या आदिवासीना विद्युतीकरण देण्याच्या योजनेमधून वीज घेण्यासाठी फिटिंग करून मिळालेले आहे. त्यातील काही घरांना २७ जानेवारी १९८६ रोजी विद्युत पुरवठा करण्यात आला. परंतु काही आदीवासींना खांब उभे असूनही अद्यापपर्यंत वीज कनेक्शन देण्याची टाळाटाळी करीत आहेत. येथील सरपंच श्री बी. एच. अंभिरे यांनी अनेकदा अर्जविनंत्या करूनही पुढच्या महिन्यात खांब पडतील म्हणून सतत आश्वासन देत असतात, अशी माहिती श्री. अंभिरे यांनी दिली आहे.

(लोकसत्ता २६–२–८९)

## पुणे जिल्ह्यातील आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांमध्ये त्वचारोगाची लागण

नारायणगांव : आदिवासी विकास योजनेच्या गलथान व भ्रष्टाचारी कारभारामुळे पुणे जिल्हयातील बहुसंख्य आश्रमशाळातील विद्यार्थ्यांमध्ये खरजेसारख्या त्वचारोगाची लागण झाल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

आंबेगाव तालुक्यातील गोहे व जुन्नर तालुक्यातील सोमतवाडी येथील आश्रमशाळांच्या गलथान कारभाराचे वृत्त 'दैनिक केसरी' मध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी धावपळ केली. परंतु प्रत्यक्षात कामकाजात सुधारणा झाल्याचे आढळत नाही.

पुणे येथील आदिवासी विकास अधिकारी इ. ए. रोचा यांच्याकडे या संदर्भात चौकशी करता त्यांनी कोणतीहि माहिती सांगण्यास नकार दिला. या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पुणे जिल्हयातील १४ आश्रमशाळा असल्याचे वृत्त आहे.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दोन्ही वेळी सकस आहार पुरविला जात असल्याची कागदोपत्री नोंद असली तरी प्रत्यक्षात अतिशय निष्कृष्ट प्रतीचे धान्य वापरले जात असल्याचे दिसून आले. अंगाचा साबण, मुलीसाठी मिळणारे तेलाचे डबे, बिस्कीटपुडे हे बहुसंख्य आश्रमशाळात कधीतरी पहावयास मिळतात, असेहि सांगण्यात आले.

काही अधिकाऱ्यांनी सर्वच आश्रमशाळाच्या अधीक्षकाकडून सक्तीने 'सर्व साहित्य वेळेवर मिळणे. किरकोळ खर्चांसाठी पैसे दरमहा दिले जातात' असे लिहून घेतल्याचे समजते. इतकेच नव्हे तर बाहेरचे कुणी पत्रकार, अधिकारी आल्यास त्यांच्याशी कसे बोलावयाचे याचे प्रशिक्षण मुलांना देण्यात आले आहे.

नुकतीच विभागीय आयुक्त अरुण बोंगिरवार व जिल्हाधिकारी श्रीनिवास पाटील यांनी सोमतवाडी आश्रमशाळेत भेट दिली असता ठराविक साच्याची उत्तरे त्यांना मुलाकडून मिळाली.

आश्रमशाळांच्या व्यवहाराची लाचलुचपत अगर गुप्त पोलिस खात्याकडून चौकशी केल्यास अनेक गैरप्रकार उघडकीस येण्याची शक्यता आहे.

(केसरी पुणे)

## आदिवासी जाणीव जागृती सप्ताह संपन्न

जुन्नर, दि. २८ (लो. वा.)–जुन्नर तालुक्याच्या आदिवासी भागातील सोमतवाडी येथील शासकीय आश्रमशाळेतर्फे 'आदिवासी जाणीव जागृती व प्रसिद्धी सप्ताह' साजरा करण्यात आला या. सप्ताहानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पुण्याच्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने आणि सोमतवाडी शासकीय आश्रमशाळेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या आदिवासी जाणीव जागृती व प्रसिद्धी सप्ताहाचे उद्घाटन जुन्नर तालुक्याच्या आदिवासी भागातील तांबे या गावी जुन्नर तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मधुकर अवधानी यांच्या हस्ते झाले. या उद्घाटन समारंभाच्या सुरुवातीस या सप्ताह कार्यक्रमाचे मुख्य संयोजक के. बी. दाते यांनी प्रास्ताविक भाषणात आदिवासीसाठीच्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. त्यानंतर अंधश्रद्धा निर्मुलनाविषयी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम झाले. तसेच ओतूर येथील गाडगेबाबा कलाकेंद्राचे संयोजक आर के. शिंगोटे पाटील यांनी 'अंधश्रद्धा' विषयावर विज्ञान पथकाच्या कार्यक्रमाद्वारे विविध प्रयोग सादर करून अंधश्रद्धा निर्मूलनाची गरज प्रतिपादन केली.

या सप्ताहानिमित्ताने जुन्नर तालुक्याच्या आदिवासी भागातील तांबे, बोताडे आमलेवाडी, राळेगण, घगाळदरे ठाकरवाडी व सोमतवाडी या सात आदिवासी गावांमध्ये सोमतवाडी शासकीय आश्रमशाळेच्या कलापथकाचे सांस्कृतिक कार्यक्रम झाले.

या सप्ताहात पुणे जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघाचे संचालक बाळासाहेब खिलारी, जुन्नर तालुका पंचायत समितीचे सदस्य नामदेव तळपे, जुन्नर तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मधुकर अवधानी, डॉ खारकर, डॉ. ढवळे (इंगळूण), पुण्याच्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील व्याख्यात्या सौ. कांबळे, आदिवासी निरीक्षक पवार आदींनी मार्गदर्शन केले.

या सप्ताहाचा समारोप तालुक्याच्या आदिवासी भागातील सोमतवाडी या गावी पत्रकार चंद्रकांत आवटे यांच्या हस्ते झाला. या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी जुन्नर रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. शंकर ढोबळे हे होते. याप्रसंगी पत्रकार दत्ता म्हसकर, डॉ. सौ. सुनिता ढोबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शेवटी सोमतवाडी शासकीय आश्रमशाळेचे प्रभारी मुख्याध्यापक एल. एस. लकडे यांनी आभार मानले.

या समारोप समारंभप्रसंगी डॉ. शंकर ढोबळे यांचे 'कुष्ठरोग' या विषयावर स्लाईडस्सह माहितीपूर्ण व्याख्यान झाले. त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व सांगितले.

## गुंडाविरुद्ध तक्रार केली; आदिवासी महिलांवर खटला

शहापूर दि. ११ : आदिवासी महिलांना गुंडाने दारू पिऊन घरात घुसून मारहान केली, म्हणून त्या महिला भातसानगर येथील पोलिस चौकीवर तक्रार देण्यास गेल्या असता त्यांच्यावरच खटला भरण्याचा प्रकार घडला आहे.

भातसा धरणाजवळील सावरशेत या गावच्या सनी राघो धापटे व द्वारकी नागो पारधी या अदिवासी महिला त्यांच्या घरी लग्न असताना काळुराम सोनारे याने दारू पिऊन हातात दांडके घेऊन विनाकारण घरात घुसून माराहाण केली, असा असा आरोप आहे.

रात्री १० च्या सुमारास या महिला भातसानगर येथील पोलिस चौकीवर तक्रार करण्यास गेल्या असता ती दाखल करून घेतली गेली नाहीच, पण महिलांची वैद्यकीय तपासणी न करता त्यांच्यावरच केस भरली.

(महाराष्ट्र टाईम्स दि, १२ मार्च १९८९)

# धरणग्रस्तांचा क्रिडामहोत्सव

नर्मदा नवनिर्माण समिती, मध्यप्रदेश, असरग्रस्त संघर्ष समिती गुजरात, व नर्मदा धरणग्रस्त समिती महाराष्ट्र या तीन राज्यांतील आदिवासींच्या संघटना गेली चार वर्षे सरदार सरोवर प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या ७०,००० आदिवासींच्या पुनर्वसनाचे प्रश्नावर लढा देत आहेत.

महाराष्ट्रातील अक्राणीमहल तालुक्यातील आदिवासींचे संघटन करण्यासाठी भूषा गावात योजलेल्या क्रिडासंमेलनाचा वृत्तांत वाचून त्यातही आदिवासी संस्कृतीचे प्रतिबिंब कसे आहे व संघटन बळकट करण्याच्या पद्धती कशा आहेत याचा खुलासा होऊ शकतो. मध्यप्रदेश, गुजरात व महाराष्ट्र या तीन राज्यांतील आदिवासींनी गुजरातमध्ये गरुडेश्वर येथे एकत्र येऊन ३० जानेवारी ८९ रोजी केलेल्या सत्याग्रहाचा वृत्तांतही सोबत प्रसिद्ध करत आहोत. या दोन्ही कार्यक्रमांत सहभागी असणारे कार्यकर्ते श्री. ज्ञानेश्वर पाटील यांनी हे वृत्तांत लिहिले आहेत.

---

नर्मदाकाठच्या १७ गावांतील आदिवासींनी आपल्या इच्छा व्यक्त करण्यासाठी क्रिडामहोत्सवाचा वापर केला. संघटन पक्के करण्याबरोबरच त्यातील भावनिक आशयही मनामनांत पोहचविण्यासाठी आदिवासींच्या नित्याच्याच क्रिडांचा नाविण्यपूर्ण उपयोग केला.

२५ जानेवारी रोजी सकाळपासून क्रिडांगण बनवायला सुरुवात केली कबड्डीच्या मैदानापुरती जागा साफ केल्यानंतर बाणांच्या नेमबाजीसाठी १०० फुटांवर एक खांब गाडण्यात आला व त्या खांबावर जमिनीपासून ३ फुटांवर "बडे बांधोको विरोध किजिये व नर्मदा बांधोको विरोध किजीये असे लिहिलेला व बांधाचे राक्षसाच्यासारखे चित्र असलेला पोस्टरही बांधण्यात आला. त्या पोस्टरवर गोलाकार वलय काढण्यात आले होते व धरणाच्या चित्राला लालस्केचपेनने रंगवण्यात आले होते. अशाप्रकारे नेमबाजीसाठी जागा व लक्ष अशी व्यवस्था करण्यात आली त्यानतर कब्बडीचे मैदान आखून घेतले. बाण लांब मारण्यासाठी उदई नदीचा किनारा नक्की करण्यात आला. हे सर्व झाल्यानंतर झेंडावंदनासाठी एक उंच खांब मैदानाच्या कोपऱ्यात उभा केला.

दुपारी १२॥ नंतर नर्मदा काठावरील एकेक गावचे स्पर्धक प्रतिनिधी यायला सुरुवात झाली. बाणांच्या नेमबाजीसाठी नावे घेणेसाठी श्री. अजित पावरा व श्री. केशव वसावे व श्री. मुरलीधर वसावे यांची निवड करून तशी सूचना टेबलावर उभे राहून ओरडून लोकांना करण्यात आली. १ वाजेपर्यंत ३० स्पर्धकांची नावे आल्यावर स्पर्धांचे उद्घाटन करण्यासाठी भूषाचे पाटील श्री. दादल पावरा ह्यांच्या हस्ते उद्घाटनाचा नारळ फोडण्यात आला. उद्घाटन करताना पहिल्या स्पर्धकाला बाण ताणून उभे केले होते. नारळ फोडल्यानंतर श्री. ज्ञानेश्वर पाटील यांनी नेमबाजीमध्ये काय नेमायचे आहे व का नेमायचे आहे हे सांगताना म्हटले की समोर १०० फुटांवर असलेल्या कागदावर धरणाच्या राक्षसाचे तोंड दिसत आहे व खास करून त्याचे डोळे दिसतात तसेच त्याच्या भोवती गोल केलेले आहेत. तर त्या धरणाच्या राक्षसाचे डोळे आपणाला फोडायचे आहेत व त्या बाण वाल्यांचा पहिला क्रमांक येईल. इतके होईपर्यंत सुमारे ५० स्पर्धकांची नावे आलेली होती. त्यात दोन गट करून तरुण गट व डाचा (मोठा गट) अशी वर्गवारी केली होती. प्रथम तरुण गटापासून सुरुवात केली. तरुण गटातील फक्त दोन स्पर्धकांनीच १०० फुटांवर असलेला कागद टिपण्यात यश मिळाले होते. नंतर प्रौढ गटातील स्पर्धकांनी भाग घेतला. प्रौढ गटातील स्पर्धक मोत्या बासरा पावरा यांनी मात्र अचुक नेमबाजीचे प्रदर्शन केले व राक्षसाच्या कानातच बाण घुसवला सर्व प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले.

बाण मारणारांची यादी तर तयारच होती. पाठोपाठ लांबवर बाण मारण्याच्या स्पर्धा होणार होत्या व त्यासाठी निवडलेल्या जागेवर सर्व प्रेक्षकांनी व स्पर्ध-

कांनी जावे असे आवाहन समितीचे कार्यकर्ते श्री. अजित पावरा यांनी केले. व थोड्याच वेळात लांब बाण मारण्याच्या स्पर्धेला सुरुवात झाली. उदई नदीच्या पलिकडे दोन पंच ठेवण्यात आले व अलिकडून बाण मारण्यात सुरुवात झाली. इकडून मारलेले बाण हे इतक्या लांब जात होते की अवळच्या प्रेक्षकांना नंतर दिसतच नव्हते म्हणून त्या बाजूला ठेवलेले पंच त्यांच्यावर लक्ष ठेवत होते. स्पर्धक पूर्ण झाल्यावर सर्व स्पर्धकांना नदीच्या पलिकडे बोलावण्यात आले व आपापला बाण शोधून त्या ठिकाणी उभे राहाण्यास सांगितले व त्यांची नावे घेतली. नर्मदा काठावरील उदड्या या गावच्याच स्पर्धकांनी एक, दोन, तीन नंबर पटकावले होते. बाण लांब मारण्याची स्पर्धा संपली होती.

कबड्डीच्या सामन्यात निमगव्हान माळ, भूषा, बिलगांव येथील संघांनी भाग घेतला. ढोलाच्या कार्यक्रमात ढोलवाल्यांनी वाजवायला सुरुवात केली व जसे येतील तसे या स्पर्धेत भाग घेऊ लागले. रात्री आठ वाजेपर्यंत २१ ढोलांनी या स्पर्धेत उपस्थिती लावली. प्रथम ठरल्याप्रमाणे निर्णय देण्यासाठी पाच पंचाची निवड करण्यात आली व ढोलवाल्यांचा व नाचणाऱ्यांचा उत्साह बघून सकाळी पाच वाजता निर्णय देण्याचे ठरवले. प्रत्येक ढोलाच्या भोवताली २५ ते ३० माणसे नाचत होती व काही माणसे फक्त बघत होती. रात्री अकरापर्यंत १००० ते १२०० माणसे या ठिकाणी एकत्र झालीत. सकाळी पाच वाजता नंबर काढण्यासाठी पंच एकत्र झाले. श्री दादला पावरा यांच्या हस्ते दि. २६ जानेवारीला ध्वज फडकवण्यात आला निमगव्हान गावच्या तिघांनी येऊन राष्ट्रगीत म्हटले व पुढील कार्यक्रमाला सुरुवात झाली.

पुढील कार्यक्रमाबद्दल श्री. केशव वसावे यांनी दोन शब्द सांगितले स्वातंत्र्य म्हणजे काय व २६ जानेवारी म्हणजे काय इत्यादी मुद्द्यांवर श्री केशव वसावेनी चर्चा केली. संकल्प म्हणजे काय व कोणता संकल्प करावयाचा आहे वगैरे सांगून झाल्यावर श्री अजित पावरा यांनी संकल्प वाचावयास सुरुवात केली. व त्याच्या मागोमाग सतरा गावचे प्रतिनिधी पुनरुच्चार करत होते. मिरवणुकीनंतर थोड्याच वेळात सभेला सुरुवात होती. या सभेतच बक्षिस समारंभ होता म्हणून सर्व उपस्थितांमध्ये उत्सुकता होती. श्री मुरलीधर वसावे श्री उल्ला अबला पावरा व सौ. जयश्री पाटील यांच्या हस्ते बक्षिस समारंभ करण्याचे ठरले होते. समितीचे कार्यकर्ते केशव वसावे यांनी २६ जानेवारी व स्वतंत्र भारत इत्यादी गोष्टींचा थोडक्यात आढावा घेतला. त्यानंतर ज्ञानेश्वर पाटील यांनी २६ जानेवारी, तिरंगा ध्वज, विकासाची दिशा, मोठे प्रकल्प, विस्थापनाचा प्रश्न मोठ्या धरणांमध्ये कुणाचा फायदा, तोटा कुणाचा पुनर्वसनाचा अनुभव इत्यदी विषयावर चर्चा केल्यावर नर्मदा धरणग्रस्तांच्या कार्याची पुढील दिशा व नजिकच्या दिवसात समोर ठेवलेले कार्यक्रम या बाबतीत चर्चा केली. ३० जानेवारीचे 'चुल्हा बंद' कार्यक्रमावर चर्चा करून चुल्हाबदचा कार्यक्रम करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले तसेच ३० जानेवारी केवडीया मिटींग २२ फेब्रुवारी रॅली, इत्यादी कार्यक्रमाची कल्पना देण्यात आली. विरोध कुठे व कसा करावा लागेल याचे स्पष्टीकरण करण्यात आले. स्पर्धकांना श्री उल्या उबला पावरा, श्री मुरलीधर वसावे व सौ. जयश्री पाटील यांच्या हस्ते विविध बक्षिसे देण्यात आली.

## गरुडेश्वर–भादरवा सत्याग्रह

राजपिपल हे भरूच जिल्ह्यातील एक तालुक्याचे शहर, राजापिपलापासून २५ कि. मी. अंतरावर नवागाम येथे नर्मदानदीवर 'सरदार सरोवर' धरण बांधले जात आहे. व या धरणात २५० पेक्षा जास्त गावे पाण्याखाली येणार आहेत. गुजरात राज्यातील १९, महाराष्ट्रातील ३३ व २०० च्या आसपास मध्यप्रदेशातील गावांचा यात समावेश आहे. १९७९ ते ८९ या दहा वर्षांत बुडणाऱ्या गावांच्या पुनर्वसनासाठी सरकारचे जे धोरण राहिले आहे ते पाहाता २५० गावांचे पुनर्वसन सरकार करू शकेल असे वाटत नाही व प्रकल्पाचा एकूण वाढता खर्च पाहाता या प्रकल्पापासून फायदा कमी व नुकसानच जास्त होईल असे स्पष्ट चित्र प्रकल्पग्रस्तांना दिसायला लागल्यावर नर्मदा काठावरील २५० गावांतील लोकांनी गेल्या सहा महिन्यांपासून प्रकल्पच नको, प्रकल्पाला विरोध अशी भूमिका घेतली आहे व या भूमिकेतून अनेक कार्यक्रम प्रकल्पग्रस्त भागात राबविले जात आहेत. 'सरदार सरोवर' हे धरण सार्वजनिक हिताचे आहे व गुजरातच्या हजारो गावांचा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे असे म्हणणाऱ्या या सरकारने प्रकल्पग्रस्तांच्या

पुनर्वसनाचा पुरेसा विचार सुद्धा केलेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रकल्पग्रस्तांनी विरोधाची भूमिका घेतली आहे यात गुजरातची असरग्रत संघर्ष समिती ही संघटना सुद्धा सामील आहे. कवेडीया कॉलनी, गोडावुन व इतर कामासाठी या सहा गावच्या शेतकऱ्यांची जमिन १९६४ मध्ये सरकारने अगदी मामुली भरपाई (८० ते २०० रु. पर एकर) देऊन संपादीत केली आहे व या प्रकल्पग्रस्तांना आजतागायत काहीच दिले नाही, त्यांचे पुनर्वसन केले नाही कारण त्यांची जमीन सरकारी व्याख्येप्रमाणे बुडत नाही (ती कॉलनीसाठी घेतली आहे). कवेडीयाचा आजुबाजुला प्रकल्प विरोधी वातावरण दिसायला लागल्यावर गुजरात सरकारने कवेडीया कॉलनी व सरदार सरोवरच्या आजुबाजुच्या दहा गावच्या परीसरात ऑफिसिअल सिक्रेटस् ॲक्ट नावाचा कायदा लावला आहे. या कायद्यानुसार कोणत्याही बाहेरच्या माणसास त्या दहा गावांमध्ये सभा घेणे, बैठक घेणे, चर्चा करणे, कागदपत्र (संशपीत) बाळगण्यास बंदी आहे. या कायद्याचा अर्थ असा होतो की, कोणत्याही प्रकारचे संघटनात्मक कार्य करण्यास बंदी आहे सार्वजनिक हिताच्या ह्या प्रकल्पाच्या आजुबाजुच्या बंदी गावांमध्ये असा कायदा लावून लोकांच्या हक्कावर गदा आणणे म्हणजे हे धरण खरोखरच सार्वजनिक हिताचे आहे काय? व असेल तर सरकारने इतके घाबरण्याचे काय कारण आहे? लोक मिटींग घेतील, हक्कासाठी लढतील तो त्यांचा हक्क आहे. हा कायदा मोडायला हवा. या दहा गावांमध्ये परत चांगले वातावरण व्हायला हवे लोकांना संघटीत करायला पाहिजे, विरोध करायला पाहिजे. राजपिपलाच्या या संस्थेत दिनांक ३० जानेवारी ८९ रोजी अनेक कार्यकर्ते याच विचाराने एकत्र जमले होते.

३० जानेवारी रोजी सकाळी पुन्हा मिटींग भरली व केवडीयात कायदा तोडण्यासाठी १८ प्रतिनिधींची निवड करण्यात आली. तिन्ही राज्यांचे प्रतिनिधी या १८ प्रतिनिधीमध्ये होते. संस्थांचे प्रमुख संघटनांचे कार्यकर्ते, वकील अशा पद्धतीने यात निवड करण्यात आली होती. भादरवा येथील मिटींगसाठी ताबडतोब निघायचे ठरवले व कायदा मोडणाऱ्यांनी गरुडेश्वरला जावे तेथून नवीन येणाऱ्यांना भादरवा दाखविणे असे ठरवण्यात आले.

गरुडेश्वरपासून भादरवा गाव दोन कि. मी. अंतरावर आहे. समोरच दिसत असणाऱ्या टेकडीच्या पायथ्याला हे गाव आहे. अत्यंत तंग वातावरणात गरुडेश्वर येथे उतरलो. येताना ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त पाहात आलो. अगदी ब्र काढण्याची सुद्धा संधी मिळणार नाही असे वाटू लागले. पण प्रसंग पडल्यावर त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला तर मार्ग सापडतो तसेच यावेळी झाले आम्ही चार कार्यकर्ते गरुडेश्वर स्टॉपवर उतरलो. आम्ही फक्त दोघे–दोघे एकत्र बोलत स्टॉपवरील एका टपरीपर्यंत पोहोचलो. एक तरुण ताबडतोब माझ्याजवळ आला व अत्यंत हळू आवाजात त्याने मला एक बातमी दिली. की महाराष्ट्रातील २५ प्रतिनिधींना आताच या येथेच अटक करून पोलीस घेऊन गेले. इतका निरोप सांगून तो तरुण तेथून सटकला. तो मध्यप्रदेशचा एक कार्यकर्ता होता. आम्हाला समजले की येथे तिघांनी एकत्र आले तर पोलीस पकडतील म्हणून आम्ही दोघे एकत्र राहिलो. सकाळी दहा वाजल्यापासून आम्ही तेथे बसलो होतो. अहमदाबाद, बडोदा येथून या कामासाठी येणाऱ्या लोकांना भादरवाचा रस्ता दाखवत होतो. दुपारी २ वाजता एस. टी.मध्ये बसून केवडीयात दाखल झालो. शेकडो बंदुकधारी पोलीस तैनात होते. आम्ही दोघे, दोघे विखुरले होतो पोलिसांना खबर होती, पण आम्हाला पकडायला त्यांना निमित्त नव्हते. ओळखीच्या माणसांना ओळख देण्याची चोरी झाली होती. एखाद्या चित्रपटाला शोभेल असा सीन दिसत होता. अत्यंत नाट्यमयरित्या आम्ही सर्व वावरत होतो. ठरलेल्या ठिकाणावर जमायला अर्धा तास होता म्हणून आम्ही बसलो होतो. पोलीस बंदोबस्त वाढत होता. दुपारी अडीच वाजता ठरलेले सर्व प्रतिनिधी आले व नियोजित ठिकाणावर जमल्याबरोबर घोषणांना सुरुवात झाली. १) काळ कायदा तोड दो, काला कानून मुर्दाबाद, ३) पोलीसी हिटलरशाही मुर्दाबाद, ४) ऑफिसियल सिक्रेटस् ॲक्ट मुर्दाबाद इत्यादी घोषणा दिल्या जात होत्या. दोन मिनटांतच पोलिसांनी भोवताली कडा केला, घोषणा चालूच होत्या. इन्स्पेक्टरने घोषणा बंद करण्याची विनंती केली व सर्वांना पकडण्याचा हुकूम केला. पोलिसांनी भरलेली बस जवळ आली. पोलीस धक्के मारून बसविण्याच्या बेतात होते. परंतु या १८ माणसांत वकील, संस्थांचे प्रमुख इत्यादी ओळखीच्या व्यक्ती पाहून धक्के मारायला सुरुवात केलेली थांबविली. धक्का मारताच

आमच्या पैकी एका प्रतिनिधींनी पोलिसावर हात उगारला त्यामुळे पोलीस जरा बिचकले व आम्ही घोषणा देत बसमध्ये बसलो.

भादरवा येथे सुमारे ५०० प्रतिनिधी जमले होते प्रकल्पग्रस्त तीनही राज्यांतील गावामधून प्रतिनिधीं आले होते. प्रकल्पास विरोध कशा प्रकारे करावयाचा या विषयावर चर्चा झाली अनेक प्रतिनिधींनी मरेपर्यंत विरोध करण्याचा निर्धार केला. सरकारच्या हुकूमशाही कायद्यांचा सर्वांनी निषेध केला. संध्याकाळी ५ वाजता मिटींग आटोपून सर्व प्रतिनिधी गरुडेश्वरकडे निघाले परंतु राजपिपलाकडे जाणाऱ्या चार रस्त्यावर सर्वांना पोलीसांनी थांबवले व पुढे जाण्यास बंदी केली. सर्वांनी तेथेच बैठक मारली गीत, घोषणा सुरू झाल्या, पोलिसांकडून पाण्याची मागणी केली. पोलिसांनी पाणी पुरवले. थोड्याच वेळाने ५ बसेस आल्या व सर्वांना बसमध्ये बसविले व राजपिपलाकडे बसेस निघाल्या. एव्हाना रात्र पडली होती. गाड्या कुठे घेऊन जात आहेत ते समजत नव्हते. राजपिपलाला आठ वाजेपर्यंत प्रतिनिधी गाड्यामध्येच बसून राहिले. सर्वजण अटक करण्याची मागणी करीत होते. पोलिसांनी नंतर एक चाल खेळली की कुणाला कुठे जायचे असेल तर आम्ही सोडतो, असे सांगितले त्यामुळे लोक फसले व आपापल्या ठिकाणावर पोहोचण्यासाठी बसमध्ये बसले. पोलिसांनी अंधाराचा फायदा घेऊन बसेस दुसऱ्या बाजूलाच वळविल्या व राजपिपलापासून ५ कि. मी. अंतरावर बस उभी केली व उतरण्यास सांगू लागले कार्यकर्त्यांनी उतरण्यास नकार दिला म्हणून पोलिसांनी अंधारात एक कार्यकर्त्यास मारहाण केली. इतकी मारहाण केली की आज सुद्धा त्या कार्यकर्त्यास ऐकण्यास येत नाही. कानाचा पडदा फाटल्याचे डॉक्टर सांगतात, सत्याग्रहातून आदिवासीचा लढण्याचा निर्धार व्यक्त, झाला आहे पण याची दखल कोण घेईल ?

## उद्योगपतींच्या वनीकरणास जंगल-जमीन मिळणार नाही

"वनीकरणासाठी यापुढे उद्योगपतींना जंगल जमिनी दिल्या जाणार नाहीत. या जमिनीवर फक्त फॉरेस्ट-डिपार्टमेन्टचे वतीनेच जंगल-लागवड केली जाईल." असे पर्यावरण व जंगल खात्याचे केन्द्रीयमंत्री श्री. भजनलाल यांनी दि. ३० ऑक्टोबर ८७ रोजी खासदारांच्या सल्लागार बैठकीत सांगितले. शासनाने यासाठी कायदेशीर व्यवस्था केल्याचे सांगून ते पुढे म्हणाले की, "वनीकरण ही लोकांची चळवळ व्हावी यासाठी नॅशनल वेस्टलॅन्ड डेव्ह. बोर्डाचेवतीने विकेन्द्रीत नर्सरीसारख्या योजनांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. ग्रामपंचायती व शाळांनी सुद्धा त्यांच्या ताब्यातील जमिनीत नर्सरी कराव्यात, असे शासनाला वाटते. फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाच्या नव्या आकडेवारीनुसार भारताच्या १९.३२ प्रतिशत जमिनीवर जंगल असल्याचेही या बैठकीत सांगण्यात आले.

# मौखीक-संपदा

निसर्ग-प्रीती आणि शृंगार ही आदिवासींच्या जीवनाची आणि साहित्याची वैशिष्टये आहेत. ग्राथीक अभ्यास पद्धतीत आदिवासींच्या या पैलूकडे दुर्लक्ष होऊन केवळ लग्नाची गाणी व प्रासंगिक गीते यांनाच संपूर्ण साहित्य मानले गेले आहे. शृंगाराचा स्विकार जेथे सुशिक्षित समाजातही पुरेशा निरोगी वृत्तीने होत नाही, तेथे आदिवासी समाजातील त्याविषयीचा मनमोकळेपणा निश्चितच कौतुकास्पद आहे. या भावनेचा आढळ त्यांच्या गीतातही आढळून येतो. 'तुमचा मुलगा माझ्यासाठी झुरतो' असे न म्हणता कुण्या नारीने शृंगार केला व तिच्यासाठी तो मनात झुरतो असे आदिवासी स्त्री सासूला सांगते, तेव्हा त्यातले संकोच व धिटाईचे मिश्रण मनमोहक ठरते. काय काय घडले हे सांगताना जंगलातल्या वाटेवर बांगडया फुटल्या, हार तुटला अशा वेगळया वळणाने कथन केले जाते. नैसर्गिक प्रेरणेनुसार, व स्त्री स्वभावानुसार नटलेल्या आदिवासी महिला फेर धरून ही गाणी गाऊ लागल्या की त्यातील ताल व लय याचा गोडवा वातावरणात एक निराळाच आल्हाद निर्माण करतो व या गीतातल्या भावनाचा प्रत्ययही तेव्हाच येतो.

जुन्नर भागातल्या महादेव कोळी जमातीतली ही दोन गीते पश्चिम डोंगरी जुन्नरच्या पश्चिम डोंगरी भागातील महादेव कोळी जमातीतली ही गीते.........

सौ. सोनाबाई तळपे, रा, घंगाळदरे यांनी संकलित केली आहेत. जुन्नरच्या पश्चिम भागात मुख्यत: शिमगा सणाचे वेळी ही गीते सामूहिक रित्या म्हटली जातात व एकच ओळ पुन्हा पुन्हा म्हणून भावनांची अभिव्यक्ति अधिक स्पष्ट केली जाते.

मुळात मौखीक स्वरुपातच असणारी ही साहित्य-संपदा प्रतिदिनी विस्मरणाचे प्रांतात सरकत असताना ती नोंदविणे व लेखी-छापील स्वरुपात उपलब्ध करणे आवश्यक काम झाले आहे. आता ती फक्त काही मोजक्या व्यक्तिनाच तोंडपाठ आहेत.

अशी गीते प्रत्येक अंकात नियमितपणे प्रसिद्ध करण्याचा मानस आहे व त्यासाठी आदिवासी कार्यकर्त्यांकडून संकलनाचे काम अपेक्षित आहे. गीताबरोबरच, ती कोणत्या भागात कोणत्या जमातीत म्हटली जातात हेही अवश्य कळवावे. मात्र गीते स्वरचित नसून पारंपारिक असणे जरूरीचे आहे हे लक्षात घ्यावे.

## आमराबाजी

जरी पटका ग, मारी झटका
कोण्या नारी न उभा केला ग,
चार घटका
बंधू माझा ग, आला होता
याने पाहिली आमराबाजी ग,
येता-जाता
आमदाबाजी ग, चोळी माझी
कोण्या दर्जानी शिवली होती ग
वर जाळी
वर जाळी ग, नय वाली
हिच्या तोंडाला पावडर लाली ग
सुरमा लेली
हिच्या तोंडाला चमकी लाली ग
सुरमा लेली
आल्या बाई ओ करू काई
सखा झुरतो मनच्या मनी ग
हिच्या पाई
लाल पगडी ग, छाती उघडी
कोण्या नारीन शिनगार केला ग
गळा भरूनी

## हाटा जाता

हाटा जाता...हाटा जाता...
वाटे ग वरी उभ्या गवळणी हाटाकल्या
मुरलीच्या नादानी गोप्या झटाकल्या
आनगटी, आनगटी या धरून मनगटी
बांगड्या फोडल्या
जुन्नरच्या... जुन्नरच्या
वहुत कुसरीच्या चोळ्या फाडल्या
गळी या रे गरसुळी, हारींनी तोडल्या
आटचा पाटचा...आटचा पाटचा
सावर्णाच्या गोटचा डाव मांडला
विटी-दांडू... विटी-दांडू,
सावर्णाचा चेंडू, चेंडू झुगारीला,
विठोबा...विठोबा
मला मारिला तोबा, कंबर मोडिली
रुक्मिणी... रुक्मिणी
बरीच जल्दी केली, कंबर शेकली

## फाटचाच्या डोंगराला

चल जाऊ फाटचाच्या डोंगराला
चल जाऊ फाटचाच्या डोंगराला
वाक मी काढली बोरुलीचे, बोरुलीचे
मोळी मी रचली अशी कशी, अशी कशी
चुंबळ केली मी गरक्याची बाई, गरक्याची
आणू टाकली मह्चादारी बाई, मटचादारी
चल जाऊ फाटचाच्या डोंगराला
चल जाऊ फाटचाच्या डोंगराला
माजल्या सासूला आल राग बाई, राग बाई
माजल्या नवऱ्याला आली किव बाई, किव बाई
उचलून घेईल का मांडोवरी बाई, मांडीवरी
जेवायला दिले का दूध-भात बाई, दूध-भात
चल जाऊ फाटचाच्या डोंगराला

**संकलक-राजाराम बेंडकोळी**

गीते-इगतपुरी विभागाती, महादेव कोळी जमातीतील

## मला देशील ग कोणाघरी

बाभूळ बाईचा हिरवा पाला
आई मला देशील ग कोण्याघरी
बाय तुला देईल गौळचा घरी
गौळ्या घरी नको ग आई
दूध वाहता परण्या जाई ॥ध्रृ॥

बाय तुला देईल कुंभारा घरी
कुंभारा घरी नको ग आई
माती मळता परण्या जाई ॥१॥

बाय तुला देईल लोहार घरी
लोहार घरी नको ग आई
लोखंड झोडता परण्या जाई ॥२॥

बाय तुला देईल सुतार घरी
सुतार घरी नको ग आई
लाकडे तोडता परण्या जाई ॥३॥

बाय तुला देईल शिप्या घरी
शिप्या घरी नको ग आई
कपडे शिवता परण्या जाई ॥४॥

# आदिवासी साहित्यिक प्रशिक्षण शिबिर

**सुधीर जोग**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या रौप्य महोत्सवानित्ताने संस्थेने जव्हार येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या प्रांगणात दि. २६/२९ फेब्रुवारी १९८८ दरम्यान आयोजित केलेले आदिवासी साहित्यक प्रशिक्षण शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले. राज्याच्या सर्व भागांतील सुमारे ५० नवोदित आदिवासी साहित्यिक या शिबिरात सहभागी झाले होते.

या प्रशिक्षण शिबिराचे उद्‌घाटन शुक्रवार दि. २६ फेब्रुवारी १९८८ रोजी दै. "केसरी" पुणे चे संपादक मा. डॉ. शरदचंद्र गोखले यांचे शुभहस्ते झाले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी जव्हार येथील प्रथितयश ॲड. राजाराम मुकणे होते. प्रमुख वक्ते म्हणून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संचालक मा. डॉ. गोविंद गारे उपस्थित होते.

उद्‌घाटक डॉ. शरदचंद्र गोखले यांनी आपल्या भाषणात "साहित्यिक आपल्या अनुभवांचा, भावभावनांचा अविष्कार का करतो? आपल्याला काहीतरी सांगावसं वाटतं म्हणून आपण सांगतो, का सांगतो तर कुणीतरी ऐकणारे आहे म्हणून सांगतो. अनुभवांचा, भावभावनांचा अविष्कार हा उभ्यान्वयी संबंध आहे. सर्वसाक्षी वाचक व श्रोता हा आपल्या मनातील अनुस्यूत भाव आहे. उत्कट जिवंत अनुभव ओळखण्याची क्षमता साहित्यिकाकडे असली पाहिजे. दलित साहित्यपेक्षा आदिवासी साहित्याचे असलेले वेगळेपण स्पष्ट करताना डॉ. गोखले म्हणजे "दलित व आदिवासी भोवतालची सांस्कृतिक चौकट व वातावरण वेगळे आहे. आदिवासींना समृद्ध संस्कृतीची चौकट आहे. आदिवासींच्या संस्कृतीला मातीचा सुगंध आहे. यामुळे आदिवासी साहित्य ही दलित साहित्याची नक्कल न होता त्याला स्वतःच असं वळण व शैली असली पाहिजे."

आदिवासींच्या बोलीभाषा अतिशय समृद्ध असून आदिवासी संस्कृती कोश व आदिवासी बोलिभाषा कोश तयार करण्याचे महत्त्वाचे कार्य शासन व विद्यापीठे यांनी सहकार्याने करावे अशी सूचना डॉ. गोखले यांनी केली. आदिवासी लेखकांचे साहित्य "केसरी" मध्ये प्रसिद्ध करण्यास आनंद वाटेल असे त्यांनी याप्रसंगी जाहीर केले.

प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संचालक मा. डॉ. गोविंद गारे यांनी आदिवासी साहित्यिकांनी वैयक्तिक दुःखे व वेदना यापेक्षा आदिवासी समाजाची दुःखे व वेदना यांना आदिवासी साहित्यात प्राधान्य द्यावे असा मोलाचा सल्ला आदिवासी साहित्यिकांना दिला व लोकगीते, लोककथांचा समृद्ध ठेवा आदिवासी समाजाने मौखिक स्वरूपात अजूनपर्यंत जपून ठेवला आहे, त्याला आदिवासी साहित्यिकांनी लिखित स्वरूप द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणत ॲड. राजाराम मुकणे म्हणाले, "उपेक्षित समाजाची दुःखे वेशीवर टांगली जातात तेव्हांच त्यांना न्याय मिळतो."

श्री. सुधीर जोग यांनी समयोचित शब्दांत आभारप्रदर्शन केल्यानंतर पसायदानाने या उद्‌घाटन समारंभाची सांगता झाली. यानंतर दुपारच्या सत्रात श्री. श्रीपाद जोशी यांनी "काव्यलेखन" याविषयावर मार्गदर्शन केले.

रात्रीच्या सत्रातील कविसंमेलन चांगलेच रंगले. जव्हार येथील कवी श्री. भाऊ विशे यांनी प्रसिद्ध आदिवासी कवी श्री. भुजंग मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संचालन केले.

दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सत्रात श्रीमती मंदाकिनी भारद्वाज यांनी कादंबरी लेखानासंबंधी व श्री. म. पां. भावे यांनी "लोकसाहित्याचे संवर्धन" या विषयावर मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात डॉ. वसंत बोरगावकर यांनी चरित्र व आत्मचरित्र लेखनासंबंधी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. डॉ. भाऊ मांडवकर यांनी आदिवासींच्या लोकसाहित्याचे खुमासदार शैलीत विवेचन केले.

रात्रीच्या सत्रात कथाकथनाच्या तंत्रासंबंधी श्री. अशोक जोशी यांनी मार्गदर्शन केल्यानंतर कथाकथनाचा कार्यक्रमही चांगलाच रंगला. जव्हार येथील साप्ताहिक

"कालतरंग" चे संपादक श्री. दयानंद मुकणे व श्री. सुनील सोनवणे यांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन केले.

दि. २८ फेब्रुवारीला सकाळच्या सत्रात श्रीमती सिंधुताई अंबिके यांनी आदिवासी लोकगीतांतील माधुर्याचे दर्शन घडवले. यानंतर "आदिवासी साहित्याच्या प्रेरणा, स्वरूप व पुढील दिशा" यावरील परिसंवाद चांगलाच रंगला. या परिसंवादात श्री. भुजंग मेश्राम, श्री. विनायक तुमराम व श्री. मारुती कुळमेथे इ. नी भाग घेतला.

दुपारच्या सत्रात प्रा. शरद कुलकर्णी यांनी साहित्य व समाज यांच्या नात्याचे अभ्यासपूर्ण व प्रभावी विवेचन करून आदिवासींच्या वास्तव जीवनाचे प्रतिबिंब आदिवासी साहित्यात पडावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

रात्रीच्या सत्रात कापरीच्या पाड्यावरिल आदिवासींनी पारंपरिक लोकनृत्ये सादर केली.

दि. २९ फेब्रुवारीला सकाळच्या सत्रात प्रसिद्ध नाटककार श्री. शाम फडके यांनी आकाशवाणीसाठी एकांकिका लेखनासंबंधी मार्गदर्शन केले.

यानंतर श्री. शाम फडके यांच्या अध्यक्षतेखाली या प्रशिक्षण शिबिराचा समारोप झाला. शिबिरातील मार्गदर्शनाविषयी श्री. मरसकोले, श्री. रत्नम गोटले, श्री. लक्ष्मण, श्री. टोपले इत्यादींनी आपले मनोगत व्यक्त केले. श्री. श्रीनिवास कर्वे यांच्या आभार प्रदर्शनानंतर या यशस्वी व उपयुक्त शिबिराची सांगता झाली.

## सरदार-सरोवर प्रकल्पग्रस्त आदिवासींच्या मागण्या

१) पुनर्वसनाचा आराखडा तयार करताना आम्हास द्यायची पर्यायी जमीन ही अक्कलकुआ शहादे व तळोदे या तालुक्यातच, गावे एकत्र बसतील अशी, शेतीयोग्य, सिंचित व वादग्रस्त नसलेली अशी असावी.

२) प्रत्येक धरणग्रस्त कुटुंबास नर्मदा न्यायाधिकरण निवाड्यानुसार किमान ५ एकर जमीन दिली जावी.

३) जुने अतिक्रमणदार व भूमिहीन यांनाही कुटुंबामागे ५ एकर जमीन द्यावी. तसेच १८ वर्षावरील प्रत्येक व्यक्तीस निवाड्यानुसार कुटुंब मानण्यात यावे.

४) धरणग्रस्त गावातील किमान तीन दशके बंद असणाऱ्या शाळातील घरबसल्या पगार खाणाऱ्या शिक्षकांवर योग्य कायदेशीर कारवाई करावी व नवीन स्थानिक शिक्षकांच्या भरतीने सर्व शाळा त्वरित सुरू कराव्यात.

५) अक्राणीतील भू-आलेखाच्या कार्यातील सर्व उणिवा दूर करून, जुन्या अतिक्रमणदारांना जमिनीची खात्री द्यावी.

६) अक्कलकुआ तालुक्यातील पण गुजरातमध्ये हलवल्या गेलेल्या "मणिबेली" गावातील सुमारे शंभर कुटुंबांना दिलेल्या जमिनीचे मालकी हक्कपत्र व कायद्यानुसार द्यावयाच्या सर्व सोयी ताबडतोब पुरविण्यात याव्यात.

# शासनाने बांधून दिलेल्या झोपड्यांनाही घरनंबर आणि घरपट्टी नाही

**रा. वि. भुस्कुटे**

श्रमिक मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांचे जमीन विषयक प्रशिक्षण शिबीर मुरबाड तालुक्यातील सरळगाव येथे १५ ते १७ मार्चच्या दरम्यान झाले. या शिबिराचे वेळी नजीकच्या इंदिरा पाड्यातील दामा खुलात हेलम, वामन चिमा निरगुडा, लक्ष्मण बेंडू पार्धी, आंबो काळू शिंदे वगैरेंशी गप्पा झाल्या. या पाड्यावर बोअरिंग दिले आहे. विजेचे खांब टाकून इलेक्ट्रिक पंप बसवून पाड्यातल्या लोकांची पाण्याची सोय केली आहे. पण विनोद म्हणजे झोपडीपाशी विजेचा खांब आहे पण झोपड्यांमध्ये अंधारच आहे. मागील वर्षाच्या फेब्रुवारी-मध्ये झोपड्यांतील फिटींगही पूर्ण झाले. मीटर देऊन कनेक्शन देण्याचा मुहूर्त मात्र अजून उगवलेला नाही. त्यांची कोणी दादच घेत नाही. इंदिरा वाडीतल्या या झोपड्या शासनानी १०।१२ वर्षापूर्वी बांधून दिल्या आहेत. पण या झोपड्यांना अजूनही घरक्रमांक दिले नसल्याचे व घरपट्टी बसवली नसल्याचे गप्पांच्या ओघात समजले. शासनाने बांधून दिलेल्या झोपड्यानाही ग्रामपंचायत घरनंबर देत नाही याचे सर्वांनाच आश्चर्य वाटले.

गुरुदेव सिद्धपिठामधील कामगारांनी मागील वर्षी संप केला. हे आदिवासी कामगार शासनाने बांधून दिलेल्या झोपड्यातून राहातात पण त्यांच्या झोपड्या-नाही नंबर नाहीत. व घरपट्टीही नाही. श्रमजीवी संघ-टनेच्या मोहिमेमध्ये या कामगारांनी घरनंबर द्यावा म्हणून पंचायतीकडे अर्ज दिले. आठ महिने झाले तरी सरपंच सत्ताधारी पक्षाचे व कामगारविरोधी म्हणून या झोपड्यांना अजूनही नंतर मिळालेले नाहीत.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे प्रकरण ३ मध्ये "प्रशासकीय शक्ती आणि कर्तव्ये" नेमून दिली आहेत. या प्रकरणातील कलम ५४ प्रमाणे ग्रामपंचायत हद्दीतील घरांनाच नव्हे तर गोठ्यांनाही घर क्रमांक द्यायचे आहेत. हे ग्रामपंचायतीचे कर्तव्य आहे. एवढेच नाही तर या कलमाच्या पोट कलम (२) प्रमाणे ग्राम-पंचायतीने दिलेल्या क्रमांकापेक्षा वेगळा घरक्रमांक लावल्यास किंवा घरक्रमांक न लावल्यास रक्कम रु. २०/- पर्यंत जास्तीही ठरवण्यात आली आहे. घरपट्टी बसवल्याने ग्रामपंचायतीचे कायमचे उत्पन्न वाढते तेव्हा घरपट्टी बसवणे हे ग्रामपचायतीचे निव्वळ कर्तव्यच नाही तर ते आर्थिक फायद्याचेही आहे.

ग्रामीण भागात स्वत:ची झोपडी असणे, एकर दोन एकर जमीन असणे म्हणजे त्या व्यक्तीला 'खानदान' प्राप्त होते. त्याला मान मिळतो. त्यामुळे सामाजिक प्रतिष्ठा मिळते. मुलामुलींचे विवाह ठरवताना त्या गोष्टीला तर खूपच महत्त्व येते. तेव्हा झोपड्यांबद्दल, जमिनीबद्दल मालकीहक्क दाखवणारा कागद जवळ असणे आदिवासी, दलित, भूमिहीन यांना फार अप्रूप वाटते. त्यांना त्याचे अनन्य साधारण महत्त्व वाटते. त्यांना त्यामुळे खानदान प्राप्त होते. किरकोळ गुन्ह्या-मध्ये कोणी सखासोयरा अडकला तर त्याला कोर्टात जामीन राहून सोडवण्यासाठी घरपट्टी पावतीचा व्यव-हार्य उपयोगही त्यांना मोठा मोलाचा वाटतो.

सवर्ण आणि उच्च वर्गियांच्या वर्चस्वाखालील ग्राम-पंचायती शासनाने सरकारी पैशातून बांधून दिलेल्या अधिकृत झोपड्यांनाही जेव्हा घरक्रमांक देत नाहीत, घरपट्टी बसवत नाहीत. कायदेशीर कर्तव्य पार पाडीत नाहीत.

सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे आदिवासी दलित, भूमिहीन गृहहीन यांना झोपड्या बांधून देण्याची योजना गेली १५ वर्षे महसूल खात्याकडून, जिल्हा परिषदेकडून राबवण्यात येते. या दोन्ही खात्यांच्या अनुभवी कर्तव्य तत्पर (?) आणि कायदेबाज वरिष्ठ आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांना ही क्षुल्लक पण महत्त्वाची बाब लक्षात आली नाही ही वस्तुस्थिती आहे. हे निव्वळ त्यांच्या अज्ञानामुळे चुकून झाले असे मात्र नक्कीच म्हणता येणार नाही.

या झोपड्या सरकारी योजनेप्रमाणे सरकारी पैसा खर्च करून बांधण्यात आल्या आहेत. कोणत्या गावातून केव्हा, कुठे, त्या बांधल्या याचे रेकॉर्ड महसूल खात्याकडे आहे. या अशा झोपड्यांना ग्रामपंचायतीनी घरक्रमांक दिले आहेत कां? या झोपड्यांना घरपट्टी बसवून ती वसूल केली जाते का? याची माहिती शासनाने,

(पान ३६ वर पाहा)

# दसरा : जव्हारच्या आदिवासींचा !

प्रा. भास्कर गिरधारी

दसऱ्याच्या दिवशी आदिवासी लोक खूप आनंदात बुडून जातात. ' दसरा सण मोठा नाही आनंदा तोटा ' याचा प्रत्यय येतो. दसऱ्याच्या सुमारास आदिवासी लोकांचे शेतातील पीक पिकावर भरास आलेले असते. शेतातील पीक गोळा करता करताच आदिवासी लोकांचा आनंदाचा सण दसरा जवळ आलेला असतोच.

घटस्थापना झाली की पहिली माळ चढते. तिथून आदिवासी लोकांमध्ये घरातील मुख्य माणूस दसरा येईपर्यंत पथ्य पाळीत असतो. उपवास धरत असतात. ज्या काही वस्तूंची पथ्ये पाळली जातात. त्यात काकडी, डांगर, सफेत खेकडा, दोडा या वस्तूंचा समावेश होतो. या वस्तू ते या कालावधीत खात नाहीत.

अंबा देवीला शेवटची माळ चढली की त्या दिवशी सर्व घरांतील देवांची पूजा केली जाते. उपवास सोड-तात. मग मात्र काकडी, डांगर, सफेत खेकडा, दोडा या वस्तू खायला सुरुवात करतात.

दसऱ्याच्या दिवशी आदिवासी लोकांची मुख्य हत्यारांची पहिली पूजा केली जाते. गाय, बैलांची पूजा केली जाते. दसऱ्याचा दिवस शुभ आणि चांगला मानला जातो म्हणून आदिवासी लोक सर्व काही करत असतात.

आदिवासी लोकांना दसऱ्याची आनंद पर्वणी म्हणजे त्यांचे आवडते ' तारपा नृत्य ' या तारपा नृत्याने ते धुंद होतात. आनंदाच्या डोहात डुंबतात, तल्लीन होतात यावरून या नादलयात दुःख पचवून तरंगणाऱ्या आदि-वासींच्या नृत्यकला प्रेमाची साक्ष पटते. आदिवासींचा दसरा एका विशिष्ट ठिकाणी साजरा करण्याची पद्धती आहे. त्या ठिकाणी सर्वजण आपले तारपानृत्य बरोबर घेऊन मेळावा भरवितात. आणि रात्रंदिवस त्याच आनंदात नाचत राहतात. हे तारपानृत्य दसऱ्यापासून सुरू होते आणि थेट पुढे दिवाळीपर्यंत चालू राहते.

तारपानृत्या बरोबरच ढोल नाचही सादर केला जातो. आदिवासींच्या मधील ' ठाकूर ' जमात हा नाच जास्ती करून सादर करतात. या नाचात विशिष्ट तालावर ढोल वाजविला जातो. नाचणाऱ्यांच्या एका हातापायात घुंगरू बांधलेले असते. मोठ्या उत्साहात बेहोष होऊन नाचा ढोलाच्या तालावर नाचतो. ढोलाच्या ठेक्यावर विशिष्ट लयीत कसरती करतो. त्यात अक्षरशः सर्कसच असते. नादाची धुंदी असते. कोलांटचा उड्या असतात. एका विशिष्ट लयीत नाचणारा ढोलावर उलथे–पालथे होऊन नाचत असतो. नव्हे धडाधड आदळत असतो. नाचता नाचता त्यात पिरॅमिडसुद्धी तयार केले जातात. एखाद्या दहीहंडीची आठवण व्हावी असे ते सारे खेळ असतात. घुंगरू आणि ढोल याच्या नादात सारे जण त्यांचे सारे विश्वच जणू घामाने डब-डबून जाते. त्याचवेळी तोंडाने गाणी म्हटली जातात. पण त्या गाण्यांचे बोल ढोल घुंगरू पायांच्या आवाजात लोपून जातात, नुसता लयीतला ध्वनी ऐकू येत राहतो.

जव्हारचा दसरा हा आदिवासींच्या दसरा साजरा करण्याच्या पद्धतीतील आणखी एक विलक्षण बहारदार अनुभव आहे. जव्हारचा दसरा हे साऱ्या महाराष्ट्राचे आणि आदिवासी परिसराचे आकर्षण आहे. एका विशिष्ट पद्धतीने परंपरेने चालत आलेल्या रीतीरिवाजाने हा दसरा सण साजरा होतो. खेडोपाडीचे आदिवासी, मग त्यात ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या आठही प्रमुख उपजाती आढळतील. त्या एकत्र येऊन दसरा साजरा करतात. त्यात महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी, क ठाकूर, म ठाकूर, वारली, कोकणी, कातकरी इत्यादी विविध जमातीच्या लोकांचा समावेश असतो.

सगळे एकाच जव्हारच्या हनुमान पॉईंटच्या दिशेने वाट चालू लागतात. आपल्या अति ग्रामीण अगदी आतल्या खेड्यापाड्यांतून कित्येक मैल जंगलातली, खडकाळ, डोंगर दऱ्यातली बिकट वाट पायी तेही अनवाणी तुडवत हे सारे आदिवासी पायी चालत आलेले असतात. तहान भूक विसरून नाचत नाचत वाजत गाजत सगळे आदिवासी येतात आणि सगळे रस्ते आणि दिशा फुलून येतात. तारपा, ढोल, घुंगर यांच्या आवा-जाने नादब्रह्मात सारे लीन होतात. ब्रह्मानंदी टाळी लागते. आदिवासी स्त्रीयांना मुळातच नटण्याची साज-शृंगार करायाची विलक्षण हौस असते. सोन्याचांदीच्या नसल्या तरी रुप्याच्या – वाक्यांनी पितळी लोखंडी

दागिन्यांनी त्या लदलेल्या असतात. गळ्यात रंगीबेरंगी मण्यांच्या माळा घालतात. डोक्याला केसांचा अंबाडा, बुचडा किंवा चक्कर घालून त्यावर काळी जाळी बांधतात. विपुल बिलपांनी हेअरपीन्सनी केस घट्ट चोपून बसवितात. केसांना चाफा, मोगरा, गुलाब, झेंडू मिळेल ती रान फुले पाने 'पत्रं पुष्पम्' लेवून त्या सजवतात. भडक रंगीबेरंगी रिबीन्स आवडीने लावतात. तसेच भडक रंगाचे कपडे करून आपापल्या पाड्यांतील माणसात मिसळून नाचत गाजत चालत गात नाचत येतात. पुरुषांप्रमाणे स्त्रीयांचेही सीमोलंघन असते. पुरुष मात्र नेहमीप्रमाणेच 'दसरा' हा मोठा सण असूनही त्या दिवशी लंगोटी, फडकी फार तर हल्ली अर्धी चड्डी घातलेले असतात. डोक्याला असते मुंडासे अथवा टोपी आणि असलीच तर अंगात बंडी, सदरा अथवा नुसते बनीयनच. पण आनंदाला नसतो तोटा. ते आपल्या जव्हारच्या आवडत्या राजा महाराजांना पाहण्यासाठी, भेटण्यासाठी चालत जात असतात. थकवा विसरण्यासाठी त्यांनी जरूर मद्य प्राशन केलेले असते. त्यात स्त्रीयाही मागे राहत नाहीत. सगळ्यांचे डोळे लाल. मद्याच्या नशेमध्ये राजाच्या पायावर डोके ठेवण्यासाठी भरजरी पोषाखातील नंगी तलवार घेऊन राजबिंडा राजा पाहण्यासाठी, त्याला अभिवादन करण्यासाठी, मुजऱ्यासाठी, समाजासाठी, ही दसऱ्याची प्रथा रुढ आहे. संपूर्ण जव्हारमध्ये दसऱ्याच्या दिवशी सकाळपासून ही शोभा यात्रा पाहायला मिळते. आदिवासींचे तांडेच्या तांडे फुलून बहरून, रात्रंदिवस नाचनाचून, तारपा ढोल वाजवून सोंग घेऊन चालत असतात. निदान दसऱ्याच्या दिवशी तरी आपल्या व्यथेचे दारिद्र्याचे त्यांना स्मरण होत नाही. ते सगळे विसरतात. स्वतःलाही विसरतात.

हनुमान पॉईंटला भव्य यात्रेचे स्वरूप घेते. सगळ्या नद्या सागराला तशा सगळ्या वाटा आणि आदिवासींचे जथे हनुमान पॉईंटला येऊन मिळतात. शेवटी कार्यक्रम असतो रावण दहनाचा. एक भला मोठा चिंध्यांचा रावण केला जातो. त्याला असंख्य आदिवासी बंधू-भगिनींच्या आणि समस्त जव्हारकर नागरिकांच्या साक्षीने अग्नी दिला जातो. रावण अवाढव्य बनवतात तो पूर्ण जळेपर्यंत सगळे उभे थांबतात. रावण दहन झाले की सगळे दमून थकून तरीही पुन्हा वाजत गाजत नाचत, ढोल टिपऱ्या तारपाच्या धुंदीत घरोघर परततात. आपट्यांची पाने वाटतात. दुःख पचवून सगळ्यांना आनंद देतात.

दसरा म्हणजे अश्विनामधला सण, अंबामातेचा नवरात्र उत्सव या नऊ दिवसांत तुळशीच्या झाडावर दररोज एक याप्रमाणे माळ बांधतात. आपले कुलदैवत घरी बसले असे मानले जाते. या दिवसात उपवासही धरले जातात. देवाला नवस पुरवले जात नाहीत. विशेष म्हणजे मुली एक तांब्या घेऊन त्यात अनेक फुले कणसे एकत्र करून तांब्यात खोचून, साडी नेसून हातात कांड्या टिपऱ्या घेऊन गावोगाव प्रत्येक दारी जाऊन गाणे सांगून जोगवा मागतात. त्या तांब्याला 'भोंडवाय' म्हणतात. त्या ठिकाणी–

'तुझ्या माझ्या अंगणी
चाफा लावू चांदणी
चाफ्याला पाणी घालूनी
चाफा आला भरासी
चाफा आला भरासी
कळून कळी वाटली
कळून कळी वाटली
एक कळी गळाली
एक कळी गळाली
तीच कळी वेचूनी
नवशा हार मी गुंफिला
नवश्या हार गुंफूनी
देवीला मी वाहिला'

असे गाणे गातात. नवव्या दिवशी मागून आणलेले धान्य-जोगवा त्याचा नैवेद्य देवीला वाहतात. तो दिवस म्हणजे दसरा. 'दसरा' म्हणजे घरी बसलेले देव सुटे करण्याचा दिवस. चेडा, गावदेवी, मऱ्ही, चव्हाटचा, मुंड्या या अनेक देवांना शेंदूर फासून पूजा केली जाते. पूर्वी अनेक ठिकाणी रेडा मारला जात असे. परंतु सध्या काही ठिकाणी कोंबडा, बकरा, यांचा बळी देतात. सायंकाळी आपट्यांच्या पानांची पूजा करून एकजण दुसऱ्याला ती पाने देतात. पाय धरतात. भेटी-गाठी घेतात. आनंदी आनंद चोहीकडे पसरवितात.

# दोन जीवाशी

## अश्विनी घोरपडे

"पहला पोर ना पहला सोड सारखाच गो सारखाच." असे वारली स्त्रिया म्हणतात. म्हणजे पहिले मूल व शेतातील भाताचे पहिले सोड सारखेच असे त्यांना वाटते. जितक्या पहिल्या भाताच्या सोडाची अपूर्वाई, आनंद तितकाच पहिल्या मुलाच्या जन्माने होतो. वारलयांचे जीवन शेतीवरच सर्वस्वी अवलंबून असल्याने प्रत्येक गोष्टीची तुलना शेतीशी केली जाते.

निसर्गतःच स्त्रीला मातृत्वाची ओढ असते. तशीच वारली स्त्रीलाही असते. मूल होणे म्हणजे तिचे कुटुंबातील व पर्यायाने समाजातील स्थान निश्चित होत असते. कारण मूल झाल्यानंतर पती दुसरी पत्नी करणार नाही याची तिला खात्री वाटते. व समाजही तिच्याकडे 'वांझोटी' म्हणून पाहात नाही. मूल नसलेल्या स्त्रीला इतर समाजातील स्त्रियांसारखेच बाळीत टाकणे, घालून पाडून बोलणे, अपमानास्पद वागवणे हे तिलाही सहन करावे लागते. यामुळे विवाहानंतर एखाद वर्षात मूल झाले नाही की, भगताकडून औषध घेण्यास, नवसायास करण्यास ती मागेपुढे पाहात नाही. भगताने मंतरून दिलेली एखादी औषधी मुळी कापडाच्या चिंधीत गुंडाळून गळयात किंवा दंडावर बांधते, इतके करूनही मूल झाले नाही तर ती उपेक्षित ठरते व तिचे जीवनही कष्टदायी होते.

जन्माला येणारे बाळ चांगले असावे असे वारली स्त्रिलाहि वाटत असते. त्यांच्या पारंपरिक विचारसरणीनुसार, भूताखेताची, चेटकीणीची बाधा होऊ नये, यासाठी वारली स्त्री अत्यंत खबरदारी घेते. अमावस्या-पौर्णिमेला विशिष्ट भागातून फिरायचे नाही. जी 'भूताळी' स्त्री म्हणून ओळखली जाते, त्या बाजूला फिरकायचे नाही, विशेषतः जिथे तीन रस्ते एकमेकांस मिळतात अशा रस्त्यावर उतारा करून टाकलेला असतो, तो ओलांडायचा नाही. ग्रहणात झाडणे, चिरणे यासारखी कामे न करणे हे सर्व नियम बाळ सदृढ जन्माला यावे म्हणून ती काटेकोरपणे पाळत असते.

गरोदर स्त्रीला "दोन जीवाशी" असे संबोधले जाते. म्हणजे एका शरीरात दोन जीव म्हणजे प्राण आहेत, असा त्याचा अर्थ असतो. शब्द समर्पक असला तरी शास्त्रीय दृष्टिकोनातून दोन जीवाची जोपासना कशी करावी, हे अजून तिला उमगले नाही. वडिलधाऱ्या स्त्रिया, सुईणी सांगतात, "दोन जीवाशी आहे, तर कमी खा" कारण त्यांची अशी कल्पना असते की, स्त्रियांच्या पोटात अन्नाच्या पिशवी खाली गर्भाची पिशवी असते. व खूप खाल्ले किंवा पोटभर जेवले तर अन्नाच्या पिशवीचा भार गर्भाच्या पिशवीवर पडून गर्भ नीट वाढत नाही. कारण गर्भाची पिशवी व पर्यायाने गर्भ, अन्नाच्या वजनाने चेपला जातो. या मूळीच्या समजुतीमुळेच गरोदर स्त्री भुकेलीच राहते. शारीरिक कष्ट तर नेहमीप्रमाणेच करावे लागतात. यामुळे रक्तक्षय होण्याची शक्यता असते; अशक्तपणाही येतो.

शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी आदिवासी भागातून जावून औषध पुरवठा करीत असतात. पण या केंद्राच्या नर्सकडून तपासणी करून घेण्यास वारली स्त्री तयार नसते. कारण कुटुंबनियोजनाचे काम करणारी नर्स, गर्भ चांगला वाढण्यापेक्षा गर्भ पाडण्यासाठी औषध देत असावी, असा संशय तिच्या मनात घर करून राहिला आहे. रक्तक्षय झालेल्या स्त्रीला लोहाच्या गोळया दिल्या जातात. पण या गोळयांमुळे संडास काळी होते, हा काळा रंग विषारी पदार्थामुळे येत असावा असे तिला वाटते. त्यामुळे तिच्या व गर्भाच्या दृष्टीने मौल्यवान असणाऱ्या गोळया तिला जीवघेण्या वाटतात.

केवळ वैद्यकीय सेवा सुविधा या मंडळींपर्यंत पोहचवून खऱ्या अर्थाने त्यांना आरोग्य लाभणार नाही. कारण या सुविधांचा फायदा घेण्यास, ही, मंडळी उत्सुक नाही तर साशंक आहेत. म्हणून गरज आहे, त्यांच्या गैरसमजुती दूर करण्याची, त्यासाठी त्यांची शारीरिक रचना मॉडेल्स दाखवून समजून सांगितली पाहिजे. गरोदरपणात गर्भ आईच्या अन्नावर व रक्तावर कसा पोसला जातो, हे समजावून सांगितले पाहिजे. केवळ कुटुंबनियोजनाचा प्रचार न करता, असणारी व नव्याने जन्मला येणारी बालके, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता यांच्या आरोग्याकडे लक्ष पुरविले पाहिजे. एकात्मिक बाल विकास योजनेत वरील सर्व व्यक्तींच्या आरोग्याची दखल घेतली आहे. पण अजूनपर्यंत आरोग्य शिक्षणाचा प्रसार प्रभावी होऊ शकला नाही. त्यामुळे पारंपरिक समजूती, अंधश्रद्धा यावरच त्यांची श्रद्धा आहे. शासकीय धोरणानुसार इ. स. २००० च्या शतकापर्यंत 'सर्वांसाठी आरोग्य' लोकशिक्षणाशिवाय साकार होऊ शकेल का?

संवेदना

# राजी किरात

## प्रा. मानस स्वामी

प्रख्यात अभ्यासक राहुल सांस्कृत्यांनी किरातांचे वंशज म्हणून त्यांचा उल्लेख केला आहे. हिमालयाच्या रम्य वनराजीत पिथोरागड भागात हातात लाकडी कटोरे घेऊन हिंडणाऱ्या या आदिवासींना 'राजी' या नावाने ओळखतात. बर्फाच्छादित शिखरे व पाईन वृक्षांची गर्द जंगले यांच्या सहवासात जगणाऱ्या राजींची सध्या अनेकांना आठवण आली ती 'राजी' वंश नष्ट होण्याच्या वाटेवर असल्याच्या अहवालामुळे.

भारत हा निरनिराळ्या वंशाच्या, जमातींच्या वशिष्टयपूर्ण सहजीवनाचा एक अद्वितीय गुच्छ आहे. इतिहास, मानववंश शास्त्रज्ञ अशा अनेक विषयांतील जागतिक तज्ज्ञांना भारताचे आकर्षण आहे, ते याच कारणाने. जगाच्या इतिहासावर, मानववंशाच्या पूर्वीच्या संस्कृती संपन्न जीवनावर प्रकाश टाकू शकतील असे अनेक वंश भारतात जगतात. पण त्यांच्या यादीतून राजी वंशाचे नाव पुसले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बालमृत्यू व इतर कारणाने आता त्यांची संख्या ५०० सुद्धा उरलेली नाही. चंपावत, डिटीहट व दारचूल या तीन तालुक्यांतील मोजक्या गावांत हिमालयाच्या उतरणीवर शीतवाऱ्यात ते कसेबसे तग धरून आहेत. संख्या घटत चालल्याने त्यांची वैशिष्ट्यपूर्ण गाणी व सामूहिक नृत्ये बंद पडली आहेत.

हिमालयाच्या जंगलात हिंडता हिंडता राजी लाकडाचे उत्कृष्ट कटोरे तयार करतात. कुमावू शेतकऱ्यांच्या दाराबाहेर राजी कटोरे ठेवून ते स्वत: अदृश्य होत. सकाळी दार उघडल्यावर शेतकऱ्याची नजर कटोऱ्यावर गेली की त्याने त्यात धान्य भरून ठेवायचे. पुन्हा रात्री येऊन राजी धान्य घेऊन जाईल. व कटोरा शेतकऱ्याच्या घरगुती वापरासाठी ठेवून जाईल. दुसऱ्या दिवशी शेतकऱ्याने तो उपयोगात आणावायचा, अशी ही देवाण-घेवाणीची पद्धत. एकमेकांचा चेहराही न पाहता अनेक पिढ्यांनी हा व्यवहार केला आहे.

या कटोऱ्यातील धान्य हीच त्यांच्या आर्थिक जीवनाची मर्यादा झाली आहे. 'तरू' व 'गेथी' या फळांचाही त्यांना अल्पसा आधार मिळतो. पण हिमालयातील वने आता नष्ट होत चालली आणि जीवनातील आर्थिक आवश्यकता मात्र वाढत चालल्यात.

या नवीन वळणाने या सौंदर्यवान वनपुत्रांना रोजंदार मजुरीपर्यन्त नेऊन सोडले. जंगल ठेकेदार, जगल अधिकारी, रोड व पाट बांधकामाचे ठेकेदार यांना अति स्वस्तात आणि तोही अति दुर्गम भागात मजूर-पुरवठा प्राप्त झाला पण त्यांनी केलेल्या क्रूर अत्याचारांमुळे असंख्य राजी नेपाळ व तिबेटमध्ये परागंदा झालेत. 'मनेनाथ' आणि 'धरेनाथ' हे त्यांचे देव. सामाजिक-आर्थिक स्थितीच्या बदलामुळे या देवांनाही निर्वासित व्हावे लागले.

वराह संहितेत राजींच्या निवासाचा प्रदेश म्हणून अमरवन ते चीन आणि जागेश्वर ते तिबेटचा उल्लेख केला आहे. त्यांच्या अंगकाठीत व चेहरेपट्टीत मोगल वंशाचीही लक्षणे दिसतात. अद्यापही गुहातून राहणारे राजी, मुलांचा जन्म झाल्यावर एक वर्षानंतर त्याचा नामकरण विधी करतात ताबडतोब नाव ठेवणे अशुभ मानले जाते. बालमृत्यूच्या भयप्रद प्रमाणाचा तर हा परिणाम नसेल ना? राजी आदिवासी वंश नष्ट झाला तर सांस्कृतिकदृष्टचा अतिशय संपन्न अशा वंशाला आपण कायमचे मुकणार, गुहेतला वंश गुहेतच नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे. जीवनाची आशा आहे, पण कटोऱ्यातील धान्य ओसंडून बाहेर सांडले तरच !

---

(पान ३२ वरून चालू)

जिल्हा परिषदांनी अवश्य काढावी. ही माहिती काढल्यावर शासनाने बांधून दिलेल्या झोपड्यांना नंबर देण्याचे, घरपट्टी बसवण्याचे कर्तव्य ज्या ग्रामपंचायतींनी पार पाडले नसल्याचे आढळून येईल. त्यांच्याविरुद्ध कर्तव्यात कसूर केली म्हणून खरं पाहिलं तर कारवाई केली पाहिजे, पण तसे होणार नाही.

या योजनेखाली बांधलेल्या झोपड्या संबंधित आदिवासींना दलितांना ताब्यात देतानाच ग्रामपंचायतींच्या क्रमांकासह आणि घरपट्टी आकारणीच्या पत्रासह त्या देण्याची खबरदारी महसूल व जिल्हा परिषद अधिकारी यापुढे तरी निदान घेतील का?

## पुस्तक परिक्षण :

# निरीक्षण सणांचे, दर्शन समाजाचे

### शौनक कुलकर्णी

आपल्या देशात साजरे होणारे विविध धर्मीय सण, उत्सव, जत्रा असे कार्यक्रम नेहमीच औत्सुक्यपूर्ण असतात. त्यातच मुक्त जीवन जगणारे वा निसर्गाशी एकरूप होऊन राहाणाऱ्या आदीवासींचे जीवन, त्यांचे कार्यक्रम पाहाणे म्हणजे मानवशास्त्रीय अभ्यासाला वस्तुनिष्ठ आधार देणेच आहे; त्यामुळेच आदीवासींचे सण उत्सव याबद्दल माहिती मिळवण्याची उत्कंठा वाटू लागली. अशा या पार्श्वभूमीवर श्री अजित सिंग यांचे 'Tribal Festivals of Bihar' हे इंग्रजी पुस्तक उद्बोधक वाटते.

पुस्तकाच्या सुरूवातीसच विषयाची ओळख करून देताना लेखकांनी हे प्रतिपादन केले आहे की संस्कृतीच्या विविध अंगांनी नटलेल्या या देशात भरपूर सण, उत्सव साजरे केले जातात. त्यामुळे कंटाळवाण्या आयुष्यात आनंदाचे तरंग उमटतात. अशा कार्यक्रमांचा अभ्यास आरशाइतका स्वच्छ असून त्यात धर्मकारण, अर्थकारण शासनव्यवस्था, कायदा आणि एकूण संस्कृतीसह मानवाचे वर्तन, कुटुंबरचना, लग्नकार्यादी विधी, नीतिमत्ता असे विविध पैलू प्रतिबिंबीत होत असतात. आदिवासी आणि हिंदू यांचे बहुसंख्य सण धर्मकल्पनेशी निगडीत असतात. परंतु धर्माशी संबंध न ठेवता रोजच्या सांस्कृतिक आणि व्यावहारिक जीवनात बदल घडविणारा असतो. बिहारमधील आदिवासी–सणांचा अभ्यास करण्यासाठी लेखकाने दक्षिण बिहार, छोटा नागपूर राजमहल हा भाग निवडला आहे.

दुसऱ्या प्रकरणात मानवशास्त्रीय दृष्टिकोणातून सण–उत्सवादी कार्यक्रमांवर केल्या गेलेल्या अभ्यासाचा गोषवारा दिलेला आहे. तिसरे प्रकरण सर्वसमावेशक आणि अन्वेषणात्मक आहे. या प्रकरणात साजऱ्या होणाऱ्या सणांची विस्तृत माहिती दिली आहे. बिहारमधील एकूण एकतीस आदिवासी जमातीमध्ये साजरे होणारे काही सण समान आहेत. हिंदूधर्मियांशी असलेल्या निकट संबंधातून आदिवासी जमातींकडून हिंदू सण साजरे केले जातात तसेच त्यांचे पारंपरिक सणही मोठ्या उत्साहाने साजरे होतात. संपूर्ण आदिवासी सण म्हणून ओळखले जाणारे सण म्हणजे सारहूळ, धनबुनी, हरीआरी, काडलेटा, कुटासी. अशा सणांची रेलचेल असते ती कार्तिक, फाल्गुन, पौष आणि आषाढ या महिन्यात मात्र माघ, जेष्ठ, श्रावणात या सणांचे प्रमाण कमी असते.

अशा वार्षिक सणांबरोबर प्रसगानुरूप कार्यक्रम ही असतातच. उदा. दोन/तीन वर्षांनी येणारा मुंडा लोकांचा 'सोसो–बोंगा बारा वर्षांनी महालींचा सुरजीपूजा तर संछालांच्या संपूर्ण आयुष्यात एकदा येणारा जोमसिम. हे सर्व सण–कार्यक्रम वरखण जमिनी, भातशेती किंवा रस्त्यावर साजरे होतात परंतु घरगुती स्वरूपाचे कौटुंबिक कार्यक्रम घरात, अंगणात गोषात होतात. कौटुंबिक स्वरुपाचे कार्यक्रम कुटुंबप्रमुख करतो करतो. बळी देणे, आप्तमित्रांबरोबर मिष्टान्नांचे सेवन व मद्यपान इत्यादींचा त्यात समावेश असतो. गावपातळीवर होणाऱ्या कार्यक्रमांत नाईक किंवा ग्रामप्रमुख यजमान असतो. आणि बळींची व्यवस्था पठाणाकडे असते. या बरोबरच युवक–युवतीचे रंगबेरंगी नृत्याचा समावेश असतो. काही सण प्रांतिक स्वरुपाचे असतात. उदा., छोटा नागपूरची 'रथयात्रा' विविध ३७ ठिकाणी निघते. तसेच रांचीचा मंडा उत्सव प्रांतिक स्वरूपाचाच आहे.

आर्थिक परिस्थितीनुसार बिहारमधील आदिवासी एल. पी. विद्यार्थी यांनी चार प्रकारांत विभागला आहे. या विभागणीत त्यांनी भौगोलिक रचनेनुसार वस्ती, कौटुंबिक व्यवसाय याचाही विचार केला आहे.

१) सखल भागातील संथाल, मुंडा, ओरेऑन.

२) डोंगर उतरणीवर शेती करणारे. मालर, डोंगरी असत.

३) जंगलातील शिकारी कोरवा, बिरहार.

४) कलाकुसर करणारे लोहरा, महाल, कारमाली यापैकी ओरेऑन, मालर, कोरवा लोहारी याचा प्रामुख्याने विचार केलेला दिसतो.

१) ओरेऑन छोटा नागपूर भागातील ह्या जमातीचे उत्सव प्रामुख्याने शेताशी निगडीत आहेत, उदा., पेरणीच्या वेळी धनबुनी, भात पुनलर्वाणीच्यावेळी बांगरी, पिक काढणीच्यावेळी करीहानी इत्यादी.

२) मालर--फिरती शेती करणारे हे लोक खल्लू ग्रॉसियन हे सण साजरे करतात. जेव्हा, शेतीची जागा नक्की होते. पेरणीच्यावेळी वाम ग्रॉसियन साजरा करतात तर काढणीच्यावेळा ग्रॉसियन.

३) कोरवा--उत्तम मुबलक शिकार होण्याकरता हे लोक सण साजरे करतात, फाल्गुन महिन्याल महुआ कोवळा असताना देवपूजन करतात, रंचवा सणांपूर्वी महुआ घरात अजिबात शिजवला जात नाही.

४) लोहरा -- कलाकुसरीची कामे करण्यात वाकबगार अशी ही जमात ही कुटुंबे समदायाने राहात नाहीत.

चौथ्या प्रकरणात मुख्य मुद्दे मांडले असून आदिवासींचे सण आणि हिंदू सण यांच्यातील वेगळेपणाचा वेध घेतेला आहे. आदिवासींचे सर्वच सण काही हिंदू पंचांगानुसार होत नाहीत तर ऋतुमान, गावातील मोठ्या व्यक्तीचा मृत्यू, साथीचे रोग यामुळे पुढेमागे होत असतात. आदिवासी निसर्गोपासक असल्याने पंचमहाभूते, विविध प्राणी, वनस्पती, दगड यांची पूजा होते व पितरांचेही स्मरण केले जाते. अशा स्मरण दिवशी किंवा उत्सवाचे वेळी विशिष्ठ प्रतिकांचा वापर होतो. अंड्यापासून बैलरेडा यापर्यंत कशाचाही बळी दिला जातो. यामागे मृतात्म्यांना शांती मिळावी हा उद्देश असतो. शाकाहारी लोकांकडून बळीच्याऐवजी विविध प्रकारचा भात अर्पण केला जातो. याबरोबरच शक्ती बुद्धी समृद्धीच्या देवतांची दया--क्षमा यासाठी प्रार्थना केली जाते. अशी कार्ये घरामध्ये कुटुंबप्रमुख तर गावात पाहात बैगा, भगत करत असतो. ह्या भगताचा मदतनीस म्हणजे पुजार किंवा गुरव. भगताला गावात अतिशय मान असतो, व तो कोणाशीही रोटी बेटी व्यवहार करू शकतो. सोहोळ्यामध्ये अत्यंत महत्त्व असलेली तांदुळाची दारू, कार्यक्रमात भगतास द्यावी लागते. अशा कार्यक्रमात स्त्रियांना दुय्यम दर्जा असतो व त्यांना बंधने पाळावी लागतात. मात्र अशा कार्यक्रमात लोकांना एकमेकांस भेटण्यास वाव मिळतो. सासरी गेलेली मुलगी माहेरी येण्यास संधी मिळते. कार्यक्रमांची शोभा वाढविण्यास नृत्यांचे प्रकार केले जातात.

पाचव्या प्रकरणात हिंदूधर्म व आदिवासी यांच्यामध्ये असलेल्या विविध देव-देवता व श्रद्धास्थाने यावर विचार केला आहे. मनुष्य आपल्या दृष्टिकोनातून श्रद्धेतून परमेश्वराचे स्वरूप मानत असतो. देव म्हणजे अत्युच्च शक्ती असे ग्राह्य असले तरीही देवतांची नावे विविध मानली जातात. देव म्हणजे मानवापासून उत्पन्न न झालेली सर्वश्रेष्ठ अद्‌भूत शक्ती मानली जाते. स्पिरीटस् (मृतात्मे) यांना देवाच्या खालोखाल मानले जाते व त्याचा उद्‌गम देवाकडून होतो, असे मानले जाते. जगातील सर्व क्रिया ह्या अद्‌भूत शक्तीच्याच अस्तित्वाने होतात अशी त्यांची श्रद्धा असते. त्यांच्या धार्मिक क्रियात निसर्गोपासना पितरपूजन, देवशक्तींचे पूजन यांचा समावेश होतो. पूजापाठ, बलीदान ही धर्मकृत्ये त्यांच्या आर्थिक व सांस्कृतिक स्थितीवर अवलंबून असतात. भटकी शेती करणारे, शिकारी यांच्यामध्ये निसर्गपूजा अधिक दिसते. मृतात्म्यासाठी बलिदान केल्याने, पितरपूजनाने कुटुंबाचे कल्याण होते अशी भावना असली तरी पितरांबद्दल धास्ती--भीती सुद्धा बाळगली जाते. ईशपूजनास मंदिर किंवा पवित्र जागांचा वापर व्हायलाच हवा असे बंधन नसले तरी पूजाअर्चा, प्रार्थना यावेळी पूर्व दिशेकडे तोंड करण्याचा प्रघात आहे. देवदेवतांची नावे निरनिराळ्या गावात निरनिराळी असतात. हिंदू देवतांच्या पूजनाची पद्धत बऱ्याच ठिकाणी आढळते.

सहावे प्रकरण हे धार्मिक क्रियाकर्म करणाऱ्याच्या प्रकारावर आहे. समाजातील इतर कोणत्याही व्यक्तिपेक्षा जी व्यक्ती धर्मकांडावर अधिक तज्ज्ञ, माहितगार असेल तीच व्यक्ती हे विधी करू शकते. विविध जमातीत त्यांची नावे वेगवेगळी असतात. समाजात असे विधी करण्याचे अधिकार ज्यांना असतो त्यात भगत, कुटुंबप्रमुख, शामान यांचा समावेश असतो. यापैकी भगताची निवड आनुवांशिक पद्धतीने होते. पूजा, प्रार्थना बलीदान यासारखे व्यवहार करून ग्रामवासियांची श्रद्धा परमेश्वरापर्यंत पोहोचविण्याचे काम किंवा श्रद्धेस धार्मिक मूर्त स्वरूप देण्याचे काम भगत करतो. या उलट कुटुंबप्रमुख आपल्या पितरांना मुक्ती मिळावी, त्यांचा दुवा मिळावा, आपल्या कुटुंबाचे कल्याण व्हावे अशा कौटुंबिक पातळीवर काम करत असतो. भगताचा मुलगा धार्मिक क्रियाकर्मांचे वेळी भगताबरोबर उपस्थित राहून सर्व क्रियाकर्म शिकून घेतो परंतु जर भगतास वारस नसेल तर योग्य, तज्ज्ञ व्यक्तीची भगत म्हणून निवड करण्यात येते ही निवड माघी पौर्णिमेस केली जाते. मात्र प्रत्येक लग्नकार्य, अंत्यविधीच्यावेळा

भगताची उपस्थिती असावीच लागते. शामान प्रत्येक गावात असतोच असे नाही, त्याला मंत्र तंत्र, जादूटोणा इत्यादी अवगत असते.

सातव्या प्रकरणात धार्मिक सणांचे मूळ प्रकार आणि त्यांच्यातील विविधता सांगण्यात आले आहेत. उदा. बलीदान, प्रार्थना, दानधर्म इत्यादी. यांपैकी प्रार्थना हे वाणीने परमेश्वराशी संपर्क किंवा अनुसंधान साधण्याचे साधन आहे तर धार्मिक कार्य हे धार्मिक वृत्तीचे प्रतिक आहे. विविध जमातींत विविध सणांच्या वेळी करायच्या प्रार्थना निरनिराळच्या जमातीत वेगवेगळच्या असून त्यात परमेश्वराकडे काही मागणी केलेली असते. योग्य वेळी पुरेसा पाऊस, उत्तम पीक, जनावरांपासून उत्पन्न, तसेच कौटुंबिक उन्नती, गावाची उन्नती हा त्यातील मुख्य आशय असतो. उपासनेचा मार्ग प्रतिकात्मक असून त्यावर संस्कृतीचा ठसा दिसतो. बलिदान हे त्याचेच एक उदाहरण असून त्याची पार्श्वभूमी व्यक्तीची परिस्थिती, श्रद्धा, भावना, गरज यानुसार बदलती असते. एकूण काय तर परमेश्वराच्या सेवेसाठी आशीर्वादासाठी किंवा स्वतःच्या मनःशांतीसाठी विविध काळात सर्व जमाती वेगवेगळे सण साजरा करतात. उदा. एरोकसिंग, धनभूमी, ओरह, बाकरा, बांगरी, हरीआरी, काडलेय, जंतर, नवखानी, सोहोरे इत्यादी.

निसर्गनियमानुसार कोणताही समाज किंवा संस्कृती यात सतत बदल होत असतो. सण हे संस्कृतीचे अंग आहे. या सणाच्या कल्पनेत किंवा साजरे करण्याच्या पद्धतींमध्ये घडणाऱ्या बदलामुळे संस्कृतीवर काय परिणाम झाला हा विषय ह्या प्रकरणात हाताळला आहे. विविध सण, उत्सव, धार्मिक कार्यक्रम साजरे करण्याच्या पारंपरिक आदिवासी संस्कृतीवर हिंदू, ख्रिश्चन या धर्मांचा तसेच शहरीकरणाचा खोल परिणाम दिसतो. याबरोबरच शेजारील राज्यांच्या संस्कृतीचा आर्थिक घडामोडींचा परिणाम दिसतो. आदिवासींपैकी १/३ आदिवासी दसरा, दिवाळी, संक्रांत असे हिंदू सण साजरे करताना दिसतात. बहुतेक सर्व जमातीत निम्मे हिंदू सण साजरे होताना दिसतात. ईश्वरपूजनातही गंध अक्षता, कुंकू फुले धूपदिप, गोरस, याचा वापर हिंदू संस्कृतीशी जवळिक दर्शविते. बंगालच्या हद्दीस लागून राहाणाऱ्या आदिवासीत टुसू, डोल असे बंगाली हिंदूचे सण साजरे केले जाते. ख्रिश्चन धर्म स्वीकारलेले लोक इस्टर, ख्रिसमस असे सण साजरे करतात.

नवव्या प्रकरणात धार्मिक कार्य, सण अशा कार्यक्रमांचा उद्देश सांगितलेला आहे. आदिवासींचे आर्थिक जीवन संपूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. उत्पन्नाचे अन्य साधन दुग्धव्यवसाय. याचाही शेतीशी जवळचा संबंध. अशाप्रकारे निसर्गाकडून उत्पन्न घेताना त्यांची अशी भावना होते की निसर्गापासून मिळालेली फळे, धान्य, अन्न, शिकार हे सर्व परमेश्वरापासूनच उत्पन्न झालेले आहे म्हणून निसर्गातील हा प्रसाद घेताना श्रद्धेने तो देवास अर्पण करावा. याबरोबरच मुबकलता, सुबत्ता यावी म्हणून शेतीतील नांगरणी, पेरणी, मळणी, कापणी यावेळी विविध उत्सव साजरे केले जातात. याबरोबरच आजारपण, नैसर्गिक आपत्ती, अचानक मृत्यू याच्या चक्रात सापडलेल्या मानवास आपण कुठल्यातरी अज्ञात पण उच्चशक्तीच्या (परमेश्वराच्या) हातात आहोत ही जाणीव असते. ह्यापासून मुक्ती मिळवण्याकरता चांगली परिस्थीती येण्याकरता दैनंदिन जीवनात बदल करण्याकरता माणूस उत्सव साजरे करून धार्मिक भावनांचीही पूर्ती करतो. धार्मिकतेच्या अंगाबरोबर समाजातील लोकांना एक प्रकारचा बदल मिळतो, व्यक्तिविकासास बाव मिळतो व क्षणभर तरी दुःख विसरण्यास लावून आनंदनिर्मितीस मनःशांतीस कारणीभूत होतो.

---

Tribal Festivals of Bihar
लेखक – अनिल के. सिंग
प्रकाशक – नवरंग राय
रांची मानवशास्त्र मालिका
संपादक – एस. पी. विद्यार्थी
किंमत :– रुपये ७०–००

---

# वाहते पाणी

## उल्हास राजज्ञ

पाऊलवाट नेमकी झऱ्याजवळ येऊन संपली होती. दोन्ही बाजूने पुरुषभर उंचीचे कडे आणि मधून पाण्याचा रुंद प्रवाह खळाळत उसळत खाली धावत होता. रस्ता म्हणजे झऱ्यातूनच चालत चालत जायचे. पण लाल आकड्याचे खेकडे दगडा दगडाला बिलगून होते. थबकलो. दला पाडवी कमरेला टॉवेल गुंडाळून उभा होता. डोळ्यांनीच खेकड्यांकडे खूण केली. शाश्वत सत्य सांगितल्याच्या थाटात दला उत्तरला, "वाहत्या पाण्याला काहीही बाधत नाही." धाक-धुकीने पाण्यात उतरलो. धावत धावत झरा पार करून पलीकडे पोहचून मागे पाहिले. दला सावकाश येता येता मधेच झपकन खाली वाकून खेकडे पकडून टॉवेलच्या घोळात टाकत होता. "दला, आटोप पाण्यात विंचू साप आहेत." दलाने मान वर करून म्हटले, "वाढत्या पाण्यातल काहीही बाधत नाही."

सातपुड्यातला खरा चढाव सुरू झाला. पावसाळ्या-मुळे सारा परिसर हिरवळीने नटलेला. सागाच्या पानाचा आणि रानटी फुलांचा उग्रसा दर्प सर्वत्र भरून होता. हिरव्यागर्द रानाच्या अधूनमधून फुललेली लाल-भडक फुले ठिणग्यांसारखी भासमान होत होती. पण वातावरणातला उकाडा एवढा वाढला की पावला-पावलावर धाप लागू लागली. दला त्याच्याच मस्तीत भिलोरी भाषेतील गाणे ओरडत होता उन्हाची तिरीप खुपावी तसे न कळणारे गाणे मला त्रासू लागले. पण लवकरच सूर्याने भरभर पावले उचलून पहाडामागे प्रयाण केले. तासाभरात काजव्यांची शोभा दृश्यमान झाली. वृक्षांची वेलीची अंधारातही आपल्यावर नजर असल्याचा भास होऊ लागला. मुक्काम जवळ आला दलाच्या पाठोपाठ एका झोपडीत शिरलो. चारपाच लाकडी ओंडके धुरात लपेटून धुसमसत होते. थंडीची लाट पुढे सरकू लागल्याने शेकोटीची उब शोषण्यासाठी शरीर आसुसले. लंगोटीने अब्रू झाकलेल्या हुताऱ्याने दाढी खाजवत, माझ्यासमोर भोपळा कोरून बनविलेला हुक्का आणून ठेवला. जंगली तंबाखूचा धूर खोलवर भरून घेताच मस्तकात कळ उठली, तेव्हा बरे वाटले.

झोपडीबाहेर उभे राहून क्रमाक्रमाने सर्व दिशांना तोंड करून हुताऱ्याने ओरडून-ओरडून संदेश दिले. दूरवरच्या टेकड्यांवरून त्याच लयीतले प्रतिसाद घुमले. आवाजाच्या लाटा कडे-कपारींवर आदळून ध्वनी-प्रतिध्वनींचा खेळ सुरू झाला. एखाद्या अद्भूत भू-लोकी आल्यासारखे वाटू लागले. एकेका टेकडीवरून एक एक जळती मशाल आमच्याकडे येऊ लागली. प्रथम दारा बाहेरूनच प्रश्न यायचा, 'उल्हास भाऊ हाजो आसं? आवाज ओळखून मी उत्तर दिले, "हाजोसे" (होय, मी आनंदात आहे.) नंतर चेहरा झोपडीत प्रवेशायचा.

संवाद आणि सख्या हळूहळू वाढू लागले. एकेक आदिवासी हुक्का ओढत आपली तक्रार सांगू लागला. सातपुड्याच्या तिसऱ्या रांगेतल्या जमिनीत या साऱ्यांनी अतिक्रमण करून जमिन कसली होती. पीके गुडघ्या-एवढी झाली. आणि एस आर. पी. ची फौज पिके उध्वस्त करत फिरू लागल्याने सारे घाबरले होते. पीक नष्ट झाले तर पुढच्या आठ महिन्यात खायचे काय? या पीकासाठी घेतलेली कर्जे फिटायची कशी? आणि भोन्ग्रा नाचात यंदा मुले-मुली नाचायलाच आली नाही तर देव कोपायचा पण धान्य नसेलच तर मुली पळवायच्या कशाच्या वायद्यावर? अशा अनेक प्रश्नांना वाचा फुटली.

आणि जीवाचा थरकाप उडविणारी एस. आर. पी. ची अमानुष मारहाण! तीच्या कल्पनेनेही त्यांचे चेहरे भयक्रांत होत होते हातापायांवरच्या अनेक जखमांचे व्रण कुरवाळत एकाने चिंता प्रकट केली. चर्चा सुरू होती ते 'करंजापाणी' गांव, या भागात बसून २०/२५ वर्षे झाली होती. पण हे गांव नसून 'अतिक्रमण' आहे अशी भूमिका घेऊन एस. आर. पी. व जंगल-अधिकाऱ्यांनी पिके नष्ट करण्याचा सपाटा लावला होता. झोपड्या तोडून मोडून संसार उध्वस्त करावे आणि जो मधे येईल त्या प्रत्येकाला रक्तबंबाळ करावे अशा पद्धतीने शासकीय आदेशांची अंमल सुरू होती. महाराष्ट्र शासनाच्या नव्या जी. आर. ची माहिती त्यांना समजावून सांगताच त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्याची चिन्हे उमटली. साऱ्या पाड्याने मिळून दरवर्षी दोन अडीच हजार रुपये रेंजरला दिले होते. पण त्यांना मात्र कधी एक रुपयाचीही पावती कधी मिळाली नव्हती. आणि शासन आता फक्त पावती असणाऱ्या आदि-वासींनाच जमिनी त्यांचे नावावर देणार आहे. कायदे

होऊनही त्याचा लाभ यांना मिळू शकत नव्हता. सरकारने पुरावा म्हणून 'दंडाची पावती' मान्य केली. पण दंडाच्या शंभर पट पैसे घेऊनही एक रुपयाची पावती देणारी यंत्रणा शासनाजवळ नाही. त्याची शिक्षा आदिवासींना होणार, त्यांच्या वस्त्या उध्वस्त होणार चर्चा वाढत गेली. हुताऱ्याने बटाटयाच्या चवीचे विषारी कंद शिजवून आणले ते पाहताच अंगावर काटा उभारला. हुताऱ्याने माझी चालबिचल ओळखली, "रातभर आढयाच्या पाण्यात फोडी फडक्यात बांधून ठेवल्या होत्या. विष वाहून गेलं. आता खुशाल खावा." वाहत्या पाण्यातल काहीही बाधत नाही हा नियम आठवत इतरांबरोबर फोडींची चव घेण्यास सुरवात केली.

आमलीपाणीच्या मोत्या भिलने बोलायला सुरवात केली. मागच्या वर्षी तो सागाचे लाकूड तोडून ट्रकात भरायला गेला होता. पण अक्कलकुव्याच्या मारवाडयाने फसवून मजुरी न देताच सगळं लाकूड पळवलं. म्हणून यंदा चोरटया लाकूड–तोडीला जायचे नाही अस त्यान ठरवल होते. पण फॉरेस्टवाले जमिनीच्या बदल्यात तीन हजार रुपये मागत होते. मोत्याने माझ्याकडे पाहात सर्वांना विचारले, "यांना तीन हजार रुपये देता आले असते तर तापी काठालाच नसती कां जमीन घेतली आपण ?"

तीन वर्षांपूर्वी तर एस. आर. पीं. नी अनेक आदिवासींच्या झोपडया जाळल्या होत्या. घरे पेटवून दिली. आतल्या बकऱ्या भाजून तडफडून मरण पावल्या. रुपला खेमा पावरा याला काठया–काठयांनी रक्त बंबाळ होस्तोवर मारले. तो गुरासारखा ओरडत होता. बुटांनी तुडवून त्याच्या छाती–पोटावर एस. आर. पी. नाचले. त्यानंतर चार पाच दिवसांनी रक्त ओकत रुपला खेमा पावरा मरण पावला. तीन वर्षे झाली तरी त्या घटनेची भीती हुताऱ्याच्या डोळयात तरंगतांना दिसते. उताऱ्याच वय ३० वर्षाचे पण दिसतो मात्र चाळीशी ओलांडल्यासारखा. कारण विचारले, तसा शेंडल्या पवार उद्गारला, "मोळी वाहून वाहून डोक्याला टाल पडली" सारे प्रथमच मोठयाने हसले.

उताऱ्या मात्र निराळीच कहाणी सांगू लागला. वडलांचा खून पाहून घाबरलेल्या उताऱ्याने वस्ती सोडून पळ काढला! अस्तंबा शिखरापासून तोरळमाळकडल्या जापी खडकी पर्यन्त दऱ्या खोऱ्यातून हिंडला. पण हरेक ठिकाणची जमिन वेगवेगळया टोळयांनी सांभाळलेली. नाईलाजाने पुन्हा करंजपाणी लगतचीच जमीन खेडू लागला. पण खाकी कपडा दिसला की नांगर तसाच टाकून पळायचे. रेंजर व गार्ड, बैल किंवा रेडकू घेऊन जायचे. पण जीव वाचल्याचा सुस्कारा सुटायचा. झोपडी बांधायची सोय नव्हती. चार फांद्या गाडल्या की जंगल–लाकडाची चोरी केल्याचा आरोप. मग उताऱ्याने उंचावरल्या गोबडखशा घाटातल्या कपारीत जेमतेम तीनचार फूट उंचीच्या गुहेत लपून दिवस काढायला सुरवात केली. कुणी नाही असे पाहून खाली उतरायचे, शेतीकाम करून सूर्य डुबायच्या आत घाटात परत यायचे. सोबतीला माणूस नाही. झोडपणारा पाऊस सुरू झाला की सागाच्या पानाचा टोप डोक्यात घालून कुडकुडत बसायचे. फॉरेस्टरच्या दहशतीने त्याच्या आयुष्यातली नऊ वर्षेच अशीच जळून गेली. तारुण्यातच शरीर म्हातारपणाला येऊन पोहचले. वडलांचा अधिकृत सरकारी खून झालेला. आईला कधी भेटताच आले नाही. भयाण अंधारात रातकिडयांची किरकिर ऐकत उताऱ्या समाज विरहीतपणे एकटयाने नऊ वर्षे जगत राहिला.

जगला ? होय फक्त जगला ? निवारा नाही, वस्त्र नाही, सोबत नाही पण जगला ? काय जगला ? कसे जगला ? त्याच्या जाणिवेला कधी पुढचे कोंभ फुटले कां ? अमूर्त विचारांच्या हाकेने तो कधी विचलीत झाला कां ? उत्तर रात्री आपल्या सखीच्या प्रेमामुळे सारी सृष्टी चांदण्यात न्हात असल्याचा भास याने कधी अनुभवला असेल कां ? आपल्या चिमुरडीच्या हट्टांनी त्याच्या पायाला कधी बंध घातला असेल कां ? भावनांची, इच्छांची आणि उपलब्ध जगण्याची सांगड घालून नीट मांडणी करायला कधीच संधी न मिळालेल्या माणसाबद्दल हे सारे प्रश्न निरर्थक होते. स्पष्ट सांगायचे तर अजून 'माणूस' पण त्याने अनुभवलेच नव्हते. विचित्र एकटेपण आणि विचारशक्ति कुंठित करणारी भिती. कपारीत लपून जगतांना त्याला कुणी मायेने थोपटले नव्हते. स्वतःची ओळख पटायला दुसऱ्याबरोबर असणारे 'सहजीवन' त्याला कुठे लाभले होते ? अशा १०/१५ उताऱ्यांचे, मोत्या भिलचे मिळून बनलेले पाडे सातपुडयाच्या दरी दरीत बसले आहेत. जगण्याच्या दुर्दम्य शक्तिने मृत्यूच्या काळया छायेवर मात केल्याचे ते प्रतिक आहे. त्यांच्या जगण्याच्या वाहत्या जोमदार प्रवाहाने आयुष्य निर्विष केले आहे. त्यात नवे संजीवन भरायला, त्यांचे एकटेपण वाटून घ्यायला तुमच्या–माझ्या हातांची आवश्यकता आहे.

( हे क्षणचित्र १९७८ मधील घटनांवर आधरित आहे )

# बातचित नर्मदेशी

भुजंग मेश्राम

ओल्या धागरीसोबत घरात घुसलेल्या बाईला काय म्हणतात
हे तुला चांगलं माहीत आहे नर्मदा–
तरी तू पुन्हा पुन्हा उकरतेस लोकरहाटीचा उकंडा
शोधतेस नाक टोचल्यानंतर हरवलेला अभिमान...
गाईला वेसण नसली म्हणून काय झालं
दावणीची माळ तर असते ना गळ्यात !
उभ्या पिकातल्या ढोरांना नकळत बुजगावण्याची साथ
तू मात्र आता लपंडाव खेळणे सोडून टाक.

मी केव्हाच केला आहे मोकळा आतल्या गाठीचा गुंता
सोडली आहे मी एकदाची फिरती शेती
अन् नाकारलीय परिशिष्टातली विमुक्ती
अर्थात मी उजळून टाकल्या आहेत आदिम अंधाराच्या गुहा
नागकन्ये, मी होऊ इच्छितो मित्र तुझा
तू मात्र विसरत चाललीस तुझ्या खोरींना

अल्पवयीन मुलीवर व्हावा सामूहिक बलात्कार
तशी लादता येते का एखादीवर समाधी ?
तुझ्या भविष्याचा आराखडा काढताना
डोळ्यांसमोर गल्लोगल्ली फिरणारी वेडी उकाई
तिची तुझी कुठे भेट होते की नाही ?

तुझ्या अभयारण्यातल्या हिंस्र श्वापदांची
आता सर्वांनाच लागली आहे काळजी
त्यासोबत एका वनवासातून दुसऱ्या वनवासात
ढकलून दिलेल्या मूर्ख टोळ्यांची...
निसर्गाचा समतोल राखण्यासाठी
राहावेच लागते काहींना निसर्गप्रेमी
काहींना निसर्गदत्त, तर काहींना निसर्गावस्थेत इ.
प्रत्येकाला आवडते म्हणे वाट्याला आलेली भूमिका
तो भाग वेगळा !

तुझ्या मायेच्या जंजाळातून मुक्त झाल्यावर
मी मोजल्यात अभयारण्याच्या जखमा
मधूनच येत राहावा कोलाहल
तरच हाक मारतोय विमुक्त चकमा
पेटवले आहेच रांचीचे विद्यापीठ
मध्येच शिरले आहेत शिरपूरचे घुसखोर
हे सर्व ठरतायेत विषयांतराचे मुद्दे
अन् तुझ्यावरच खिळली जातेय सर्वांची नजर
तू होत चाललीस अनावृत मॉडेल
आणि इतर टोळ्यांसारखा मी एक उपरा

तुझ्या काठावरच्या ठेकेदारांनी
सुरू केले आहे विकारांचे मंथन
ज्यात ढवळून निघत नाही तळाचा गाळ
त्यांची कुठलीही लाट वाहून आणेल
आमच्या काळ्या भूमीवर गाळ
यावर माझा नाहीय विश्वास.

जंगलाचे ठेकेदारच पेरताहेत पर्यावरणाची चळवळ
गंगेच्या व्यभिचारी पोटात होतेय मळमळ
चिपकून झाल्यावर घाट वाचवताना
फ्रंटपेजवर त्यांची बांधीलकी अन् कळकळ
आपण कितीही पेटवले रान
तरी ठरतो फुटकळ

मी जंगलाच्या जंजाळात राहावे याची केली जातेय तरतूद
ज्या व्यवस्थेकडून, तिच्यावर निघालोय चाल करून
माझ्या सैन्याला ते म्हणताहेत टोळधाड
तू वाहशील ना तुझ्यातून रक्ताचे पाट
अन् लिहतात स्वतःच्या आक्रमणांचा इतिहास
तू देशील ना याची साक्ष ?
एकीकडे करावी अथांगता तर दुसरीकडे गतिमान प्रवाह
नर्मदे, तुला काय हवंय ते सांग



✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# 'हाकारा'

### सूची


| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी–मार्च | १९८० – जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल–जून | १९८० – आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै–सप्टेंबर | १९८० – आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८० – आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी–मार्च | १९८१ – दलितांना सवलती व राखीव जाग माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१ – आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै–सप्टेंबर | १९८१ – वनशेती व संवर्धन |
| अंक आठवा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८१ - रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी–मार्च | १९८२ – उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२ – धरणे व विकास |
| अंक अकरा बारा : जुलै–डिसेंबर | १९८२ – जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी मार्च | १९८३ – आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल–जून | १९८३ – आदिवासींच्या सामाजिक/राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै–सप्टेंबर | १९८३ – प्रा. सरदार गौरव अंक/आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८३ – आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-अठरा : जानेवारी–जून | १९८४ – आदिवासी मधील स्वयंसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै–सप्टेंबर | १९८४ – आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८४ – आदिवासींचे आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी–मार्च | १९८५ – आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल–जून | १९८५ – जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै–सप्टेंबर | १९८५ – आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८५ – आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी–मार्च | १९८६ – जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल–जून | १९८६ – आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै–सप्टेंबर | १९८६ – आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८६ – आदिवासीविषयक ग्रंथ व मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी–मार्च | १९८७ – भटक्याविमुक्त जमातीचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल–जून | १९८७ – आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |


✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे. मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून '**हाकारा**' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रुपये |
| आदिवासी कार्यकर्ते सभासद | १५ रुपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामुल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अँथ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची वटणावळ पाठवावी. मनिऑर्डर पाठविल्यास फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पत्ता लिहावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**रा. के. मुटाटकर**, सचिव

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,

६४/३, आनंद पार्क, औंध, पुणे ४११००७

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**